# प्रकरण तीन

## समाजकल्याण विभाग

**3.749 इयत्ता 9 वी व 10 वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** वसतिगृहात न राहणारे विद्यार्थींना प्रतिमहा रूपये 150/- प्रमाणे 10 महिन्यांची रक्कम रुपये 1,500/- व पुस्तक व तदर्थ अनुदान वार्षिक रूपये 750/- मिळून रुपये 2,250/- प्रति विद्यार्थी 63 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक इ.बी.सी.2012/प्र.क्र.151/शिक्षण-1 दिनांक 04/10/2013 अटी व शर्तीनुसार लाभार्थी प्रस्ताव अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 14/10/2016 ने मागणी करुन नस्तीसोबत आढळून आले नाही. त्यामुळे शाळा मान्यता प्राप्त, पालकांचे उत्पन्न मर्यादा, विदयार्थी अर्ज, विद्यार्थी बँक खाते इत्यादींची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

2) सदर रक्कम शाळांना धनादेश दिनांक 26/05/2016 ला दिलेल्याची नोंद धनादेश नोंदवहीला दिसते. म्हणजेच सन 2015-2016 मध्ये रक्कमा दिलेल्या नाही. तसेच गुरुदेव चैतन्य स्वरुप हायस्कूल, अंभई रक्कम रुपये 6,750/-, होलीक्रॉस हायस्कूल, निर्मळ रक्कम रुपये 2,250/-, नुतन मराठी हायस्कूल, वसई रक्कम रुपये 22,500/- मिळाल्याबद्दल शाळेच्या पोहच नस्तीसोबत नाही.

3) सदर रकमा शाळेने विद्यार्थ्यांच्या बँक खातेवर जमा केल्याच्या पोहच व विद्यार्थ्यांना रक्कमा प्राप्त झाल्याच्या पोहच नस्तीसोबत आढळून आले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना रक्कमा प्राप्त झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

4) सन 2014-2015 मधील ठाणे जिल्हा परिषदेकडून अखर्चित रक्कम जिल्हा परिषद, पालघरकडे वर्ग रक्कम रुपये 1,19,05,680/- केली आहे. त्यापैकी सन 2015-2016 मध्ये रक्कम रुपये 1,41,750/- खर्च करण्यात आली आहे. तरी अखर्चित रक्कम रुपये 1,17,63,930/- शासनखाती भरणा करावी.

**3.750 इयत्ता 8वी ते 10 मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदानाबाबत (अनु.जाती).**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,38,000/-खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक इ.बी.सी 2003/प्र.क्र.116/मावक-2, दिनांक 23/05/2003 नुसार शासन मान्यता प्राप्त अनुदानीत / विनाअनुदानीत शाळेसाठी लागू राहील. परंतू, सदर शाळा अनुदानीत / विनाअनुदानीत शासन मान्यता प्राप्त असल्याचे पत्र नस्तीसोबत आढळून आले नाही. त्यामुळे योग्य संस्थेच्या विद्यार्थ्यांना लाभ झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

2) शासन निर्णयाप्रमाणे मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती दिनांक 26 जुलै, 22 सप्टेंबर व 3 जानेवारी या दिवशी मुलींना संबंधित ग्रामपंचायतीकडून समारंभपूर्वक प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वितरीत करण्यात यावी. असे असताना अशी कार्यवाही झालेली नाही.

3) शिष्यवृत्ती वाटप केल्याचे विनियोग दाखले पुढील वर्षाचे प्रस्ताव सादर करताना देणे आवश्यक असताना विनियोग दाखले नस्तीसोबत जोडलेले नाही.

4) सदर शिष्यवृत्ती धनादेश दिनांक 06/06/2016 ला शाळेला दिल्याचे धनादेश नोंदवहीवरुन दिसते. म्हणजेच सन 2015-2016 या वित्तीय वर्षात शिष्यवृत्ती वेळेत वाटप केलेली नाही. विलंबाबाबत खुलासा करावा.

5) सदर शिष्यवृत्ती शाळेच्या बँक खात्यावर वर्ग केली आहे. सदर शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर NEFT द्वारे जमा केल्याची पोहच नस्तीसोबत जोडलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना रक्कमा प्राप्त झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

6) जिल्हा परिषद, ठाणेकडून सन 2014-2015 ची अखर्चित रक्कम रुपये 50,55,490/- जिल्हा परिषद पालघरकडे वर्ग केली होती. परंतू, सन 2015-2016 मध्ये रक्कम रुपये 2,38,000/- खर्च करण्यात आले. उर्वरीत रक्कम रुपये 48,17,490/- विहित मर्यादेमध्ये शासनास परत करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही.

**3.751 20% सेस फंडातून मागासवर्गीयांना नवीन घर बांधणी / दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांनी सन 2015-2016 मध्ये वरील प्रमाणकानुसार 8 तालुक्यांतील 50 लाभार्थ्यांना रुपये 40,000/- प्रमाणे रक्कम रुपये 20,00,000/- इतकी खर्च केली असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मंजूर लाभार्थी यादीवर समाजकल्याण सभापती यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदरील यादी मंजूर असल्याबाबत खात्री करता आली नाही.

2) मंजूर यादी पत्र दिनांक 31/03/2016 ची आहे खर्च दिनांक 31/03/2016 चा आहे.

3) सदर योजनेचे लाभार्थी प्रस्ताव लेखापरीक्षणात प्राप्त झाले नाही. त्यामुळे लाभार्थी मागासवर्गीय असल्याचा दाखला रुपये 20,000/- मर्यादेपर्यंतचा वार्षिक उत्पन्न दाखला, तसेच दारिद्रय रेषेखालील, लाभार्थी निवड ग्रामसभेत करण्यात आल्याची ग्रामसभेची प्रत, लाभार्थी स्थानिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र, लाभार्थीच्या नावे घर असणे आवश्यक, लाभार्थ्याचे घर नमुना नंबर 8 असणे आवश्यक या सर्व बाबींमुळे योग्य लाभार्थी निवड झाल्याची निश्चित पडताळणी करता आली नाही.

4) उपअभियंता यांचे घर दुरुस्तीचे अंदाजपत्रक असणे आवश्यक आहे.

5) सदर लाभार्थ्यांना राजीव गांधी विकास ग्राम योजना / शहरी योजना / रमाई घरकूल योजना / ITDP मधून यापूर्वी लाभ घेतलेला नाही. याची पडताळणी केल्याचे फोटो / प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही. तसेच मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

6) जिल्हा परिषद योजनेची अंमलबजावणी / ग्रामविकास विभागाची टाईम टेबलप्रमाणे योजना राबविल्याचे नस्तीवरुन आढळून आले नाही. वित्त विभागाच्या दिनांक 31/03/2016 च्या योजनेची वेळेप्रमाणे पालन झालेले नाही.

7) घर दुरुस्ती व बांधणेबाबतचे फोटो नस्तीसोबत जोडले नाही व उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.

8) काम पूर्ण झाल्याचे मुल्यांकन व काम पूर्ण प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.

**3.752 मागासवर्गीय वस्तीत जोडरस्ते बांधणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** समाजकल्याण विभाग, ठराव क्रमांक 1, दिनांक 29/06/2015 योजना राबविण्यास मान्यता, 8 गटाकडील एकूण 26 कामांना आदेश क्रमांक 416 दिनांक 05/12/2015 अन्वये प्रशासकीय मंजूरी देऊन मागासवर्गीय वस्तीत जोडरस्ते बांधले. सदरबाबत रक्कम रूपये 55,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीसोबत उपअभियंता यांचे अंदाजपत्रक / मुल्यांकन / काम पूर्ण प्रमाणपत्र उपलब्ध् झाले नाही.

2) काम सुरु होण्यापूर्वी व पूर्ण झाल्यानंतरचे फोटो नस्तीसोबत उपलब्ध् नाही.

3) सदरच्या योजनेतील 1 ते 26 कामे मागासवर्गीय वस्तीत बांधल्याबाबत नस्तीसोबत ग्रामपंचायतीचे सरपंच / सचिव यांचे पत्र नस्तीसोबत जोडले नाही.

4) सदर योजना पूर्ण झाल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध् झाले नाही.

**3.753 20 टक्के जिल्हा परिषद सेस मधून मागासवर्गीयांना संगणक पुरविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी 61 संगणक रुपये 40,425/- प्रती नग प्रमाणे प्रमाणक क्रमांक 1012, दिनांक 31/03/2016 अन्वये एकूण रुपये 24,65,925/- ची खरेदी केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.-680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 नुसार खर्चाच्या मर्यादेचे व प्रशासकीय मंजुरीचे अधिकार वरील योजनेच्या खर्चाच्या मर्यादेत समाज कल्याण विषय समिती सभापती यांना असताना त्याप्रमाणे त्यांची मंजुरी घेतलेली नाही.

2) तांत्रिक मंजुरी आदेशावर कार्यालयाचा जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही. तसेच तांत्रिक मंजुरी आदेशामध्ये प्रशासकीय मान्यतेचा ठराव क्रमांक व दिनांक नमूद नाही.

3) जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी वरील साहित्य खरेदी करण्यापूर्वी गटांकडून मागणी घेणे आवश्यक होते. परंतु, अशी कोणत्याही प्रकारची मागणी गटाकडून प्राप्त झाल्याचे लेखे नस्तीसोबत नाहीत.

4) वरील साहित्याबाबत केंद्र शासनाने HCL Infosystem Ltd. यांच्याशी दर करार केलेला आहे. त्यामुळे त्यांच्याच नावे पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना अनोंदणीकृत पुरवठादारांना पुरवठा आदेश दिलेला आहे. सदर बाब नियमबाह्य आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद क्रमांक 1.4 (अ) जिल्हास्तरीय कार्यवाही व 1.4 (ब) पंचायत समिती स्तरीय कार्यवाही व 1.4 (क) नुसार ग्रामस्तरीय कार्यवाही करणेबाबत शासनाचे निर्देश आहेत. त्यानुसार कार्यवाही केली आहे किंवा कसे? याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक 16/02/2017 नुसार लेखे तात्काळ सादर करावेत व नसल्यास खुलासा सादर करावा. परंतु, समाज कल्याण विभागाने लेखे अथवा खुलासा सादर केलेला नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार, लाभार्थ्यांच्या निवडीमध्ये अनियमितता होऊ नये, म्हणून आवश्यक नोंदवह्या ठेवण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत. त्यानुसार कार्यवाही केली आहे किंवा कसे? याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक 16/02/2017 नुसार लेखे तात्काळ सादर करावेत व नसल्यास खुलासा सादर करावा. परंतु, समाज कल्याण विभागाने लेखे अथवा खुलासा सादर केलेला नाही.

7) वरील योजनेच्या लाभार्थ्यांचे अर्ज तपासले असता सदर योजनेच्या खरेदीचा पुरवठा आदेश दिल्यानंतर लाभार्थ्यांचे अर्ज अपूर्ण स्थितीत प्राप्त झालेले असताना देखील नियमबाह्यपणे लाभ दिलेला आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक 16/02/2017 नुसार तात्काळ खुलासा सादर करावा. परंतु, समाज कल्याण विभागाने तसा खुलासा सादर केलेला नाही.

8) वरील योजनांच्या लाभार्थ्यांचे अर्ज छाननी करून समाज कल्याण अधिकारी यांनी कोणत्या दिवशी विषय समितीने सभेत मंजुरी दिली? तसेच त्या योजनेसाठी किती लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले? त्यातील किती लाभार्थी पात्र ठरले व किती अपात्र ठरले? याची मंजूर यादी नस्तीसोबत उपलब्ध नाही.

9) 20 टक्के जिल्हा परिषद सेस व शासकीय निधीतून मागील तीन वर्षात कोण कोणत्या योजना राबवून लाभार्थ्यांना लाभ दिला? त्याबाबत लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही उपलब्ध केलेली नाही.

10) मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958 चे कलम 34 नुसार सदर कामासाठी विभागाने संबंधित कंत्राटदारांकडून रुपये 1,600/- मुद्रांक शुल्क आकारले नाही. त्यामुळे सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करावी.

11) पुरवठा केलेल्या साहित्याची पोहच पावती दोन प्रती जिल्हा समाज अधिकारी कार्यालयास सादर करावी, अशी अट पुरवठा आदेशात नमूद असून देखील त्याप्रमाणे पोचपावत्या नस्ती सोबत नाहीत.

12) पुरवठादाराने साहित्याचा नमुना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अलिबाग येथे घेवून जाणे व त्याचा स्पेसिफिकेशन प्रमाणे तपासणी अहवाल विभागाला सादर करणे आवश्यक होते. परंतु, अशा प्रकारे तपासणी

अहवाल नस्ती सोबत उपलब्ध नाही. असे असताना देखील समाज कल्याण अधिकारी यांनी वरीलप्रमाणे पुरवठा आदेश दिलेला आहे.

13) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 4 नुसार संगणक पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून 30 दिवसात करण्यात यावा, अशी अट असून पुरवठादराने 61 नग संगणक उशिराने वाटप केलेले आहेत. त्यामुळे पुरवठा आदेशातील अट क्रमांक 5 नुसार विलंबाने पुरवठा करण्यात आलेल्या मालाच्या पुरवठ्याच्या रक्कमेवर प्रति आठवडा 0.5 टक्के व त्याची कमाल मर्यादा एकूण किमतीचे 5 टक्के इतकी राहील. त्याप्रमाणे विलंबाची रक्कम रूपये 1,11,168/- व्याजासहित पुरवठादाराकडून वसूल करून चलनासहित अनुपालन दाखवावे.

14) पुरवठा आदेश क्रमांक 218, दिनांक 02/03/2016 नुसार 61 नग संगणक पुरवठा आदेश दिलेला आहे. परंतु, पुरवठादार HCL Infosystem Ltd. दिल्ली हे केंद्र शासनाच्या दर करारावरील निविदाकार आहेत. सदर निविदाकाराचा दरकरार पुरवठा कालावधी दिनांक 24/03/2015 ते दिनांक 09/02/2016 असा होता. तसेच सदर निविदाकाराला केंद्र शासनाने मुदतवाढ दिल्याचे कोणतेही लेखे नस्तीसोबत नाही, असे असताना देखील नियमबाह्यपणे पुरवठा आदेश दिलेला आहे.

**3.754 3 टक्के अपंग कल्याण निधी अंतर्गत अपंग व्यक्तींना झेरॉक्स मशीन पुरविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी 63 झेरॉक्स मशीन रुपये 47,197/- प्रती नग प्रमाणे एकूण रुपये 29,73,442/- ची खरेदी केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.-680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 नुसार खर्चाच्या मर्यादीचे प्रशासकीय मंजुरीचे अधिकार वरील योजनेच्या खर्चाच्या मर्यादेत समाज कल्याण विषय समिती सभापती यांना असतानादेखील त्याप्रमाणे त्यांची मंजुरी घेतलेली नाही.

2) जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी वरील साहित्य खरेदी करण्यापूर्वी गटांकडून मागणी घेणे आवश्यक होते. परंतु, अशी कोणत्याही प्रकारची मागणी गटाकडून प्राप्त झाल्याचे लेखे नस्तीसोबत नाहीत.

3) वरील साहित्याबाबत केंद्र शासनाने मे. रिको इंडिया प्रा.लि. यांच्याशी दर करार केलेला आहे. त्यामुळे त्यांच्याच नावे पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना अनोंदणीकृत पुरवठादारांना पुरवठा आदेश दिलेला आहे. सदर बाब नियमबाह्य आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/11/1999 मधील परिच्छेद क्रमांक 1.4 (अ) जिल्हास्तरीय कार्यवाही व 1.4 (ब) पंचायत समिती स्तरीय कार्यवाही व 1.4 (क) नुसार ग्रामस्तरीय कार्यवाही करणेबाबत शासनाचे निर्देश आहेत. त्यानुसार कार्यवाही केली आहे किंवा कसे? याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक 16/02/2017 नुसार लेखे तात्काळ सादर करावेत व नसल्यास खुलासा सादर करावा. परंतु, समाज कल्याण विभागाने लेखे अथवा खुलासा सादर केलेला नाही.

5) वरील योजनेच्या लाभार्थ्यांचे अर्ज तपासले असता सदर योजनेच्या खरेदीचा पुरवठा आदेश दिल्यानंतर लाभार्थ्यांचे अर्ज अपूर्ण स्थितीत प्राप्त झालेले असताना देखील नियमबाह्यपणे लाभ दिलेला आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक 16/02/2017 नुसार तात्काळ खुलासा सादर करावा. परंतु, समाज कल्याण विभागाने तसा खुलासा सादर केलेला नाही.

6) वरील योजनांच्या लाभार्थ्यांचे अर्ज छांननी करून समाज कल्याण अधिकारी यांनी कोणत्या दिवशी विषय समितीने सभेत मंजुरी दिली? तसेच त्या योजनेसाठी किती लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले? त्यातील किती लाभार्थी पात्र ठरले व किती अपात्र ठरले? याची मंजूर यादी नस्तीसोबत उपलब्ध नाही.

7) 3 टक्के अपंग कल्याण निधीतून, जिल्हा परिषेद सेस व शासकीय निधीतून मागील तीन वर्षात कोण कोणत्या योजना राबवून लाभार्थ्यांना लाभ दिला? त्याबाबत लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही उपलब्ध केलेली नाही.

8) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार सदर कामासाठी विभागाने संबंधित कंत्राटदारांकडून रुपये 2,100/- मुद्रांक शुल्क आकारले नाही. त्यामुळे सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करावी.

9) पुरवठादाराने साहित्याचा नमुना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अलिबाग येथे घेऊन जाणे व त्याचा स्पेसिफिकेशनप्रमाणे तपासणी अहवाल विभागाला सादर करणे आवश्यक होते. परंतु, अशा प्रकारे तपासणी अहवाल नस्तीसोबत उपलब्ध नाही. असे असताना देखील समाज कल्याण अधिकारी यांनी वरीलप्रमाणे पुरवठा आदेश दिलेला आहे.

10) नस्तीसोबत 63 झेरॉक्स मशीन समाज कल्याण विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे पुरवठा केल्याचे डीलीव्हरी चलनावरून दिसून येते. परंतु, त्या चलनावर साहित्य प्राप्त झाल्याची दिनांकित स्वाक्षरी नाही.

11) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 4 नुसार 63 झेरॉक्स मशीन पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून 30 दिवसात करण्यात यावा, अशी अट असून पुरवठादाराने 63 नग झेरॉक्स मशीन उशिराने वाटप केलेल्या आहेत. त्यामुळे पुरवठा आदेशातील अट क्रमांक 5 नुसार विलंबाने पुरवठा करण्यात आलेल्या मालाच्या पुरवठ्याच्या रक्कमेवर प्रति आठवडा 0.5 टक्के व त्याची कमाल मर्यादा एकूण किमतीचे 5 टक्के इतकी राहील. त्याप्रमाणे विलंबाची रक्कम रुपये 96,524/- व्याजासहित पुरवठादाराकडून वसूल करून चलनासहित अनुपालन दाखवावे.

12) पनवेल व म्हसळा गटाकडील नमुना क्रमांक 33 साठा नोंदवही लेखापरीक्षणात उपलब्ध केलेली नाही. कर्जत, मुरुड, उरण, रोहा, माणगाव व पोलादपूर यांच्याकडील डिलीवरी चलने उपलब्ध नाहीत. डिलीवरी चलनावर दिनांक नमूद नाही. याबाबत सखोल चौकशी करून पुरवठा केलेल्या झेरॉक्स मशीन विहित मुदतीत प्राप्त झाल्याची पूर्तता दाखवावी.

13) पुरवठा आदेश क्रमांक 219, दिनांक 02/03/2016 नुसार 63 नग झेरॉक्स मशीन पुरवठा आदेश दिलेला आहे. परंतु, पुरवठादार मे.रिको इंडिया लिमिटेड, दिल्ली हे केंद्र शासनाच्या दर करारावरील निविदाकार आहेत. सदर निविदाकाराचा दर करार पुरवठा कालावधी दिनांक 07/04/2015 ते दिनांक 22/01/2016 असा होता. तसेच सदर निविदाकाराला केंद्र शासनाने मुदतवाढ दिल्याचे कोणतेही लेखे नस्तीसोबत नाहीत. असे असताना देखील नियमबाह्यपणे पुरवठा आदेश दिलेला आहे.

**3.755 समाजमंदिर बांधणे खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रुपये 6,02,384/- खर्च करण्यात आला आहे. कामाच्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मागासवर्गीय वस्तीत समाजमंदिर बांधणेसाठी समाजकल्याण विभागाने सन 2015-2016 या वर्षासाठी नमुना 21(अ) वार्षिक लेख्यामध्ये 20 टक्के सेस मधून रक्कम रुपये 85,00,000/- एवढी मागील व चालू वर्षातील कामासाठी तरतूद केली होती. परंतु, प्रत्यक्षात खर्च मात्र रुपये 6,02,384/- एवढा झाला असून अखर्चित रक्कम रुपये 78,97,616/- एवढ्या मोठ्या प्रमाणावर रक्कम अखर्चित राहण्याचे कारण काय? याबाबत खुलासा करावा.

2) निधी प्राप्त असतांना सदर योजनेच्या कामांना प्रशासकीय मंजूरी वर्षाच्या शेवटी देण्याचे कारण काय? योजनेच्या खर्चाला मंजूरी वर्षाच्या सुरुवातीला देण्यात आली असती, तर सदर वित्तीय वर्षात निधी खर्च झाला असता.

3) समाजमंदिराच्या बांधकामासाठी जागा बक्षिसपत्राने घेण्यात आल्या आहेत. परंतु, सदर जागा जिल्हा परिषदेच्या नावाने करुन महसूल खात्याकडील 7/12 उतारे घेण्यात आले नाहीत.

4) समाजकल्याण विभागात बांधकाम नोंदवही न ठेवल्यामुळे किती कामे मंजूर झाली? किती कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले? कामाची मुदत किती? काम केव्हा पूर्ण झाले? याबाबतची अचूक पडताळणी करता आली नाही.

5) मुळ लेखापरिक्षण अहवालासोबत जोडलेल्या समाजमंदिर विकासकामे 20 टक्के जिल्हा परिषद सेसमध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे 5 कामे सन 2015-2016 मधील अपूर्ण असून दिनांक 30/04/2017 अखेर सदर कामे अपूर्णच आहेत. तरी प्राधान्याने ती पूर्ण करावीत.

**3.756 मागास वर्गीयांना 90 टक्के अनुदानावर पॉवर स्प्रे पंप पुरविणे खरेदीतील अनियमितता**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 383, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 4,74,838/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग व उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भां.ख.रा/ 2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील परिच्छेद 11 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरची खरेदी प्रतिवर्षी 15 फेब्रुवारी पर्यंतच करणे आवश्यक आहे. परंतु, सदरील बाबतीत वरील शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याचे दिसून येत आहे.

2) डिलीव्हरी चलनावर पुरवठा केलेल्या पॉवर स्प्रे पंपाचे मॉडेल व पंपाचे सांकेतांक तसेच मोटर इंजिनचे सिरियल नंबर नमुद नाहीत. त्यामुळे पुरवठेदाराने पुरविलेले पंप व लाभार्थ्यांना देण्यात आलेले पंप योग्य असल्याची खात्री होत नाही.

3) समाजकल्याण समिती सभा दिनांक 11/03/2016 च्या सभेतील ठराव क्रमांक 731 ने प्राप्त लाभार्थ्यांचे सर्व ठराव मंजुर करण्यात आले. त्या अनुषंगाने ठरावांची पडताळणी केली असता लाभार्थी श्री. उमेश महादेव गोसावी रा. होडावडे तालुका वेंगुर्ला यांचा प्रस्तावावरील आवक शिक्क्याची पहाणी केली असता दिनांक 20/03/2016 रोजी प्राप्त झाल्याचे दिसते. अशा लाभार्थ्याचा अर्ज दिनांक 11/03/2016 च्या सभेत कोणत्या आधारे मंजुर करण्यात आला?

4) करारनामा अट क्रमांक 5 नुसार रक्कम रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर लाभार्थ्याकडून सदरचा पॉवर स्प्रे पंप विकणार नाही, असे हमीपत्र घेणे आवश्यक आहे. तथापि, ते घेण्यात आल्याचे कार्यनस्ती तपासली असता आढळून आलेले नाही.

5) पुरवठा चलन तपासले असता सदरील चलनापैकी कुडाळ, सावंतवाडी, व दोडामार्ग तालुक्याच्या चलनावर साहित्य प्राप्त झाल्याच्या तारखा नाहीत. परिणामी साहित्य वेळेत पोहोच झाल्याची खात्री होत नाही.

**3.757 माध्यमिक शाळेत शिकणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती (अनु.जाती) वितरणातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** समाजकल्याण विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करते वेळी लेखे तपासले असता महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक इबीसी/ 2003/ प्र.क्र. 486/मावक-2, दिनांक 09/02/2007 नुसार प्रमाणक क्रमांक 970, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रूपये 2,08,000/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पावशी शाळा नंबर 1 लाभार्थी - 5, शाळेने जावक क्रमांक 96, दिनांक 21/08/2014 ने विद्यार्थ्यांची शिफारस केलेली आहे. तथापि, सोबत गुणपत्रक नाही.

2) जिल्हा परिषद केंद्रशाळा, माणगाव नंबर 1 ने जावक क्रमांक 108, दिनांक 14/08/2014 ने कुमारी नुतन धाकू कदम इयत्ता 6 वी च्या नावाची शिफारस केलेली असून सोबत गौरव नारायण कदम या विद्यार्थ्याचे गुणपत्रक जोडण्यात आलेले आहे. नावात विसंगती आढळून येत आहे.

3) ज्या विद्यार्थ्यांचे पैसे त्यांचे स्वत:च्या बॅकखाते पासबुकवर जमा करण्यात आलेले आहेत. कार्यालयाकडील बँकेची पोहोच तपासणीसाठी उपलब्ध झाली. परंतु, विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकाची सदर नोंदीची सत्यप्रत अथवा विद्यार्थ्याची पोहोच दप्तरी आढळून आलेली नाही.

4) प्रमाणक क्रमांक 970, दिनांक 31/03/2016 रूपये 2,08,000/- मध्ये नमुद केलेल्या शाळांपैकी वाघेरी नंबर 1, शिडवणे नंबर 1 ओटव, खारेपाटण, व अनुक्रमांक 7, 17, 18 वरील नमुद शाळांतील विद्यार्थ्यांचे शिष्यबृत्तीचे पैसे शाळेच्या खात्यावर जमा करण्यात आलेले आहेत. सदरचे पैसे संबधितांस पोहोच झाल्याबद्दल पोहोच पावती संबधित शाळेच्या मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीसह घेण्यात आलेली नाही. परिणामी पैसे संबधितांस मिळाल्याची लेखापरीक्षणात खात्री होत नाही.

**3.758 मागासवर्गीय लाभार्थींना 100 टक्के अनुदानावर झेरॉक्स मशिन पुरविणे (2014-2015).**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 752, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 49,87,616/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/ प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 19/03/2012 मधील बाब क्रमांक 5 बांधकामे /विकास योजनांच्या निविदा किंवा कंत्राट स्विकृती बाबत अनूक्रमांक 5 नुसार सभापती विषय समिती यांना रूपये 20,00,001/- ते रूपये 23,00,000/- व अनूक्रमांक 6 नुसार विषय समीती यांना रूपये 23,00,001/- ते रूपये 30,00,000/- मर्यादेच्या आत कंत्राट स्विकृतीचे अधिकार आहेत. विषय समिती ठराव क्रमांक 183, दिनांक 15/10/2015 अन्वये विषय समिती इन्टरनॅशनल इलेक्ट्रॉनिक्स ड कम्युनिकेशन सिस्टीम प्रा.लि., मुंबई यांची निवड प्राप्त दर करारानुसार केली आहे. विषय समिती यांचे अधिकारात रूपये 49,87,616/- चे कंत्राट स्विकृत केले आहे. अनूक्रमांक 7 नुसार रूपये 25,00,001/- ते रूपये 50,00,000/- पर्यत कंत्राट स्विकृतीचे अधिकार स्थायी समिती यांना आहे. तरी शासन तरतुदीनुसार कंत्राट स्विकृतीस स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता प्राप्त करुन अनुपालन सादर करावे.

2) योजनेस सन 2014 -2015 या वर्षात अंदाजपत्रकीय तरतूद केलेली व प्रशासकीय मान्यता असतांना सन 2014-2015 मध्ये प्रत्यक्ष खर्च न करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

3) विषय समिती ठराव क्रमांक 183 दिनांक 15/10/2015 च्या इतिवृत्तात झेरॉक्स मशिन खरेदीसाठी खालील तीन पुरवठादारांची नांवे नमुद आहेत. अनुक्रमांक 2 व 3 या पुरवठादारांचे दर नमुद नाहीत. नस्तीसोबत या पुरवठादारांचे दर करार लावलेले नाहीत. तसेच झेरॉक्स मशिन खरेदीसाठी खरेदी समिती गठित केली आहे. या समितीची बैठक दिनांक 10/02/2016 रोजी झाली. यात इतर पुरवठादारांच्या दराचा उल्लेख नाही. अर्धसमास पत्र क्रमांक 5, दिनांक 23/05/2017 अन्वये दर कराराच्या प्रती मागणी करूनही उपलब्ध करून देणेत आल्या नाहीत.

4) विषय समिती व खरेदी समिती यांच्या इतिवृत्तात झेरॉक्स मशिन खरेदी संदर्भात काय निकष लावले, याचा तपशिल नाही. त्यामुळे इतर पुरवठादारांच्या दर करातील दर काय होते, याची पडताळणी करता आली नाही.

5) झेरॉक्स मशिनचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.4. व परिशिष्ट क्रमांक 8 मधील संस्थांकडून साहित्याची तपासणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे दर करारातील स्पेसिफिकेशनप्रमाणे प्राप्त साहीत्याचा दर्जा व गुणवत्ता अचुक होती किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही.

6) सन 2014-2015 या वर्षाची साठा नोंदवही अर्धसमास पत्र क्रमांक 7, दिनांक 05/06/2017 अन्वये मागणी करून लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे जिल्हा परीषद व पंचायत समिती यांना साहित्य कधी प्राप्त झाले व लाभार्थ्यांना साहित्य कधी वाटप झाले, याची पडताळणी करता आली नाही.

7) जिल्हा परिषद उत्पन्नातून मागासवर्गीयांचे कल्याणासाठी खरेदी केलेले खालील साहित्य वाटपांचे प्रस्ताव लेखापरीक्षणास पडताळणी कामी उपलब्ध झाले नाहीत. सदरची प्रकरणे अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 27/04/2017 व अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 11/05/2017 अन्वये मागणी करण्यात आली होती.

8) सन 2014-2015 झेरॉक्स मशीन पुरविणे वाटपाच्या प्रकरणांची पडताळणी केली असता काही लाभार्थ्यांचे प्रस्ताव व इतर अनुषंगिक कागदपत्रे अप्राप्त असल्याचे आढळून आले. त्यामुळे लाभार्थी योजनेस पात्र होते किंवा कसे, याची खात्री करता आली नाही.

**3.759 मागासवर्गीय शेतक-यांना 100 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणे (2015-2016).**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 29,96,865/- खर्च झालेला आहे. मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरवण्याच्या योजनेत मे. लॅमीफॅब पेपर प्रा.लि., औरंगाबाद यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्याबाबतच्या नस्तीचे अवलोकन केले असता पुढील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) लॅमीफॅब पेपर प्रा.लि., औरंगाबाद यांचे दरकरारानुसार मूळ दर एकूण रुपये 72.85 व सुधारीत दर एकूण रूपये 78.06 आहे. तसेच स्मार्ट फॅब्रीक, हावडा यांचे दर करारानुसार दर एकूण रुपये 72.56 आहे. DGS & D कलकत्ता यांचे पत्र क्रमांक 762, दिनांक 02/02/2015 अन्वये स्मार्ट फॅब्रीक हावडा, पश्चिम बंगाल, कलकत्ता यांचे दर करारानुसार प्रति चौ.मी. मूळ दर रुपये 69.10 आहेत. तसेच एक्साईज डयुटी निरंक आहे व व्हॅट 5 टक्के नमूद आहे. यानुसार प्रति चौ.मी. दर रुपये 72.56 आहे. प्रत्यक्षात लॅमी फॅब. पेपर प्रा.लि., औरंगाबाद यांचेकडून वरीलप्रमाणे प्रती चौरस मीटर रुपये 78.06 दराने ताडपत्री खरेदी केली आहे. स्मार्ट फॅब्रीक यांचे दर (78.06 - 72.56 = 5.50) रुपये 5.50/- प्रती चौ.मी. ने कमी आहेत. त्यानुसार स्मार्ट फॅब्रीक यांचेकडून खरेदी केली असती तर (54 चौ.मी. X 5.50 = 297) प्रती नग रुपये 297/- प्रमाणे एकूण 711 नग ताडपत्री खरेदीसाठी रुपये 2,11,167/- कमी खर्च आला असता. तरी कमी दराची ताडपत्री खरेदी न करण्याबाबत खुलासा करून संबंधीतांकडून रक्कम रुपये 2,11,167/- वसूल करून अनुपालन सादर करावे.

2) विषय समीती ठराव क्रमांक 191, दिनांक 30/11/2015 मध्ये ताडपत्री पुरवणेसाठी खालील 3 पुरवठादारांचे दरकरार नमुद केले आहे. तथापि, ठरावात फक्त लॅमीफॅब. पेपर प्रा.लि., औरंगाबाद यांचेच दर नमुद केले आहेत. इतर खालील 2 पुरवठाधारकांचे दर नमुद केलेले नाहीत. तसेच मे. आदिनाथ पॉलीफॅब प्रा.लि. यांचे दर कराराची प्रत नस्तीसोबत नाही. अर्धसमास पत्र क्रमांक 5, दिनांक 24/05/2017 अन्वये उर्वरित दर करारांच्या प्रती मागणी करुन मे.आदिनाथ पॉली फॅब यांचे दर करार लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे दराबाबत तुलना करता आली नाही. त्यामुळे ताडपत्री खरेदीसाठी कोणते निकष लावले व लॅमी फॅब पेपर प्रा.लि., औरंगाबाद यां कंपनीची निवड कशाच्या आधारे केली, याचा बोध होत नाही.

3) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार खरेदी समिती गठीत केली आहे. समितीची बैठक दिनांक 10/02/2016 रोजी झाली. इतिवृत्तानुसार मे. लॅमीफॅब. पेपर प्रा.लि., औरंगाबाद यांचेकडून शासनाकडील दर करारानुसार खरेदी करणेकामी निर्णय घेण्यात आला. तथापि, इतिवृत्तात पुरवठादार निवडीच्या निकषाबाबत तपशिलवार विवेचन नाही. तसेच अर्धसमास पत्र क्रमांक 4 दिनांक 23/05/2017 अन्वये खरेदी समितीची नस्ती मागणी करुन देखील लेखापरिक्षणात उपलब्ध करण्यात आली नाही. तरी काय निकषानुसार पुरवठादार संस्थेची निवड केली, याचा खुलासा करावा.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी नमूद वेळापत्रकानुसार झालेली नाही.

5) साहीत्य चाचणी अहवाल लॅमीफॅब.ड पेपर प्रा.लि., औरंगाबाद यांचा घेण्यात आला आहे. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.4. व परिशिष्ट क्रमांक 8 मधील संस्थांकडून साहित्याची तपासणी करणे आवश्यक आहे. चाचणी अहवाल पुरवठादार संस्थेचा आहे. त्यामुळे दर करारातील स्पेशीकेशन प्रमाणे प्राप्त साहीत्याचा दर्जा व गुणवत्ता अचुक होती किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही. तरी आवश्यक त्या संस्थेकडून तपासणी अहवाल घेणेत यावा.

6) सन 2015-2016 ताडपत्री वाटपाच्या प्रकरणांची पडताळणी केली असता 4 लाभार्थ्यांचे प्रस्ताव व इतर अनुषंगिक कागदपत्रे अप्राप्त असल्याचे आढळून आले. त्यामुळे लाभार्थी योजनेस प्राप्त होते किंवा कसे, याची खात्री करता आली नाही. तरी सदर 4 लाभार्थ्यांचे आवश्यक ती कागदपत्रे व प्रस्ताव प्राप्त करून अनुपालन दर्शवावे.

7) जिल्हा परिषद उत्पन्नातून मागासवर्गीयांचे कल्याणासाठी खरेदी केलेले साहित्य वाटपांचे प्रस्ताव लेखा परीक्षणास पडताळणी कामी उपलब्ध झाले नाहीत. सदरची प्रकरणे अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 27/04/2017 व अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 11/05/2017 अन्वये मागणी करण्यात आली होती. तरी बागलाण, दिंडोरी, इगतपुरी, नांदगाव, मालेगाव, नाशिक, निफाड, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, येवला, सिन्नर या तालुक्यांचे साहित्य वाटपांचे प्रस्ताव प्राप्त करून लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

**3.760 नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजना अंतर्गत योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** सन 2015-2016 या वित्तीय वर्षात समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांना महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक दवसु-2011/प्र.क्र.442/अजाक-1, दिनांक 20/12/2012 योजना प्रभावी राबविण्यासाठी अंशत: बदल करण्यात येवून नवबौध्द घटकांचा विकास योजना म्हणून योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक दवसु-2011/प्र.क्र.442/अजाक-1, दिनांक 20/12/2012 योजना प्रभावी राबविण्यासाठी अंशत: बदल करण्यात येऊन नवबौध्द घटकांचा विकास योजना म्हणून योजना कार्यान्वीत करण्यात येऊन आदेशातील मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजनेतील कामे दोन वर्षात पुर्ण करणे बंधनकारक असतांना सन 2005-2006 ते 2015-2016 अखेर 1,533 कामे अपुर्ण आहेत. सदर कामांवर वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार ग्रामपंचायतीस बांधकामापोटी अनुदान वितरित करण्यात येऊनही लेखापरीक्षण पावेतो अपुर्ण आहेत.

2) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक दवसुयो/परिपुर्ण प्रस्ताव/का-12/95-96, दिनांक 01/12/1995 अन्वये अट क्रमांक10 नुसार 1 वर्षाचे आंत काम पुर्ण न झाल्यास मंजूर रक्कम ग्रामपंचायतीकडून वसुल केली जाईल. तसेच सदरचा निधी इतर प्रयोजनार्थ वापर केल्यास ग्रामसेवक जबाबदार राहील व दिशाभूल केली असल्यास प्रशासकीय कार्यवाहीस पात्र राहील, असे नमूद असतांना सन 2005-2006 ते 2015-2016 अखेर 1,533 कामे अपुर्ण आहेत. समाज कल्याण विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. अशा मोठया स्वरुपातील रकमेचा इतर प्रयोजनार्थ वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.474/ वित्त-9, दिनांक 03/12/2011 नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास योजनांतर्गत 5 टक्के निधी कपात न करता ग्रामपंचायतींना मंजूर केलेल्या विकास कामांचा दर्जा राखून मंजूर केलेली कामे नियमानुसार पुर्ण करुन देयक प्रदान करतांना जी रक्कम शिल्लक राहील. ती ग्रामपंचायतीच्या स्व:निधीत भरणा केल्याचे दिसत नाही.

4) सदरची कामे मक्तेदारामार्फत केली असल्यास विक्रीकर विभाग, महाराष्ट्र राज्य, यांचेकडील अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार दिनांक 01/04/2015 पासून 5 टक्के मुल्यवर्धित कर कपात करुन शासन सदरी भरणा केलेबाबत समाज कल्याण विभागाने नस्तीसोबत दस्तावेज दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/ प्र.क्र.108/ कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 अन्वये 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसुल केलेला नाही.

6) जिल्हाधिकारी, नाशिक यांचे पत्र क्रमांक जिनिस/कक्ष-12/संकीर्ण-801, दिनांक 29/07/2008 आणि पत्र क्रमांक 919, दिनांक 04/09/2008 नुसार पुर्ण-अपुर्ण कामांचे भूमीपूजन समारंभाकरिता स्थानिक लोक प्रतिनिधींना निमंत्रण दिलेचे अभिलेखे दिसून येत नाही. पुर्ण कामांबाबत कोनशिला, नामफलक, कामाचे नांव, योजना, मंजूर वर्ष, फोटो इत्यादी अभिलेखे उपलब्ध केलेले नाहीत.

7) पंचायत समीती स्तरावर सन 2015-2016 मध्ये रूपये 1,91,37,838/- इतके अनुदान वित्त प्रेषणाव्दारे वितरीत केले आहे. तथापि, संबंधीत गटविकास अधिकारी यांचेकडून विनीयोग दाखले प्राप्त केले नाही. त्यामुळे अनुदान खर्च झाल्याची खात्री करता आली नाही. तरी विनीयोग दाखले उपलब्ध करून अनुपालन दर्शवावे.

**3.761 स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात योणा-या मागास वर्गीय अनुदानीत वसतीगृहांना सहायक अनुदान देणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** समाजकल्याण विभागांतर्गत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 4,26,90,139/- समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणा-या वस्तीगृहांना अनुदान वितरीत

करण्यात आलेले आहे व सन 2015-2016 या वर्षासाठी 40 टक्के अनुदान 102 वस्तीगृहांना वितरीत करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/ प्र.क्र.107/मावक/4, दिनांक 16/03/1998 मधील जोडपत्र अ व शासन निर्णय विभशा/2010/प्रक्र-6/विजाभज-2/ दिनांक 29/12/2011 नुसार या योजनेच्या मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. नोंदणीकृत सनदी लेखापाल यांचा लेखापरिक्षण अहवाल चालु वर्षाच्या ऑक्टोबर अखेर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा समाज कल्याण अधिकारी यांना सादर केला पाहिजे. त्याप्रमाणे सनदी लेखापाल यांचे अहवाल सादर झालेले नाहीत, संस्थानी प्रस्तावासोबत अहवाल सादर केलेले आहेत.

अनुदानीत संस्थेसाठी खालील प्रमाणे अटी आहेत.

1) संस्थने किमान रुपये 10,000/- शिल्लक राखुन ठेवणे

2) ओषधांचा साठा असावा,

3) वस्तीगृहास मान्यता देतांना ते समाज कल्याण विभागाच्या योजना आराखडयात समाविष्ट असावे.

4) वित्तीय वर्षात प्रवेश पूर्ण झाल्यानंतर त्या नापास व त्याच वर्गात राहिलेला विदयार्थी नाही, याची पडताळणी समाज कल्याण निरिक्षक यांनी करावी

1) महाराष्ट्राबाहेरील विदयार्थी नसावा व स्थानिक रहिवासी नसावा.

2) 31.10 पर्यत त्या वर्षाचा सनदी लेखापालाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल व अनुदान प्रस्ताव सादर करावेत अन्यथा 5 टक्के पर्यंत दंडाची तरतूद आहे.

1) प्रत्येक उणीवा बदल रुपये 1,000/- पर्यत दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

2) किमान 1 महिना पुरेल इतका धान्य साठा संस्थेत असावा,

3) उत्पन्न मर्यादा रुपये 24,000/-

4) हजेरी 75 टक्के असावी व साफ सफाई असावी, सदर हजेरी ही बायोमेट्रीक हजेरी असावी

5) शासन निर्णय सीसीएच/2007/प्रक्र.361/मावक-4, दिनांक 23/11/2007 परिच्छेद क्रमांक अ नुसार प्रवेश स्थिती निश्चित केलेली आहे. त्याप्रमाणे प्रवेश देणे आवश्यक असतांना वसतीगृहात त्याप्रमाणे प्रवेश स्थिती आहे. याबाबत प्रमाणपत्र अनुदान निर्धारण प्रस्तावासोबत जोडण्यात आलेले नाही व प्रवर्गानुसार तशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) संस्थेत किती धान्य साठा आहे? हे निरिक्षण अहवालात व सनदी लेखापाल यांचे अहवालात नमुद नाही. साठा नोंदवही प्रत जोडण्यात आलेली नाही अथवा निरिक्षकांचा याबाबत अभिप्राय नमुद करण्यात आलेला नाही. त्यामुळे या अटीचे पालन संस्था करीत आहे, हे तपासता आलेले नाही.

2) जिल्हा परिषदेने मंजूर केलेल्या अनुदान निर्धारण नस्तीचे लेखापरिक्षण केले असता विदयार्थाची बायोमेट्रीक हजेरी वसतीगृहात घेण्यात येत नाही. बायोमेट्रीक हजेरी आवश्यक असतांना तशी हजेरी कोणत्याही संस्थेने घेतलेली नाही. त्यामुळे संस्था रुपये 1,000/- प्रमाणे 108 संस्थेकडून 1,08,000/- दंड आकारणी करून वसुल करणे आवश्यक आहे.

3) वस्तीगृहात औषध साठा आहे हे निरिक्षण अहवाला नमुद करण्यात आलेले नाही. त्यामुळे वसतीगृहात ओषध साठा आहे, हे दिसून येत नाही.

4) वस्तीगृहाचे ताळेबंद जोडण्यात येत नाही. त्यामुळे वसतीगृहात असलेला जडसंग्रह, किमान शिल्लक, धान्य साठा, या बाबी तपासता आलेल्या नाहीत. सनदी लेखापाल यांचे जमा व खर्च तक्ते जोडलेले आहेत. संस्थेचा ताळेबंद जोडण्यात येत नाही. त्यामुळे संस्थेच्या आर्थिक स्थितीचा बोध होत नाही.

5) संस्था धान्य, किराणा, व वस्तीगृहासाठी साहित्य खर्च करीत असतात सदर खरेदी ही मुल्यवर्धीत कर नोंदणीकृत पुरवठा धारका कडून खरेदी करीत नाहीत. सबब पुरवठा धारकांच्या बीलावर मुल्यर्धीत कर नोंदणी क्रमांक नमुद नाही. शासकिय अनुदान घेण्या-या संस्थानी मुल्यवर्धीत कर नोंदणीकृत पुरवठाधारकाकडून खरेदी करणे आवश्यक आहे. खरेदी ही रोख करण्यात आलेली आहे. संस्था वित्तीय नियमाप्रमाणे खरेदी करीत नाहीत. मागील

सन 2013-2014 वर्षाच्या अहवालात याबाबत अभिप्राय नोंदविण्यात आलेले आहेत. तरी देखील या बाबी संबंधीत संस्थाच्या निदर्शशास आणुन देण्यात आलेल्या नाहीत.

6) सन 2015-2016 या वर्षात समाज कल्याण विभागाने संबंधीत संस्थाचे सन 2013-2014 या वर्षाचे अनुदान निर्धारण केलेले आहे. सन 2014-2015 व सन 2015-2016 चे अनुदान निर्धारण बाकी आहे. त्यामुळे मोठया प्रमाणत अनुदान शासनाकडून येणे असतांना येणे अनुदानाचा तपशील तयार करुन अनुदानाची मागणी शासनाकडे केलेली नाही व येणे अनुदानाचे दायीत्व वित्त विभागास कळविण्यात आलेले नाही. तरी नियमित अनुदान प्राप्त करणेबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच येणे अनुदानाचे दायित्व शासनास कळविणे आवश्यक आहे.

7) लेखापरिक्षण अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक 2 नुसार संस्थानिहाय अभिप्राय देण्यात आलेले आहेत. त्यानुसार रुपये 2,85,500/- संबंधीत संस्थेकडून वसूल करणे आवश्यक आहे.

**3.762 राज्याबाहेरील विदयार्थाना वस्तीगहात प्रवेश देणेबाबत व अनुदान घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** महाराष्ट्र शासन, समाजकल्याण सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्रक्रमांक107/मावक/4, दिनांक 16/03/1998 मधील जोडपत्र अ व शासन निर्णय विभशा/2010/प्रक्र-6/विजाभज-2/ दिनांक 29/12/2011 नुसार या योजनेच्या मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. मार्गदर्शक सुचनेप्रमाणे विदयार्थी हा महाराष्ट्रा बाहेरी व स्थानिक रहिवासी नसावा, अशी अट समाविष्ट आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत

उपरोक्त नमुद प्रमाणे वसतीगृहात राज्याबाहेरील विदयार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. शासन निर्णय 29/12/2011 नुसार राज्याबाहेरील विदयार्थाना शासकीय अनूदान अनुज्ञेय नाही. तरी राज्याबाहेरील 7 विदयार्थाना देण्यात आलेले अनुदान (7x900x10) वार्षिक रूपये 9,000/- प्रमाणे रूपये 63,000/- इतके अनुदान देण्यात आलेले आहे. राज्याबाहेरील विदयार्थाना अनुदान अनुज्ञेय ठरत नाही.

**3.763 प्राथमिक/माध्यमीक शाळेत शिक्षण घेणा-या मागास वर्गीय विदयार्थाना शिष्यवृत्ती प्रदान करणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** समाजकल्याण विभागाने सन 2015-2016 शि्ष्यवृत्ती व गुणवत्ता शिष्यवृतती या वर्षात 14 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 18,22,800/- प्रदान केलेले आहेत

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक इबीसी/1094/प्रक्र-109/मावक-2, दिनांक 17/08/1995 व शासन निर्णय इबीसी/2012/प्रक्र.-151/शिक्षण 1, दिनांक 04/10/2013 अन्वये शि्ष्यवृत्ती योजनेत खालील अटींनुसारअनुदान अनुज्ञेय आहे. विद्यार्थी शासकीय मान्यता प्राप्त शाळेत शिकणारा असावा. पालकाच्या उत्पन्नची मर्यादा रुपये 2.00 लक्ष असावे. योजने अंतर्गत विदयार्थाने अर्ज करणे आवश्यक आहे व समाज कल्याण अधिकारी हे तक्रार निवारण अधिकारी व अंमलबजावणी अधिकारी आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) शाळा स्तरावरुन ऑनलाईन अर्ज भरण्यात आलेले आहेत. त्या अर्जाच्या यादया डाऊनलोड करुन समाजकल्याण विभागाने संबंधीत विदयार्थाच्या बॅक खात्यात रक्कमा वर्ग केलेल्या आहेत. विहित अटी प्रमाणे पालकाचे उत्पन्न दाखला, विदयार्थाचे अर्ज, जातीचा दाखला इत्यादी बाबी तपासण्यात आलेल्या नाही.

लाभार्थी निवडी बाबत समाजकल्याण विभागात पडताळणी करण्यात आलेली नाही, लाभार्थी निवड पडताळणी मुख्याध्यापकांनी केलेली आहे व त्यानुसार लाभार्थाना रक्कमा अदा करण्यात आलेल्या आहेत. शासन निर्णयात नमुद अटीचे पालन झालेले आहे याबाबत पडताळणी होणे आवश्यक आहे.

2) समाजकल्याण विभागाकडून बॅक खात्यात वर्ग केलेल्या काही रक्कमा तांत्रिक कारणामुळे बॅकेने समाजकल्याण अधिकारी याचे बॅक खात्यात वर्ग केलेल्या आहेत, अशा रक्कमा मोठया प्रमाणत आहेत.

समाजकल्याण विभागास परत आलेल्या रक्कमा पुन्हा कॅश बुक मध्ये जमा बाजूला दर्शविलेल्या नाहीत. त्यामुळे बॅक शिल्लक व कॅश बुक शिल्लक यात मोठया प्रमाणात तफावत आहे. तरी याबाबत योग्य संनियत्रण करुन प्रलंबीत रक्कमा लाभार्थ्यांना अदा करणे आवश्यक आहे व अखर्चित निधी शासनाकडे परत करणे आवश्यक आहे.

**3.764 जिल्हा परिषदेच्या उत्पनाच्या 20 टक्के रक्कम मागास वर्गीयाच्या कल्याणासाठी व 3 टकके अंपग कल्याण योजनावर तरतूद करुन खर्च करणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/2007/प्र.क्र.-4871/वि-3, दिनांक 05/10/2012 नुसार अर्थसंकल्पात 3 टक्के पर्यत तरतूद करणे व सदर रक्कम अंपगाच्या वैयक्तीक लाभाच्या योजनेवर निधी खर्च करणेबाबत नियोजन करणेबाबत तरतूद विशद करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद सेस निधीतून मागास वर्गीयासाठी 20 टक्के खर्च करणे आवश्यक आहे, समाजकल्याण विभागाने जिल्हा परिषदने केलेली निधीची तरतूद, केलेला खर्च व शिल्लक अनुषेश या बाबत नोंदवही ठेवलेली नाही. मागील लेखापरिक्षण अहवालातील नमुद अनुषेश व लेखापरिक्षण कालावधीतील अनुदान याप्रमाणे अनुशेष परिगणीत करण्यात आलेला आहे. सदर परिगणनेप्रमाणे नमुद केलेला अनुशेष समाज कल्याण विभागाने प्रत्यक्ष अनुदान व निधीची तरतूद या प्रमाणे पडताळणी करुन अनूशेष बरोबर असल्याची पडताळणी करणे आवश्यक आहे व जिल्हा परिषदेकडून अनुशेषासह निधीची तरतूद प्राप्त करुन मागास वर्गीयांसाठी योजना राबविणे आवश्यक आहे. दिनांक 31/03/2016 अखेर रुपये 19,66,588/- इतका अनुशेष नमुद करण्यात येत आहे.

2) अंपगासाठी 3 टक्के निधी अनुशेष परिगणीत करण्यात आलेला नाही व अनुषेश नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. मागील लेखापरिक्षण अहवालात नमुद अनुषेश सन 2015-16 अखेर अंपग कल्याण योजनेचा रुपये 15,27,945/- इतका अनुषेश नमुद करण्यात येत आहे. समाजकल्याण विभागाने अंपग कल्याण योजनेसाठी जिल्हा परिषद उत्पनानुसार 3 टक्के इतक्या निधीची मागणी केलेली नाही व लेखापरिक्षण कालावधीत खर्च नोंदविलेला नाही.

तरी समाजकल्याण विभागाने 3 टक्के निधीची मागणी करुन अनुषेशाबरोबर असल्याची पडताळणी करुन अपंग कल्याण योजना राबविणेबाबत तजवीज करणे आवश्यक आहे.

**3.765 मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वाटपातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद, नंदुरबार समाजकल्याण विभागाने सन 2015-2016 मध्ये इयत्ता 5 वी ते 7 वी (वि.जा.भ.ज.एन.टी.) मध्ये शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वाटपाकरीता पत्र क्रमांक 1498, दिनांक 31/03/2016 एकूण रक्कम रुपये 1,66,200/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक इबीसी-2003/प्र.क्र.116/मावक-2, दिनांक 23/05/2003 चे परिशीष्ट - अ सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेच्या नियमावलीतील नियम क्रमांक 5 अन्वये विद्यार्थीनींची उपस्थीती नियमित असणे आवश्यक राहील. परंतु, शाळेतील विद्यार्थीनींची उपस्थितीची टक्केवारी मोघम स्वरुपात दर्शविली जाते.

2) शासन निर्णय दिनांक 23/05/2003 नुसार नियम क्रमांक 11(अ) अन्वये अट 10 मधील नमूद माहिती मुख्याध्यापकांकडून 10 जुलैपर्यंत मागविणे समाजकल्याण अधिकारी यांचेवर बंधनकारक आहे. असे असताना कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) शासन निर्णयातील नियम क्रमांक 11 (ब)(क) अन्वये ही शिष्यवृत्ती वर्षातून तीनदा जून व जुलै महिन्याकरीता 26 जुलै, ऑगस्ट व सप्टेंबरकरीता दिनांक 22 सप्टेंबर तसेच सप्टेंबर व ऑक्टोबर व उर्वरीत कालावधीसाठी 3 जानेवारी या ठराविक दिवशीच समारंभपूर्वक ग्रामपंचायतीकडे वितरीत करुन वाटप करावी. अशी तरतूद असताना वर्षाची एकत्रीत शिष्यवृत्ती एकदाच प्रदान करण्यात असल्याचे आढळले.

4) शासन निर्णयातील नियम क्रमांक 8 नुसार शिष्यवृत्ती वाटप केल्याचे विनियोग दाखले हे पुढील वर्षाचे प्रस्ताव सादर करताना देणे आवश्यक राहील, असे असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5) जिल्हा परिषदेने वाटप केलेली शिष्यवृत्तीपैकी अखर्चीत रक्कम शाळेकडे आहे किंवा कसे? याची माहिती शाळेकडून समाजकल्याण विभागाने मागविणे आवश्यक असतांना तसे आढळले नाही.

6) शासन निर्णयातील नियम क्रमांक 10 अन्वये शाळानिहाय विद्यार्थीनींची माहिती, मंजूरी आदेश व केलेल्या खर्चाबाबत नियंत्रण नोंदवही तपासणीकामी प्राप्त झाली नाही.

7) शिष्यवृत्ती मागणी प्रस्तावावर रक्कम प्रदानार्थ समाजकल्याण अधिकारी यांची आदेशासह स्वाक्षरी केली जात नाही.

8) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य क्रीडा व विशेष सहाय्य विभागाचे परिपत्रक दिनांक 23/05/2003 च्या नियमावलीतील बाब क्रमांक 11(अ)(ड) अन्वये कार्यवाही झालेली नाही. संबंधीत शाळेकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेतले जात नाही.

9) लेखापरीक्षणात मूळ प्रमाणके तपासणीत प्राप्त झाले नाही.

10) सदरची रक्कम 18 शाळांच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे. शाळेच्या प्रस्तावावर विद्यार्थीनींचे बँक खाते क्रमांक बऱ्याच ठिकाणी नोंद केली नाही. त्यामुळे विनियोगाची खात्री करता आली नाही.

**3.766 शालांत पुर्व शिक्षण घेत असलेल्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृती देण्याची योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** शालांत पुर्व शिक्षण घेत असलेल्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे योजनेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक ईडीडी-2003/प्र.क्रमांक71/सुधार-2 दिनांक 15/11/2003 अन्वये संबधित शिक्षण संस्था प्रमुखाने मंजुर शिष्यवृत्ती संबधित विद्यार्थ्यांस अदा केल्याची पोहोच पावती व विनियोग प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. असे असतांना शाळांनी उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक इडीडी-2003/प्र.क्रमांक71/सुधार-2/मुंबई दिनांक 15/11/2003 अन्वये अर्जदाराने जे शिक्षण पुर्ण केलेनंतर त्याच दर्जासाठी किंवा शिक्षणासाठी शिष्यवृती दिल्याचे प्रमाणित नाही. अर्जदार सदरहुन शिक्षणासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती खेरीज कोणतीही शिष्यवृत्ती/विद्यावेतन घेत नाही. पुर्ण वेळ शिक्षण घेत आहे, यांबाबतचे कागदपत्र सादर केलेले नाही.

3) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इडीडी2003/ प्र.क्र.70/सुधार2, दिनांक 15/11/2003 अन्वये नुतनीकरणाचा अर्ज परिशिष्ट ब मध्ये दिनांक 31 ऑगस्ट पुर्वी सादर करावे व नवीन अर्जदाराने परिशिष्ट अ मध्ये 30 सप्टेंबर पुर्वी अर्ज सादर करावे, असे असताना उशिराने अर्ज सादर करण्यात आले आहे. अटी व शर्तीचे पालन केलेले नाही. उदा.

1) नंदुरबार तालुका विधायक समिती, खाजगी प्राथमिक विद्यामंदीर, शनिमंडळ यांनी पंकज माधवराव पाटील, अस्थीरोग, 3 री यांचा प्रस्ताव दिनांक 03/11/2015 रोजी सादर केलेला आहे.

2) श्री.गोकुळदास देसाई, आदर्श मराठी मंदिर, आदर्श गुजराथी मंदिर यांनी कु.वेदिका सुनिल पिंगळे, कर्णबधीर, इयत्ता 3री यांचा नवीन अर्ज दिनांक 08/01/2016 रोजी सादर केलेला आहे.

**3.767 दलित वस्ती सुधार योजनांतर्गत कामांचे उर्वरित 10 टक्के रकमेचे वितरणाबाबत.**

**जिल्हा परिषद जळगाव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत कामांचे उर्वरित 10 टक्के रक्कमांचे 4 वितरण आदेश रक्कम रूपये 39,37,736/- चे निर्गमित करण्यात आलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दलित वस्ती निधी वितरित करतांना 90 टक्के रक्कम अदा केल्यानंतर उर्वरित 10 टक्के निधी वितरित करतांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2011/प्र.क्र.442/अजाक, दिनांक 05/12/2011 मधील परिशिष्ट-अ अनुक्रमांक 11 नुसार समाजकल्याण अधिकारी यांनी कामाची पाहणी करुन प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. तथापि, वरीलप्रमाणे निधी वितरित करतांना असे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाहीत.

2) याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 02, दिनांक 08/11/2016 नुसार कळविण्यात येऊन सुद्धा वरीलप्रमाणे निधी वितरणाबाबत सविस्तर प्रस्ताव जसे कामनिहाय 90 टक्के निधी विनियोग दाखले, काम पूर्णत्वाचे दाखले, कामाची देयके, समाजकल्याण अधिकारी यांचे कामाच्या पाहणीबाबतचे प्रमाणपत्र इत्यादीबाबतचे सविस्तर प्रस्ताव तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

3) वरीलप्रमाणे रक्कमा वितरित करण्याबाबतच्या खर्चाची प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

4) सन 2014-2015 व 2015-2016 मधील मंजूर अनुदानानुसार ग्रामपंचायतींना कामनिहाय 90 टक्के अनुदान प्रदान करण्यात आलेले आहे. तथापि, संबंधीत कामाचे अंतीम 10 टक्के अनुदानाचे प्रदान करतांना अंतीम बिलामधील कपाती व प्रत्यक्ष प्रदान रक्कम यांचा मेळ घेतले बाबतचा अहवाल नस्ती सोबत नसल्याने प्रत्यक्ष कपाती यापेक्षा जादा असल्यास संबंधीत ग्रामपंचायतींना अनुदानाचे अतीप्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी संबंधीत ग्रामपंचायतींना अंतीम प्रदान 10 टक्के रक्कम व त्यामधील कपातीसह प्रदाने यांचा मेळ घेवून जादा प्रदान झालेले असल्यास शासन सदरी रक्कमांचा भरणा करुन पुर्तता करावी.

**3.768 समाजकल्याण अधिकारी यांचे नांवे बँकेत खाते असतांना रोखवही नमुना नं. 7 ठेवले नसलेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगाव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** समाजकल्याण अधिकारी यांचे नांवे कॅनरा बँक, जळगांव येथे खाते उघडण्यात आलेले असून सदर खात्यामध्ये दिनांक 31/03/2016 अखेर मोठ्या प्रमाणात रक्कम रूपये 1,01,65,594/- शिल्लक असल्याचे बँकेच्या प्रमाणपत्रावरुन दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त खाते उघडण्याकरिता शासनाचे आदेश असल्यास लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 मधील नियम 55 नुसार सदर खात्यावर झालेल्या व्यवहारांची नोंद नमुना नं.7 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने सदर खात्यामध्ये जमा रक्कमा तसेच सदर खात्यामधून काढलेल्या रक्कमांचा ताळमेळ घेता आलेला नाही. सदर दोन्ही खात्यांवर दिनांक 31/03/2016 अखेर असलेली एकूण रक्कम रूपये 1,01,65,594/- शिल्लक दिसून येते. तरी सदर शिल्लक रक्कमांचा ताळमेळ घेऊन शासनाकडील अखर्चित अनुदान वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-10.02/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार कार्यवाही करुन पूर्तता सादर करावी.

3) उपरोक्त खात्यांबाबत जिल्हा परिषद वित्त विभागामार्फत अंतर्गत लेखापरीक्षण करुन सदर खात्यांमधून झालेला खर्च अचूक असल्याबाबत प्रमाणित करण्यात यावे.

**3.769 जिल्हा परिषद सेस 3 टक्के निधीतून अपंग मुलांच्या क्रिडा स्पर्धांमधील अनियमिततांबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाजकल्याण विभागाने सन 2015-2016 मध्ये जिल्हा परिषद 3 टक्के सेस फंडातून अपंग शाळांमधील मुला-मुलींसाठी जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धा दिनांक 16/01/2016 व दिनांक 17/01/2016 रोजी संगमनेर तालुका मुख्यालय येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर स्पर्धेसाठी प्रमाणक क्रमांक 610, दिनांक 31/03/2016 अन्वये एकूण रक्कम रुपये 3,00,000/- खर्च झालेबाबत नोंद करण्यात आली असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपआयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्रमांक अकआ/प्र-7/2015-16/3230, दिनांक 08/12/2015 अन्वये जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धांचे तात्काळ आयोजन करुन क्रिडा स्पर्धेतील अंतिम निकालाची यादी दिनांक 25/12/2015 पूर्वी अपंग कल्याण आयुक्तालयास सादर करावी असे निर्देश होते. परंतु, विभागाने विलंबाने म्हणजे दिनांक 16/01/2016 व दिनांक 17/01/2016 रोजी स्पर्धा आयोजित केली.

2) स्पर्धेसाठी आलेल्या स्पर्धक तसेच संबंधीत अधिकारी, कर्मचारी यांच्या हजेरीबाबत अभिलेखे तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

3) विभागाने उपलब्ध केलेल्या स्पर्धकांच्या यादीनुसार स्पर्धेसाठी एकूण 506 स्पर्धक उपस्थित होते. परंतु, त्यापृष्टर्थ संबंधीतांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत, त्यामुळे किती स्पर्धक स्पर्धेसाठी हजर होते? याबाबत अचूकता प्रमाणित करता आली नाही.

4) स्पर्धकांच्या यादीनुसार स्पर्धेसाठी एकूण 506 स्पर्धक उपस्थित होते. परंतु, साई स्वागत केटरर्स, संगमनेर यांचे उपप्रमाणक क्रमांक 1474, दिनांक 19/01/2016 अन्वये दिनांक 16/01/2016 रोजी रोत्रीचे भोजनास एकूण 1050 व्यक्ती उपस्थित होत्या. म्हणजे स्पर्धकांपेक्षा इतर लोक जास्त असल्याचे दिसून येते.

5) साई स्वागत केटरर्स, संगमनेर यांना चहा, नाश्ता, भोजन यासाठी प्रति दिन प्रति व्यकती रुपये 120/- याप्रमाणे ठेका देण्यात आला होता. परंतु, पुरवठादाराचे उपप्रमाणक क्रमांक 1474, दिनांक 19/01/2016 अन्वये दिनांक 16/01/2016 रोजी चहासाठी रुपये 25/-, दुपारी जेवण रुपये 85/-, संध्याकाळी चहा, बिस्कीट रुपये 10/-, रात्रीचे जेवण रुपये 85/- असे एकूण रुपये 205/- प्रमाणे देयक सादर केले आहे. त्यामुळे रुपये 205 - 120 = रुपये 85*800 व्यक्ती = एकूण रुपये 68,000/- जादा प्रदान झाले आहे. तरी अतिप्रदानित रक्कम रुपये 68,000/- संबंधीताकडून वसूल करुन पूर्तता दर्शवावी.

6) सदर योजनेबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र पडताळणीस प्राप्त झाले नाही.

**3.770 दलितवस्ती सुधार योजनेत ग्रामपंचायत स्तरावरील विकास कामाबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद, अहमदनगर येथील सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात समाजकल्याण विभागाकडील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणेसाठी ग्रामपंचायतींना विकास कामासाठी वेळावेळी अनुदान अदा केले आहे. दिनांक 31/03/2015 अखेर मागील शिल्लक रक्कम रूपये - असून सन 2015-2016 मध्ये प्राप्त अनुदान रुपये 68,43,79,860/- असे एकूण रुपये 68,43,79,860/- सन 2015-2016 मध्ये खर्च रूपये 16,33,62,405/- झाला असून रक्कम रूपये 52,10,17,455/- शिल्लक अखर्चित असल्याचे दिसते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायतीस विकास कामांसाठी प्रथम हप्ता दिल्यानंतर पंचायतीने काम पुर्ण करून तसे काम पुर्णत्वाचा दाखला सादर करून, उर्वरित अनुदान प्राप्त करणे आवश्यक आहे, म्हणजेच विभागाने पुर्ण झालेल्या कामाची रक्कम देणे आवश्यक आहे व अशाप्रकारे ग्रामपंचायतीस प्रथम हप्ता दिल्यानंतर कामाची मुदत एक वर्षापेक्षा जास्त दिलेली नाही, असे असतांना सदर नोंदवहीचे अवलोकन केले असता बहुतांशी कामांच्या रक्कमा शिल्लक असल्याचे दिसून आले. वास्तविक ग्रामपंचायतीस 1 वर्षाची मुदत दिलेली असतांना त्यांनी काम पुर्णत्वाचे दाखले सादर केली नाहीत. म्हणून गेली अनेक वर्षे सदरचे अनुदान जिल्हा परिषद स्तरावर विनाकारण पडून राहिलेले आहे व त्यामुळे शासनाने व्याजेपोटी मोठे नुकसान होत आहे. तसेच गेली वर्षापुर्वीची कामे अपुर्ण आहेत किंवा पंचायतीने त्यांना अदा केलेल्या प्रथम हप्त्याची विनियोग प्रत्यक्षात केली किंवा नाही? याबाबतही विभागाने वेळोवेळी आढावा घेतलेला दिसून येत नाही. तरी आता अखर्चित अनूदानाचा तालुकानिहाय तपशील तसेच तालुक्यातील शिल्लकेचा ग्रामपंचायतनिहाय व कामाच्या संख्येनिहाय तपशील सादर करून प्रत्येक काम कोणत्या स्तरावर आहे. याचा सुस्पष्ट अहवाल तयार करून तो सादर करून अनुपालन दर्शवावे.

2) नियमाप्रमाणे विहीत मुदत संपल्यानंतर संबंधीत पंचायत संस्था यांचेकडून अनुदान मागणीसाठी पाठपुरावा नसल्याने शिल्लक अखर्चित रक्कम त्वरीत व्यपगत करून अशा सर्व रक्कमा शासनाचे सदरी भरणा करण्यात याव्यात.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन आदेश क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.18/33, दिनांक 19/01/2001 अन्वये ग्रामपंचायत स्वत: कामे करतील व त्यातील किमान 5 टक्के इतकी रक्कम ग्रामनिधीत जमा करावी. त्याप्रमाणे पुर्ण केलेल्या कामापोटी खात्री पटवावी.

4) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक दवसुया/कामे/कालावधी/वाढ/ 2001 अन्वये सदरची कामे एक वर्षाच्या आत पुर्ण करणे बंधनकारक आहे. परंतु, कामे अपुर्ण आहेत. शासन परिपत्रकातील अटी व शर्तीचे पालन न झाल्याने शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

5) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक दवसुया/परिपुर्ण प्रस्ताव/का-12/95-96/ पुणे, दिनांक 01/12/1995 मधील अट क्रमांक 10 नुसार 1 वर्षात काम पुर्ण न झाल्यास मंजुर रक्कम ग्रामपंचायतीकडून वसुल केली जाईल, याची ग्रामपंचायतीला जाणीव करावी आणि संबंधीत गटविकास अधिकारी यांनी समाजकल्याण अधिकारी यांनी वर्षभरात मंजुर रक्कमेचे आकडे द्यावेत व अट क्रमांक 11 वरील मुद्दा क्रमांक 10 प्रमाणे ज्या-ज्या गावातील कामे दिलेल्या मुदतीत पुर्ण झाले नसेल, त्या-त्या ग्रामपंचायतीने अनुदान निर्धारण करतांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी तेवढी रक्कम शासनाकडे जमा करावी, असे आदेश आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) सदरचे अनुदान ग्रामपंचायतीस देण्यात आलेले आहे. संबंधीत ग्रामपंचायतींनी दलित वस्तीची कामे ही मक्तेदारांमार्फत केली असल्यास शासन परिपत्रक क्रमांक विकअप्र/क्रमांक43/कराधान-1, दिनांक 05/05/1999 नुसार मक्तेदारास प्रदान केलेल्या रक्कमेच्या एकंदर कामाच्या 4 टक्के प्रमाणे कार्यकंत्राटाची रक्कम वसूल करून शासनाकडे भरणा करून पुर्तता दर्शवावी.

### 3.771 20 टक्के सेस फंडातील योजनेतून मागासवर्गीय महिलांना पिकोफॉल मशिन पुरविणेबाबत.

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 44,91,100/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिशिष्ट क्रमांक 4 प्रमाणे मागासवर्गीय जाती व गावनिहाय याद्या तयार केल्या पाहिजेत व लाभार्थीस वैयक्तिक लाभ / साहित्य दिल्यानंतर त्याची नोंद त्या नोंदवहीत केली पाहिजे, अशी तरतूद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्यास दोनदा / दुबार लाभ दिला गेला नसल्याची पुर्ण खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र. 1239/34, दिनांक 01/09/1993 अन्वये ज्या वर्षात साहित्य खरेदी केले, त्याच आर्थिक वर्षात वाटप करणे बंधनकारक आहे. तथापि, विभागाने सन 2015-2016 या वित्तीय वर्षात खरेदी केलेले साहित्य सन 2016-2017 या आर्थिक वर्षात वाटप केल्याचे बहुतांशी सर्व पंचायत समितीकडील साठा नोंदवहीवरून दिसून येते त्यामुळे वरील नियमांचे पालन झालेले नाही. नियम बाहयतेस सक्षम प्राधिका-यांची मंजूरी प्राप्त करून पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 नुसार गटविकास अधिकारी / सक्षम अधिकारी यांनी प्रत्यक्ष पहाणी करून लाभार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीत काय सुधारणा झाली? तसा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तथापि, तसा अहवाल दप्तरी नसल्याने योजनेचे उद्दीष्ट साध्य झाले असल्याची पडताळणी करता आली नाही. तरी नमूद तपासणी अहवाल उपलब्ध करून अनुपालन दर्शवावे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2006/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची निवड, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, लाभार्थी निवड, निविदा प्रक्रिया, साहित्य वाटप व प्रदान इत्यादी बाबींसाठी विहीत दिनांकनिहाय वेळापत्रक ठरवून दिलेले आहे. सदर वेळापत्रकांचे पालन झालेले दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) आणि आयुक्त, पुणे यांचे पत्र क्रमांक सी.पी.एस.पी.एस.आर./117/गुणी 5, दिनांक 23/08/2004 नुसार शासकीय प्रयोगशाळेकडून साहित्य विहीत मापदंडात असल्याबाबतची चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापि, तशी कार्यवाही करण्यात आली नाही. सबब चाचणी अहवाल प्राप्त करण्यापूर्वी साहित्य वाटप करण्यात आल्याने नियम बाहयतेस सक्षम प्राधिका-यांचे क्षमापन प्राप्त करून अनुपालन दर्शवावे.

6) पंचायत समितीनिहाय साहित्य वाटप यादी मागणी करूनही लेखापरीक्षणास पहावयास मिळाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात वाटप साहित्यापैकी किती साहित्य पंचायत समिती स्तरावर पडून आहेत. विनावापर किती साहित्य गुंतुन पडलेले आहेत. यांची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

**3.772 जिल्हा परिषद निधीमधुन मागासवर्गीय मुलांना सायकल वाटप करणे योजनेतील खरेदीमधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर कामावर रक्कम रूपये 2,39,64,500/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ठ 'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे शासनाने ठरवुन दिलेल्या कालमर्यादेमध्ये योजना राबविणे आवश्यक होते. परंतु, योजना राबविणेमध्ये उशिर झाला आहे. माहे मार्च अखेर लाभार्थीना योजनेचा लाभ देऊन विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही झालेली नाही.

2) ई-निविदेचे प्रकाशन ई-निविदा पोर्टल विकसित करुन ई-निविदा पोर्टलवर विभागाचे संकेतस्थळावर करणे अनिवार्य असेल. तथापि, याप्रमाणे ई-निविदा पोर्टल विकसित केलेले नाही. तसेच परिच्छेद क्रमांक 4.4.2 नुसार निविदा जाहीरात ही क्रमांक 3 नुसार 25 लाखाचे पुढील निविदा रक्कमेची जाहीरात एका राज्य स्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येईल. तथापि, याप्रमाणे कार्यवाही केली नाही व वर्तमानपत्राचे कात्रण उपलब्ध झाले नाही.

3) सायकलची आधारभूत किंमत अथवा नमूद किंमत जी ठरविण्यात आली आहे, ती योग्य असलेबाबतचा बाजारपेठेतील सर्वेक्षण केलेचा अहवाल उपलब्ध झाला नाही. फक्त दोन कोटेशन समक्ष जावून आणण्यात आले. 1. सुराना शॉपी सायकल जेंटस दर रूपये 3,700/- 2. श्री. ट्रेडर्स - रूपये 3,800/- तसेच उदयोग संचलनालय यांचे मागील आर्थीक वर्षात मे.रवि इंडस्ट्रिज, लुधियाना यांचेशी करणेत आलेला दरकरार पहाता हिप्पो सायकलची किंमत शेडयुल दोन नुसार 5 कोटीचे पुढील खरेदीसाठी (शिक्षण रूपये 2 कोटी अधिक समाज कल्याण रूपये 3 कोटी 75 लाख अशी एकत्रित निविदा किंमत रूपये 5 कोटी 75 लाख) निविदा किंमतीसाठी रक्कम रूपये 3,169/- अशी आहे. तसेच दरकरार विधीग्राहय कालावधी दिनांक 20/01/2015 ते दिनांक 30/06/2015 असा आहे.

सायकलचे आरसी मधील वर्णन पहाता standered 55.88 CMS 22 इंची, completaly assembled with PVC saddle colour black with additional accessories bell, sigale side stand, luggage carrier mediam duty, lock, chain cover quarter असे असुन त्यात सर्व ॲक्सेसरीजचा उल्लेख आहे व समाजकल्याण विभागाकडील सायकल पुरवठा आदेश तपासता त्यात ॲक्सेसरीज मध्ये sigale side stand ऐवजी full side stand, luggage carrier mediam duty ऐवजी luggage carrier heavy duty, chain cover quarter ऐवजी chain cover full असा बदल केला आहे. या सर्व बाबींचा परिगणना तक्ता जोडलेला नाही. त्यामुळे सायकलची आधारभूत किंमत ही रूपये 3,700/- काय आधारे करण्यात आली? याबाबत किंमत योग्य असलेबाबत पडताळणी करता आली नाही.

दिनांक 30/10/2015 चे नियमावलीतील परिच्छेद क्रमांक 3.1.2.5 नूसार किंमतीचा वाजवीपणा निश्चित केलेबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत. किंमतीबाबत माहीतीची देवाणघेवाण करुन कमीत कमी किंमतीचा स्पर्धात्मक लाभ घेणेसाठी परिच्छेद क्रमांक 3.1.2.9 अन्वये तज्ञांच्या संस्थांशी संपर्क साधलेला नाही. तसेच ई-निविदा पोर्टल विकसित केलेले नाही.

4) ई-निविदेत वस्तुचे प्रत्यक्ष अचूक डिझाईन नमूद केलेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/ 34, दिनांक 20/10/1999 अन्वये परिच्छेद क्रमांक 4 अन्वये विवरणपत्र अ मधील नोंदवही ठेवून लाभार्थ्यांची त्यात

दरवर्षी नोंद घ्यावयाची आहे. तथापि, नोंदवही अदयावत व सर्व रकाने पूर्ण भरलेले नसलेने दुबार लाभ दिले नसलेबाबत पडताळणी करता आली नाही.

6) ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये 2 किंमी अंतर चालत जावे लागते, अशा विद्यार्थ्यांना व दारिद्रय रेषेखालील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देऊन तद्नंतर 1 किंमी अंतर व त्यानंतर 1 किमी चे आत चालत जावे लागते, अशा विद्यार्थ्यांना व दारिद्रय रेषेखालील मागास वर्गीय विद्यार्थ्यांना सायकलीचा लाभ देणे आवश्यक आहे. तथापि, याप्रमाणे लाभार्थी निवड केलेबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 2001/प्र.क्र.408/34, दिनांक 20/04/2001 अन्वये समाजकल्याण समितीने ठरविलेल्या लाभार्थी निकषास जिल्हापरिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेचे दिसून आले नाही. त्यामुळे गरजू व आर्थीकदृष्टया दुर्बल अशाच मागासवर्गीय लाभार्थ्यांना लाभ मिळालेची पडताळणी करता आली नाही. निवड यादी सन 2015-2016 ची म्हणजेच गतवर्षातील नसून नवीन लाभार्थ्यांची लेखापरिक्षण वर्षातील असलेबाबत पडताळणी प्राप्त प्रस्ताव दिनांकासहीत आवक क्रमांकनिहाय, तसेच त्यापैकी नामंजुर प्रस्ताव आदी कागदपत्रे नस्तीसोबत जोडणेत आलेली नाही व उपलब्ध ही झाली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ठ 'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे दिनांक 30/11/2015 पर्यत लाभार्थ्यांचे विनियोग दाखले प्राप्त करून घेणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच लाभार्थी विदयार्थी यांच्याच सहया हया वाटपानंतर घेतलेची पडताळणी करता आली नाही. शिक्षण विभाग व समाजकल्याण विभाग ह्या दोन्ही विभागांनी इयत्ता 4 ते इयत्ता 7 वी च्या जिल्हा परिषद शाळेतील विदयार्थ्यांना सायकल वाटप ही योजना राबविली आहे. तथापि, दोन्हीचे लाभार्थी हे वेगळे असलेबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच सदरचा लाभ हा सन 2015-2016 हे शैक्षणिक वर्ष संपलेवर म्हणजेच इयत्ता 7 वी तील मुले इयत्ता 8 वीत गेल्यावर देण्यात आला आहे. अशा विदयार्थ्यांना लाभ दिला किंवा कसे, याबाबत अहवाल उपलब्ध झाला नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर/2239/31, दिनांक 01/09/1993 फलश्रुती अहवाल देणेत आला नाही.

10) उपरोक्त नियमावलीतील परिच्छेद क्रमांक 4.6 नुसार वॉरंटी कालावधी संपेपर्यत अनामत परत करण्यात येवू नये. सदरचा कालावधी 2 वर्षाचा आहे.

11) निविदा स्विकृती प्रपत्र नियमावलीतील परिच्छेद क्रमांक 6.4 परिशिष्ट 4 अ, तसेच बँक हमी नमुना परिच्छेद 6.10 परिशिष्ट 4.6 प्रमाणे विहीत नमुन्यात नाही.

12) तालुक्यांना वाटप करण्यात आलेले साहित्य शिल्लक न राहता वाटप करण्यात आलेबाबत तालुकयांकडील साठा नोंदवही अर्धसमासपत्र क्रमांक 33, दिनांक 17/05/2017 अन्वये मागणी करुनही उपलब्ध न केलेने पडताळणी करता आली नाही.

**3.773 20 टक्के जिल्हापरिषद निधी मधून मागासवर्गीयांना व 3 टक्के अपंगाना लोखंडी स्टॉल पुरविणे खरेदीमधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदर कामावर रक्कम रूपये 4,48,94,995/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ठ 'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे शासनाने ठरवुन दिलेल्या कालमर्यादेमध्ये योजना राबविणे आवश्यक होते.

पुरवठा आदेश क्रमांक 1 व 2 नुसारवरील प्रमाणे माहे मार्च अखेर लाभार्थीना योजनेचा लाभ देवुन विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे योजना राबविणेमध्ये उशिर झाला आहे.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्र.क्र./82/ भाग-iii/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 चे नियुमपुस्तिकेमधील परिच्छेद क्रमांक 3.2.1 अन्वये खुल्या स्पर्धात्मक निविदेव्दारे परिच्छेद क्रमांक 4.1 ई-निविदा पध्दतीचा वापर करुन सदरची खरेदी केली आहे.

त्यानुसार ई-निविदेचे प्रकाशन ई-निविदा पोर्टल विकसित करुन ई-निविदा पोर्टलवर विभागाचे संकेतस्थळावर करणे अनिवार्य असेल. तथापि, याप्रमाणे ई-निविदा पोर्टल विकसित केलेले नाही. तसेच परिच्छेद क्रमांक 4.4.2 नुसार निविदा जाहीरात ही क्रमांक 3 नुसार 25 लाखाचे पुढील निविदा रक्कमेची जाहीरात एका राज्य स्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येईल. उपरोक्त नियमपुस्तिकेतील परिच्छेद 3.1.1.1 नुसार उत्पादनासाठी ओ ई एम (मूळ उपकरण उत्पादक) प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना प्रमाणपत्र उपलब्ध केलेले नाही.

3) ई-निविदेत वस्तुचे / स्टॉलचे प्रत्यक्ष अचूक डिझाईन नमूद केलेले नाही.

4) साहित्याचे भारतीय मानक ब्युरोकडील विधी ग्राहयता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

5) आधारभूत किंमत अथवा नमूद किंमत जी ठरविण्यात आली आहे, ती योग्य असलेबाबतचा बाजारपेठेतील सर्वेक्षण केलेचा अहवाल उपलब्ध झाला नाही. ई-निविदा पोर्टल विकसित केलेले नाही.

6) तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रे तपासता मे.स्टिल फॅब कार्पोरेशन व मे.स्टिल फॅब पूणे यांची कागदपत्रे अतिशय अस्पष्ट आहेत. आयकर व विक्रीकर भरणा बाकी नसल्याचे प्रमाणपत्र तपासता ते अस्पष्ट असल्याने पडताळणी करता आली नाही. खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा उत्पादनांशी संबंधीत देखभालीच्या किंवा अन्य सहाय्यकारी सेवांसाठी सर्वसमावेशक देखभाल किंवा वार्षिक देखभाल करार खरेदीच्या उत्पादनाबरोबरच प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/ 34, दिनांक 20/10/1999 अन्वये परिच्छेद 4 अन्वये विवरणपत्र अ मधील नोंदवही ठेवून लाभार्थ्यांची त्यात दरवर्षी नोंद घ्यावयाची आहे. तथापि, नोंदवही अदयावत व सर्व रकाने पूर्ण भरलेले नसल्याने दुबार लाभ दिले नसलेबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच या शासन निर्णयान्वये लाभार्थी हे ग्रामसभेत मंजुर करुन तद्नंतर प्रस्तावास गटविकास अधिकारी यांनी शिफारस केलेबाबतचा अहवाल अथवा कागदपत्रे उपलब्धही झाली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 2001/प्र.क्र.408/34, दिनांक 20/04/2001 अन्वये समाजकल्याण समितीने ठरविलेल्या लाभार्थी निकषास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेचे दिसून आले नाही. लाभार्थ्यांचे प्राप्त प्रस्ताव दिनांकासहीत आवक क्रमाकनिहाय, तसेच त्यापैकी नामंजुर प्रस्ताव आदी कागदपत्रे नस्तीसोबत जोडणेत आलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर/2239/31, दिनांक 01/09/1993 फलश्रुती अहवाल देणेत आला नाही.

10) नियमावलीतील परिच्छेद क्रमांक 4.6 नुसार वॉरंटी कालावधी संपेपर्यत अनामत परत करण्यात येवू नये. सदरचा कालावधी 2 वर्षाचा आहे.

11) निविदा स्विकृती प्रपत्र नियमावलीतील परिच्छेद क्रमांक 6.4 परिशिष्ट 4 अ, तसेच बँक हमी नमुना परिच्छेद 6.10 परिशिष्ट 4.6 प्रमाणे विहीत नमुन्यात नाही.

12) पुर्नप्रत्ययी आदेशान्वये 3 टक्के अपंगकल्याण निधीतुन पुन्हा 68 लोखंडीस्टॉलची रक्कम रूपये 49,64,000/- ची खरेदी केली आहे. तथापि, त्या अनुषंगाने 3 टक्के अनामत रक्कमेचे व 5 टक्के सुरक्षा अनामत भरणा केलेची चलने उपलब्ध झाली नाही.

13) तालुक्यांकडील मंजुर लाभार्थी यादी तपासता खालील लाभधारकाचे नाव दोन वेगळया आदेशाने दोन वेळा मंजुर झाले आहे. सदरबाब पंचायत समिती जुन्नर व शिरुर यांचे लक्षात आली किंवा कसे? सदर लाभार्थ्यास दोन वेळा लाभ दिले असलेस एका लाभाची रक्कम वसुल करणेत यावी.

14) तालुक्यांकडील मंजुर लाभार्थी यादी तपासता काही ठिकाणी मंजुर लाभ एकाच कुटुंबातील दोन लाभार्थ्यांना दिला आहे. सबब त्यांचे 7/12 व 8 अ वेगळे, रेशनकार्ड वेगळे असलेबाबत पडताळणी करता आली नाही. जर याप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता होत नसेलस कुटुंबातील एका लाभाची रक्कम वसुल करणेत यावी.

15) तालुकयांकडील साठा नोंदवही अर्धसमास पत्र क्रमांक 33, दिनांक 17/05/2017 अन्वये मागणी करुनही उपलब्ध न केलेने पडताळणी करता आली नाही. तसेच नस्तीसोबत काही लाभार्थी यादी उपलब्ध झाली आहे. उर्वरित लाभार्थींची यादी उपलब्ध न झालेने यादीतील नावे दुबार झालेची अथवा एकाच कुटुंबातील असलेची पडताळणी करता आली नाही.

**3.774 यशवंत घरकुल योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी सन 2015-2016 मध्ये यशवंत घरकुल योजनेकरीता एकूण रक्कम रुपाये 1,75,00,000/- इतके अनुदान वितरीत केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय दिनांक 20/04/2001 मधील मुद्दा क्रमांक 2 मध्ये नमूद केल्याप्रमाणे समाजकल्याण समितीने जो लाभार्थी निवड ठराव मंजुर होईल त्यास योग्य ती प्रसिध्दी देऊन त्यासंबंधी सुचना व आक्षेप मागविण्यात यावेत व सदर सुचना आक्षेपाचा विचार करुन तयार केलेल्या अंतिम प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्य केलेले अंतिम ठराव प्रत्येक ग्रामसभेमध्ये वाचून दाखवून त्यास सर्वदूर प्रसिध्दी देण्यात यावे, असे नमूद असतांना त्याबाबत जिल्हा परिषदेने कोणती कार्यवाही केली? याबाबत साधार पुर्तता होणे आवश्यक आहे.

2) शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 4 अन्वये सर्व जिल्हा परिषदांनी विहीत नमुन्यातील प्रपत्रामध्ये लाभार्थींची नोंदवही तयार करुन गावनिहाय / जातनिहाय नोंदी घेण्याबाबत सुचित केले आहे. परंतु विभागाने सदर नोंदवही ठेवलेली दिसत नाही.

3) प्रशासकीय मान्यतेतील मुद्दा क्रमांक 5 व 6 प्रमाणे उपअभियंता यांनी पारित केलेला आराखडा व अंदाजपत्रक यानुसारच बांधकाम करणे व शौचालय बांधणे बंधनकारक आहे. परंतु मोजमाप पुस्तिका व 8 अ चे उतारे याबाबत कोणतीही खात्री न करता विभागाने अनुदान वाटप केल्याचे दिसते. तसेच मुद्दा क्रमांक 12 प्रमाणे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात यावी, असे नमूद आहे व मुद्दा क्रमांक 11 अन्वये सर्व गटविकास अधिकारी यांनी दरमहा सदर योजनेचा मासिक प्रगती अहवाल जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना दर महिन्याच्या 5 तारखेच्या आत नियमित पाठवावा, असे असतांना याबाबत कार्यवाही केल्याचे दिसत नाही.

4) समाजकल्याण समिती सभा दिनांक 04/11/2015 चे कार्यवृत्त पुस्तकामध्ये (प्रोसिडींग) 20 टक्के यशवंत घरकुल योजनासाठी पात्र लाभार्थी यादी विषय क्रमांक 6, ठराव क्रमांक 244, दिनांक 04/11/2015 अन्वये मंजुर करण्यात आली आहे. त्यामध्ये अनुक्रमांक 25 मध्ये तालुका कराड मधील लाभार्थी श्री.जगदीश उत्तम साठे (नांदगांव) यांचे नांव कार्यवृत्त पुस्तकामध्ये (प्रोसिडींग) मंजुर यशवंत घरकुलसाठी नांव आहे व टिपणीला पात्र लाभार्थी यादी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा आदेश दिनांक 23/11/2015 मध्ये श्री.हणमंत तातोबा वायदंडे (मसूर) यांचे नांव आहे. तरी समाजकल्याण समिती सभेचे श्री.वायदंडे हणमंत तातोबा यांच्या नावाला मंजूरी दिली नसतांना त्यांना 20 टक्के मधून यशवंत घरकुल योजनेचा लाभ कोणत्या नियमानुसार दिला? याचा लेखापरीक्षणात खुलासा होणे आवश्यक आहे.

5) 20 टक्के यशवंत घरकुल योजनेमध्ये समाजकल्याण समितीने ठरावाने मंजुर लाभार्थींना घरकुल अनुदान वाटप केले आहे.

समाजकल्याण समितीने विषय क्रमांक 6, ठराव क्रमांक 236, दिनांक 28/09/2015 ने 20 टक्के यशवंत घरकुल योजनेमधून 63 लाभार्थी यांची निवड केली आहे. ठराव क्रमांक 265, दिनांक 29/12/2015 ने 22 लाभार्थी, ठराव क्रमांक 274, दिनांक 28/01/2016 ने 28 लाभार्थी, ठराव क्रमांक 283, दिनांक 19/02/2016 ने 2, ठराव क्रमांक 294, दिनांक 29/03/2016 ने 15 लाभार्थी असे एकूण 130 लाभार्थ्यांना ठरावाच्या नकलेनुसार लाभ मंजूर केला आहे. प्रत्यक्षात कार्यवृत्त नोंदवहीची (प्रोसिडींग) तपासणी केली असता सदर 130 लाभार्थींची नावे ही प्रोसिडींग कार्यवृत्त नोंदवही ठरावामध्ये नोंदविलेली नाहीत. त्यामुळे समाजकल्याण समितीने वरील ठरावाने 130 लाभार्थींना

20 टक्के यशवंत घरकुल अनुदान मंजूरी नसतांना ते कोणत्या नियमाने त्यांना अनुदान वाटप केले याचा लेखापरीक्षणात खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.775 इयत्ता 5 वी ते 12 वी तील मागासवर्गीय मुली / मुले यांना सायकल वाटप करणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 6,66,244/- खर्च करण्यात आला आहे. जिल्हा परिषद साताराकडील समाजकल्याण विभागाने इयत्ता 5 वी ते 12 वी तील मागासवर्गीय मुली / मुले यांना वरील प्रमाणकान्वये सायकल खरेदी करुन वाटप केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना वेळापत्रक ठरवून दिले आहे. त्यानुसार 30 सप्टेंबर अखेर पुरवठा आदेश देऊन 30 नोव्हेंबर अखेर साहित्य वाटप करावयाचे आहे व 31 जानेवारी मध्ये देयक आदा करावयाचे आहे. तथापि, समाजकल्याण विभागाने पुरवठा आदेश जावक क्रमांक साजिप/सकवि/सक-7/249/16, दिनांक 17/03/2016 अन्वये पुरवठा आदेश देऊन मार्च अखेरीस साहित्य प्राप्त करुन दिनांक 31/03/2016 अन्वये पुरवठा आदेश देऊन मार्च अखेरीस साहित्य प्राप्त करुन दिनांक 31/03/2016 रोजी देयक आदा केले आहे. तथापि, प्रस्तुत प्रकरणी वेळापत्रकाचे पालन झालेले नाही.

2) जेन्ट्स सायकल खरेदीसाठी ई-निविदा मागविलेली होती. त्यास प्रतिसाद म्हणून तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. तथापि, प्रस्तावित खरेदी निळ्या रंगाची होती. परंतु चाचणीमध्ये काळया रंगाची नमुना सायकल दिल्यामुळे तांत्रिक मुद्दा उपस्थित करुन फेरनिविदा मागविण्याचे प्रस्तावित केले होते. परंतु पुन्हा दरपत्रके मागवून जेन्ट्स सायकल खरेदी केली असून सदर सायकलचा रंग काळाच आहे. त्यामुळे केवळ तांत्रिक मुद्दा उपस्थित करुन ई-निविदा नाकारली असल्याने पुरवठादाराचे हित जोपासल्याचे दिसून येते.

3) पंचायत समिती खटाव वडूजचे डिलीव्हरी चलन S-19, दिनांक 31/03/2016 व S-8, दिनांक 31/03/2016 पाहता नगामध्ये बदल केल्याचे आढळून येते.

4) सायकलचा पुरवठा आय.एस.आय. मार्कचा करणे आवश्यक असतांना सदर सायकली आय.एस.आय. च्या असल्याबाबत प्रमाणपत्र नस्तीमध्ये पहावयास मिळाले नाही.

5) करारनामा पाहता त्यावर समाजकल्याण अधिकारी व पुरवठादार यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. अपुर्ण करारनाम्याआधारे साहित्य खरेदी व वाटप कसे केले?

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमूद केलेप्रमाणे विवरणपत्र अ नुसार विहीत नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातानिहाय, गावनिहाय व कुटुंबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.

7) विनियोग दाखले नस्तीसोबत प्राप्त झाले नाही.

**3.776 वसतिगृहांना देय अनुदानापेक्षा जादा इमारतभाडे अनुदान मंजुर केलेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 22,45,272/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच 1079/प्र.क्र.107/मावक 4, दिनांक 16/03/1998 मधील मुद्दा क्रमांक 8 (क) नुसार वसतिगृहाच्या इमारत भाडयाबद्दल व्यवस्थापनाने केलेल्या खर्चाच्या 75 टक्के अनुदान मिळण्यास पात्र असेल असे नमूद आहे. समाजकल्याण विभागाअंतर्गत वसतिगृहांना त्यांच्या सनदी लेखापालाकडील प्रमाणित जमाखर्चपत्रकानुसार इमारत भाड्यावर केलेल्या खर्चाच्या 75 टक्के इतकेच इमारत भाडे अनुदान देय असताना जादा अनुदान मंजुर करण्यात आलेले असून अतिप्रदान इमारत भाडे अनुदानाची रक्कम वसूलात आणणे आवश्यक आहे.

1) एकलव्य विध्यार्थी वसतिगृह, वाई

प्रमाणक क्रमांक 136, दिनांक 26/06/2015 रूपये 6,50,124/- मधून संबंधीतास रूपये 2,99,064/- माहे मार्च 2013 ते फेब्रुवारी 2014 या कालावधीतील तसेच प्रमाणक क्रमांक 688, दिनांक 31/03/2016 रूपये 15,95,148/- मधून संबंधीतास रूपये 2,99,064/- माहे मार्च 2014 ते फेब्रुवारी 2015 या कालावधीतील इमारत भाड्याची रक्कम अदा असून वसतिगृहाच्या सन 2013-2014 व 2014-2015 च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये इमारत भाड्यावर कोणताही खर्च व्यवस्थापनाने केलेला नाही. परिणामी इमारत भाडे अनुदान अनुज्ञेय होत नसून अदा इमारत भाडे अनुदान रूपये 5,98,128/- वसूलपात्र ठरतात.

2) सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, सातारा नं.1

प्रमाणक क्रमांक 136, दिनांक 26/06/2015 रूपये 6,50,124/- मधून संबंधीतास रूपये 87,984/- माहे मार्च 2013 ते फेब्रुवारी 2014 या कालावधीतील इमारत भाड्याची रक्कम अदा असून वसतिगृहाच्या लेखापरीक्षण अहवालानुसार इमारत भाड्यावर प्रत्यक्ष खर्च रूपये 87,984/- इतकाच केलेने त्याच्या 75 टक्के रूपये 65,988/- इतकेच इमारतभाडे देय असताना रूपये 87,984/- मंजुर केलेने रूपये 21,996/- अतिप्रदान झालेले असून ते वसूलपात्र ठरते.

**3.777 गजीनृत्य संमेलनावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 26) -** गजीनृत्य करणाऱ्या मंडळांना प्रोत्साहन देणेसाठी सन 2015-2016 च्या जिल्हा परिषद सेस अंतर्गत अंदाजपत्रकात रूपये 10 लक्ष ची तरतूद करण्यात आलेली असून त्यातून 6 प्रमाणकान्वये रूपये 35,80,010/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेअंतर्गत जिल्ह्यातून तसेच जिल्ह्याबाहेरुन मोठ्या प्रमाणात गजीनृत्य मंडळे सहभागी झालेली असून नृत्य पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित राहणार, अशी परिस्थिती पाहता भोजनावर रूपये 2,99,000/- इतका खर्च केलेला आहे. योजनेचा मुख्य उद्देश गजीनृत्यांना प्रोत्साहन देणे असे असताना तरतूदी पैकी 30 टक्के रक्कम जेवनावळीवर खर्च करणे अयोग्य आहे. सदर खर्चात बचत करुन अन्य बाबींवर खर्च करणे अपेक्षित होते.

2) सहभागी मंडळांना प्रवास खर्चाची रक्कम रोखीने वाटलेली असून एकूण 102 मंडळांना रूपये 2,08,026/- इतकी रक्कम वाटल्याचे नोंदवहीत नमूद आहे. सदर खर्चासाठी प्रमाणक क्रमांक 15 ने रूपये 2,00,000/- तसलमात व प्रमाणक क्रमांक 23 ने रूपये 26,026/- अशी एकूण रूपये 2,26,026/- इतकी खर्च दिसत असून वाटप रुपये 2,08,026/- चे झालेने रूपये 18,000/- खर्चाचा तपशिल सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, सदर रक्कम वसूलात आणावी लागेल.

3) 3 मंडळांना प्रवासभाडे अदा केलेले असून त्यांची नावे नावनोंदणी रजिस्टरमध्ये नोंदलेली नाहीत. तसेच नावनोंदणी अर्ज पहावयास न मिळालेने नियमबाहयपणे प्रवासभाडे अदा केलेले आहे.

4) प्रवासखर्च अदाईगी पत्रकामध्ये मोठया प्रमाणात खाडाखोड करुन रक्कमा नमूद केलेल्या असून सदर पत्रकावर सक्षम अधिकारी (गटविकास अधिकारी / सहाय्यक गटविकास अधिकारी / समाजकल्याण अधिकारी) यांनी सांक्षांकित केलेले नाही.

5) सदर स्पर्धासाठी परिक्षक मंडळ, त्यांचे परिक्षण अहवाल, निवडलेली मंडळे याबाबतची कोणतीही कागदपत्रे न ठेवलेने किती मंडळांनी नृत्ये सादर केली? कोणत्या मंडळांना बक्षीसे दिली? याबाबतची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

6) जिल्हा परिषदस्तरावर प्रमाणक क्रमांक 109 ने 72 ढोल दिनांक 20/02/16 खरेदी केलेले असून स्पर्धा झाल्यानंतर ढोल खरेदी केलेली आहे. खरेदीपैकी किती ढोलांचे कोणत्या मंडळांना वाटप केले? वाटपासाठी काय निकष ठेवणेत आले? तसेच विलंबाने खरेदी केलेने केवळ ढोल आणणेसाठी मंडळांना प्रवासखर्चाचा नाहक भुर्दंड पडलेला आहे.

**3.778 अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांचा विकास योजना शासन निर्णय मध्ये दिलेले काम मंजुर न करता नियमबाहय कामाना मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे याचे आदेश क्रमांक 3055/2015-16/4017, दिनांक 02/11/2015 अन्वये रूपये 15,00,00,000/- अनूदान मंजुर करण्यात आले असून रूपये 14,07,44,090/- प्राप्त झाले आहे. त्यानुषगाने वित्त प्रेषण वाटप करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु/प्र.क्र.442/ अजाक, दिनांक 05/12/2011 अन्वये अनुज्ञेय कामा मध्ये संरक्षण भिंत व पेव्हीग ब्लॉक नमुद नाही. त्यामुळे केलेले खर्च लेखापरीक्षणास मान्य नाही. सदर नियम बाह्यरित्या मंजुर 27 कामास शासनाची मंजूरी प्राप्त करावी किवा रूपये 92,73,755/- ची वसूली होणे आवश्यक आहे. उपरोक्त कामे मंजूरीचे प्रस्ताव सादर करताना ग्रामपंचायत सचिव / ग्राम विकास अधिकारी, संरपच, गट विकास अघिकारी, समाज कल्याण समितीने सदर प्रस्ताव अमान्य करावयास पाहीजे होते. परंतु तसे न केल्याने शासन निर्णय मध्ये दिलेल्या निदेशाचे पालन न करता नियम बाहय कामे मंजुर करण्यात आले आहे.

2) सदर योजनेकरीता प्राप्त अनुदानापैकी शिल्लक अखर्चित रक्कम रुपये 14,48,49,733 /- शासन निधीत भरणा केल्याची पुर्तता दाखवावी.

3) वित्त प्रेषण नोंदवही तालुकानिहाय ठेवलेली आहे. तथापि, ती अपुर्ण असुन सन 2015-16 अखेर गोषवारा काढलेला नाही. नोंदवही अद्ययावत होणे आवश्यक आहे.

4) मंजुर असलेली कामे ज्या त्या आर्थिक वर्षात पुर्ण करण्याचे आदेश असताना तशी कार्यवाही केलेली दिसुन येत नाही.

5) पाण्याचा उद्भव कामाच्या ठिकाणी असल्याचा कागदोपत्री पुरावा दाखवावा जर या अटीचा भंग झाला तर खर्च झालेली संपूर्ण रक्कम संबंधीत ग्रामसेवक व संबंधरत ग्रामपंचायतीचे सदस्य यांच्या कडून वसुलपात्र ठरविण्यात येईल असे असताना तशी कागदपत्रे घेण्यात आलेली नाहीत.

6) सन 2014-15 अखेर पुर्ण झालेलया कामांचे बाबतीत उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाहीत.

7) सन 2011-12 ते 2015-16 या कालावधीत मंजुर कामांपैकी 231 इतकी कामे अपुर्ण स्थितीत आहेत. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2013/प्र.क्र.85/अजाक-1, दिनांक 01/08/2013 अन्वये जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी या योजनेतून हाती घेतलेल्या कामाची तपासणी करणे आवश्यक आहे. अशी तपासणी केलेबाबतचे अहवाल उपलब्ध झाले नाहीत.

**3.779 दलित वस्ती सुधारयोजनेअंतर्गत एकाच गावाला दुबार किंवा वारंवार लाभ दिल्याबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद चे 2015-2016 चे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या विकास (द.व.सु.यो) योजनेवर रक्कम रूपये 1,45,89,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 मध्ये लाभ दिलेल्या काही गावांना सदर योजने अंतर्गत यापूर्वी 2013-2014 या वित्तीय वर्षात बांधकाम सुविधेचे लाभ देण्यात आले आहेत.

2) महाराष्ट्र शासन, सामाजीक न्याय व विशेष साहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2011/ प्रक्र.442/अजाक, दिनांक 05/12/2011 चे परिशिष्ट अ चे अट 10 नुसार अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांचा विकास (द.व.सु.यो) अंतर्गत निधी वाटप करतांना प्राधान्य क्रम ठरविण्यात आले आहे. त्यानुसार ज्या वस्त्यांना अदयापी काहीच लाभ दिला नाही अशा वस्त्यांना प्रथम लाभ देणे आहे व नंतर इतर वस्तींना लाभ दयायचे आहे.

3) उपरोक्त शासन निर्णयानुसार प्राधान्य क्रम देणे साठी गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील सर्व गावांची प्राधान्य क्रमाणे यादी करुन जिल्हा परिषद विभागाला सादर करायची आहे. व त्यानुसार प्रस्ताव सादर करायचे आहे. पंरतु अशाप्रकारे प्राधान्यक्रम यादी प्राप्त करण्यात आलेली नाही.

4) वरील शासन निर्णयाचे सुचनाचे उल्लंघन करुन वरील अनुदान रुपये 1,45,89,000/- चा लाभ एकाच गावास दुबार / वांरवार लाभ प्राप्त होउन इतर गावे / वस्त्या लाभापासुन वंचीत झाले आहेत.

## 3.780 स्वयंसेवी संस्थांतर्गत मागासवर्गीय वस्तीगृहांना परिपोषण अनुदान वाटप खर्चाबाबत.

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,18,67,415/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 चे सहपत्रातील अ क्र 7 मधील आठ (फ) नुसार कोणत्याही उणीवाबद्दल कोणत्याही वेळी प्रत्येक प्रकरणात रुपये 1,000/- दंड आकारता येईल आणी सदर दंडाची रक्कम व्यवस्थापनास द्यावयाच्या अनुदानातून वजा करणेत येईल असे स्पष्ट नमूद करणेत आलेले आहे. सांगली जिल्हा परिषद, समाज कल्याण विभागाने परिपोषण अनुदानाचे वाटप करताना प्रत्येक त्रुटीबद्दल दंड आकारून दंडाची रक्कम अंतिम अनुदानातून वजा करून उरलेले अनुदान देणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 सहपत्रातील अ क्र 7 मधील आठ (अ) नुसार वस्तीगृहातील विद्यार्थ्यांची संपूर्ण वर्षाची उपस्थिती 75 टक्के किंवा त्याहून अधिक असल्यासच विद्यार्थी मान्य संख्येएवढे पूर्ण अनुदान मिळण्यास संस्था पात्र राहील असे असताना पसायदान विद्यार्थी वस्तीगृह अकळवाडी मध्ये 4 विद्यार्थ्यांची व उदय वस्तीगृह जत मध्ये एका विद्यार्थ्याची सन 2013-14 मध्ये वस्तीगृहातील सरासरी उपस्थिती 75 टक्के पेक्षा कमी असूनही नियमबाह्यपणे अनुदान रक्कम रुपये 45,000/- (9,000 x 5) प्रदान करणेत आलेले आहे. नियमबाह्य प्रदान रक्कम रुपये 45,000/- वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

3) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 सहपत्रातील अ क्र 7 मधील चार नुसार ज्या विद्यार्थ्याचे आई - वडील किंवा पालक वस्तीगृह ज्या गावात अथवा शहरात असेल त्याच गावात किंवा शहरात राहत असतील आणी ज्यांना स्वताच्या घरून शाळेत उपस्थित राहणे शक्य असूनही वसतीगृहात प्रवेश देणेत आला असेल तर अशा छात्रांना अनुदान देय असणार नाही, असे असतानाही हुतात्मा नानकसिंग वस्तीगृहामध्ये उत्कर्ष बाबासो सुतार, जात हिंदू सुतार गावापासून शाळेचे अंतर 1.5 km. गावाचे नाव वाळवा या स्थानिक विद्यार्थ्यास प्रवेश दिलेला आहे. सबब शासन निर्णयानुसार संबंधीत विद्यार्थ्यास अदा केलेले अनुदान रक्कम रुपये 9000/- संबंधीत वस्तीगृहाकडून वसूल करून शासनास भरणा करणेत यावेत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम क्रमांक 244 अन्वये नमुना नंबर 90 मध्ये शासकीय अनुदान जमा व खर्चाची नोंदवही ठेवलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 नुसार संस्था आर्थिकदृष्ट्या संपन्न असण्यासाठी वस्तीगृहाचे व्यवस्थापनाकरिता संस्थेचे नावे बँकेत किमान रक्कम रुपये 10,000/- कायमस्वरूपी जमा असणे आवश्यक आहे. सांगली जिल्हा परिषद, समाजकल्याण विभागाचे सन 2015-16 चे लेखापरीक्षण करताना बँकेत रक्कमा शिल्लक असलेबाबतची बँक पासबुकाची सत्यप्रत प्रस्तावासोबत नाही.

6) मागासवर्गीय वस्तीगृहांना वाटप केलेल्या अनुदानाच्या पोहोच पावत्या लेखापरीक्षनास उपलब्ध झालेल्या नाहीत.

## 3.781 मुकबधीर अशासकीय संस्थेस जादा अनुदान अदाई केलेबाबत.

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सांगलीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य (मुकबधीर संस्था) योजनेची तपासणी केली असता रक्कम रुपये 26,43,759/- खर्च करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेवर शासन मंजुर अनुदान रक्कम रूपये 38,75,000 इतके प्राप्त झाले असून वित्तीय वर्षात खर्च रक्कम रूपये 26,43,759/- एवढा खर्च झालेला आहे. जिल्हा परिषद स्तरावर शासन निधीत रक्कम रूपये 12,31,241/- अखर्चित असुन रक्कम शासनास वेळीच भरणा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2) प्रमाणक क्रंमाक 137 दिनांक 17/02/2016 रूपये 4,00,539/- ची तपासणी केली असता वात्सल्य कवठे - महाकाळ याना सन 2013-2014 शिल्लक रक्कम रूपये 4,00,539/- प्रदान करण्यात आले आहे. वात्सल्य मुंकबधीर विदयालय विदयार्थी संख्या 40 असताना 43 विदयार्थी संख्या घेऊन गणना करण्यात आली आहे. रक्कम रूपये 15,814/- जादा अदा केलेले परिपोषण अनुदान वात्सल्य मुंकबधीर विदयालय यांचेकडून वसुल होणे आवश्यक आहे.

3) इतर मुकबधीर संस्था याच्या प्रस्तावातही वरील प्रमाणे जादा प्रदान होवू शकते. त्याबाबत आपल्या स्तरावर छाननी करून वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.782 महिला व अपंगाना दळणयंत्र खरेदीमधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 48,23,300/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/95/446 वित्त 9, दिनांक 20/06/2008 अन्वये खरेदी करावयाचे साहित्य संदर्भात शासनाने वेळापत्रक निश्चित केले असून त्याप्रमाणे कार्यपध्दती आखणी तथा वार्षिक नियोजन केलेले नाही.

सर्व खरेदी प्रकरणी नियोजीत महिन्याचे पालन केलेले नाही. त्याचप्रमाणे लाभार्थी निवड ही 30 मे पर्यंत करुन त्यास समाजकल्याण समितीव्दारे अंतिम मान्यता देणे असताना फक्त संख्येस मान्यता दिलेली आहे. त्यामुळे लाभार्थी निवड निश्चित नसताना सदर योजना नियमबाह्य राबविण्यात आली आहे.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/2000/प्र.क्र.615 योजना 7, दिनांक 27/08/2006 अन्वये मागासवर्गीय लाभार्थ्यांना वाटप करावयाच्या साहित्य संदर्भातील प्रस्ताव तपासणी गटविकास अधिकारी यांनी निवड करुन पात्र लाभार्थी यादी चेकलिस्टसह जिल्हास्तरावर मंजुरीसाठी पाठविणेचे आहे. या संदर्भात सर्व पंचायत समित्याच्या चेकलिस्टचे अवलोकन करता पंचायत समिती स्तरावरुन महिला लाभार्थीची 127 नांवे व अपंग व्यक्तीची 61 नावाची शिफारस करण्यात आली होती. तथापि जिल्हास्तरावर समाजकल्याण विभाग यांनी 225 महिलांची नांवे व 113 अपंगाची नांवे निवडली आहेत. म्हणजेच 225 वजा 127 = 98 महिला व 113 वजा 61 = 52 अपंगाचे विना प्रस्तावाचे आधारे नावे निवड केली आहे. यातील काही लाभार्थ्याचे प्रस्ताव हे दिनांक 01/04/2016 नंतरचे असल्याचे निदर्शनास आले. अशा अपात्र लाभार्थ्यावरील खर्च लेखापरिक्षणास मान्य करता येत नाही. अपात्र महिला संख्या 98 अधीक अपंग लाभार्थी संख्या 52 = 150 X 13,900/- = 20,85,000/- रक्कम वसुलपात्र ठरत आहे.

3) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे प्रशासकीय मान्यतेमध्ये प्रत्येक तालुक्यासाठी लाभार्थी संख्या निश्चित केली आहे. त्या मर्यादेस पात्र लाभार्थी निश्चित करणे व तेवढे साहित्य तालुक्यांना वितरीत करणे योग्य असताना कमी लाभार्थी निश्चित करुन अधिक साहित्याचे वितरण केले आहे.

महिलांचे नांवे 5 व अपंगाचे नांवे 22 जादा वितरीत केलेली दळणयंत्रे ही विना वापर पडुन रहाणार आहे. रक्कम रुपये 27 X 13,900/- = 3,75,300/- वसुल होणे आवश्यक आहे.

4) अपंगासाठी दळणयंत्राची अंदाजपत्रकातील तरतूद रुपये 14,82,000/- असताना प्रत्यक्ष खर्च रुपये 18,34,800/- करण्यात आला आहे. तरतूद नसताना खर्च व जादा खर्चास सक्षम प्राधिका-याची मंजूरी नसताना खर्च केलेला आहे.

5) निविदा मागविण्याची कालमर्यादा ही 31 ऑगष्ट असताना सदर खरेदीसाठी ऑक्टोबर 2016 मध्ये ई-निविदेची कार्यपध्दती अनुसरली आहे. लाभार्थ्याची नांवे निश्चित नसताना प्रशासन व समिती स्तरावर लाभार्थी

संख्यांचे आधारे खरेदीची कार्यपध्दती अवलंबिली आहे व अधिकाराचा दुरुपयोग केला आहे. सदर साहित्य खरेदीसाठी ई-निविदा पध्दती ही वृत्तपत्राव्दारे करण्यात आली असून ती 1) दैनिक सुधा नोकरी संदर्भ 2) दैनिक तरुण भारत बेळगाव 3) दैनिक मुंबई चौफेर या दैनिकामध्ये दिल्याचे निदर्शनास आले.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2006/प्र.क्र.366/वित्त 9, दिनांक 31/12/2009 प्रमाणे ज्या खरेदी साहित्याचे मुल्य रुपये 5 ते 50 लाख आहे असा साहित्य खरेदीसाठी जाहिरात विभागीय स्तरावरील ब वर्ग मराठी दैनिकास व दुसरी जाहिरात मराठी / हिंदी दैनिकात देणे आहे. वरील दैनिकापैकी एक दैनिक हे युवा नोकरी संदर्भातील असून दुसरे दैनिक तरुण भारत हे बेळगाव प्रकाशनाचे असून व तिसरे दैनिक मुंबई चौफेर हे स्थानिक वृत्तपत्र असुन यापैकी विभागीय स्तरावरील एकही दैनिक दिसुन येत नाही. त्यामुळे सदर जाहिरातीचा उद्देश सफल झालेला नाही. याचाच परिणाम म्हणुन प्राप्त निविदा हया सर्व सांगली जिल्हयातील आल्या आहेत यावरुन सदर कार्यपध्दती शंकास्पद दिसुन येते.

6) सदर निविदाधारकातील अंतिम पात्र निविदाधारक निश्चित करते समयी अट क्र.4 प्रमाणे निश्चित केलेला साहित्य नमुना मॉडेल त्यानी सादर करणे व तो तपासुन त्याचे फोटो नस्तीस जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यपध्दती खरेदी समितीने अनुसरली नाही.

7) अट क्र.3.5 प्रमाणे रक्कम रूपये 4,000/- चे स्टँपपेपरवर करारनामा करणे असताना तो कोरा स्टँपपेपर नस्तीस जोडलेला आढळून आला. त्यामुळे संबंधीत ठेकेदारावर कोणतेही कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

8) अट क्र.5 प्रमाणे साहित्याची चाचणी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडुन करुन घेण्यात सुचित केले आहे. प्रत्यक्षात शासन निर्णस भाखसं/2014/प्र.क्र.42/भाग III/उद्योग 9, दिनांक 30/10/2015 (3:1:1:1) प्रमाणे साहित्य तपासणी ही गर्व्हमेंट इंजि. कॉलेजकडुन घेण्याची असताना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नांव निश्चित करणे योग्य नव्हते.

9) सदर साहित्याच्या पोहोच पहाता ह्या गटविकास अधिकारी / संबंधीत स्तरावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या असुन त्या विना दिनांकित असल्याचे निदर्शनास आले. प्रत्यक्षात साहित्य पुरविण्याची कालमर्यादा ही 45 दिवस असून उशीराचे कालावधीत प्रति आठवडा 1 टक्का / मर्यादित किंमतीच्या 10 टक्के दंड असल्याने नेमके साहित्य केव्हा पोहोचले हे लेखापरिक्षणास कळू शकत नाही. असे असताना जिल्हा परिषद स्तरावर अशा पोहच कशा मान्य केल्या याबाबतचा उशीर कालावधी निश्चित होवून दंड रक्कम वसुल होणे आवश्यक व याची चौकशी होणे आवश्यक आहे.

10) समाजकल्याण विभागाकडुन समाजकल्याण अधिकारी यांनी लाभार्थी निवड केलेनंतर त्यांचे नावानिशी आदेश पंचायत समितीस पारीत करणे आवश्यक असताना तशी कार्यपध्दती अनुसरली नाही.

11) पंचायत समिती स्तरावरील गटविकास अधिकारी यांनी प्राप्त साहित्याचा विनियोग केल्याचे विनियोग दाखले शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट ई मधील अ.क्र.10 प्रमाणे घेणे आवश्यक असता तशी ते उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे त्याचे स्तरावरील साहित्याची स्थिती कळून येत नाही.

**3.783 पिको फॉल मशिन मधील अनियमिततेमुळे झालेले नुकसानीबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 94,94,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/2000/प्र.क्र.615/योजना 7, दिनांक 27/10/2006 अन्वये मागासवर्गीय लाभार्थ्यांना वाटप करावयाच्या साहित्य संदर्भातील प्रस्ताव तपासणी गटविकास अधिकारी यांनी करुन निवड लाभार्थी यादी चेकलिस्टसह जिल्हास्तरावर मंजुरीसाठी पाठविणेचे आहे. पंचायत समिती स्तरावरुन सदर चेकलिस्ट परिशिष्ट क्र.4 व 5 मध्ये सादर केली आहे. त्यानुसार पंचायत समित्या वरुन जेवढे पात्र लाभार्थी म्हणुन कळविले होते. त्यापेक्षाही जादा लाभार्थींचा प्रस्तावा शिवाय नियमबाह्य निश्चित करण्यात आली आहे. पंचायत समिती स्तरावर ज्या लाभार्थ्यांचे अर्ज नव्हते व जे पात्र नव्हते असे लाभार्थी जिल्हा परिषद स्तरावर समाजकल्याण विभाग यांनी निवडुन त्या लाभार्थ्यांना लाभ दिला आहे. यामध्ये दिनांक 01/04/2016 चे नंतर

प्रस्तावीत लाभार्थ्याचा विचार केला आहे, तो लेखापरिक्षणास मान्य करता येणार नाही. सबब अपात्र लाभार्थी व अनावश्यक खरेदीवर झालेला खर्च रककम 764 x 10,100/- = रुपये 77,16,400/- वसुलात आणावी.

2) या संदर्भात प्राथमिक दर निश्चित करणेकामी प्रथम बाजारात चौकशी केली असताना साहित्य दर रुपये 7,000/- असल्याचे दिसुन आले. तक्रारीनंतर बाजार मुल्य काय आहे याची चौकशी करता नोव्हेल ॲपायसेस प्रा.लि. यांनी फॉल पिको मशिन रुपये 8,000/- चे किंमतीस उपलब्ध असल्याचे कोटेशन दिले म्हणजेच व्दितीय निविदेचे प्रसिध्द दिनांक 05/01/2016 वेळी बाजार मुल्य हे रुपये 8,000/- (नस्ती पान क्रं. 385) होते. वाटाघाटी अंती प्रणोती एंटरप्रायजेस यांनी 10,100/- चे किंमतीस पिको मशिन पुरविण्यास तयार असल्याचे कळविले आहे. ही किंमत बाजारभावापेक्षा जादा असल्याने कोणत्या किंमतीस पिको मशिन खरेदी करवे या विषयी निर्णय घेणेपुर्वी शासन निर्णय क्रमांक भाखस/2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 मधील नियम 2 व 3 प्रमाणे विकास आयुक्त (उद्योग) याचे मार्गदर्शन होवून खरेदी प्रक्रिया अवलंबणे योग्य होते ती न केल्यामुळे सदर खरेदी प्रक्रियेमध्ये 10,100/- वजा 8,000/- = 2,100 x 940 = रुपये 19,74,000/- इतके नुकसान झाले आहे.

3) सदर साहित्याचा पुरवठा आदेश देणेपुर्वी करारनामा करुन घेणे आवश्यक असताना पुरवठादाराकडुन करारनामा पोटी रुपये 7,700/- चे दिनांक 20/04/2016 रोजी खरेदी केलेले कोरे स्टँप फक्त जोडले आहेत. प्रत्यक्षात करारनाम्याचा भंग केल्यास दंड कार्यवाही ची अट असल्याने कायदेशीर प्रकियेसाठी कोणतीही कागदपत्रे तयार केलेली नाहीत.

4) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अटी शर्ती क्र.4 प्रमाणे निविदा उघडणे समयी साहित्याचा नमुना पुरवठादाराने सादर करणेचा आहे. त्याआधारे अट क्र.5 तथा 23 प्रमाणे तथा शासन निर्णय क्रमांक भाखस/2014/प्रक्र 82/भाग III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 नियम 3:1:1:1 प्रमाणे तपासणी अहवाल इंजि. कॉलेजकडुन प्राप्त करुन घेवून साहित्याचा गुणवत्तेबाबत खात्री करणे आहे तथापि नमुना घेतलेला नाही. त्यामुळे साहित्य गुणवत्तेबाबत शासंकता निर्माण होत आहे.

5) जिल्हास्तरावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लाभार्थी संख्या निश्चित केली होती त्या मर्यादेत तेवढे पात्र लाभार्थी निश्चित करुन तेवढे साहित्य तालुकास्तरावर पाठविणे योग्य होते. तथापि त्यापेक्षा कमी / अधिक लाभार्थी निवड केली आहे. ज्या तालुक्यात कमी / अधिक साहित्य वाटप केले आहे. एकूण 18 व्यक्तींसाठी व 4 महिलांसाठी असे एकूण 22 पिको मशिन जादा खरेदी ही जिल्हा परिषद स्तरावर केली आहे. सदर रक्कम 22 x 10,100/- = रुपये 2,22,200/- ची वसुली होणे आवश्यक आहे.

6) व्यक्तीचे नांवे वितरीत केलेले 19 मशीन व महिलांचे नांवे वितरीत केलेले 20 मशिन ही अनावश्यकरित्या वितरीत केल्याने ती त्या तालूकास्तरावर शिल्लक राहणार आहेत.

7) या दोन्ही योजनेमधून वितरीत केलेल्या साहित्याच्या पोहोच पहाता त्यावर दिनांकीत स्वाक्षरी नाही. या बाबतची जबाबदारी गटविकास अधिकारी यांची असल्याने त्यांनी विना दिनांकित स्वाक्षरी करणे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. त्यामुळे साहित्य प्राप्तीतील उशीर हा निश्चित करता येत नाही. याबाबत खुलासा होवुन उशीर कालावधी निश्चित होवुन त्याची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

8) शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446 वित्त 9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट इ मधील अ.क्र.10 प्रमाणे सर्व लाभार्थ्याचे विनियोग दाखले हे मार्च अखेर घेवून जतन करणे आवश्यक आहे. तथापि ते घेतलेले नाहीत ते घेवून पुर्तता होणे आवश्यक आहे.

### 3.784 अपंग व्यक्तीना सोलर होम लाईट पुरविणे.

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रुपये 29,96,910/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446 वित्त 9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट ई प्रमाणे प्रथम लाभार्थी निवड करुनच निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असताना लाभार्थी निवड न करता निविदा प्रक्रिया करुन साहित्य खरदी केले आहे.

2) महाराष्ट शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/2006/प्र.क्र. 615/यो-7, दिनांक 27/10/2006 मागासवर्गीय कल्याणाच्या योजनांचे प्रस्ताव गटविकास अधिकारी यांनी तपासून तशा शिफारशी समाजकल्याण समितीकडे पाठवून त्यातील पात्र लाभार्थ्यांचीच निवड लाभार्थी यादीत होणे आवश्यक असताना परिशिष्ठ क्रमांक 7 प्रमाणे 241 अपात्र लाभार्थ्यांना लाभार्थी निवडीत स्थान देण्यात आल्याने लाभार्थी निवडी नियमबाह्य झालेल्या असल्याने 241 लाभार्थ्यांचे रुपये 6,390/- प्रमाणे रुपये 15,39,990/- वसुलपात्र ठरतात.

3) पुरवठा आदेशात अट क्र.2 अन्वये पुरवठादाराने एलईडी बेस सोलर होमलाईट सिस्टीम लाभार्थ्यांच्या घरात जावुन फिटिंग करुन देवून संबंधीत लाभार्थ्यांच्या पोचपावत्या प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. परंतु अशा पोहच पावत्या प्राप्त न करताच पुरवठादाराला रक्कम रुपये 29,96,910/- नियमबाह्यपणे अदा केलेल्या आहेत.

4) पंचायत समिती शिरोळ, पन्हाळा, आजरा यांच्या साठा नोंदवहीची तपासणी केली असता साठा नोंदवहीवर साहित्य प्राप्त झाल्याच्या नोंदी नाहीत. पंचायत समिती गगन बावडा, भुदरगड यांचेकडे साठा नोंदवहीची तपासणी केली असता साहित्य दिनांक 07/07/2016 रोजी प्राप्त झाल्याचे दिसुन येते. पुरवठादाराचे डिलिव्हरी चलने दिनांकीत नसल्याने व इतर पंचायत समितीस्तरावरील पोहच दिनांकीत नाहीत. त्यामुळे सरसकट सर्व पंचायत समित्यांना साहित्य एकाचवेळी दिनांक 07/07/2016 रोजी प्राप्त झाले असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे साहित्य प्राप्त नसताना पुरवठादारास देयकाचे प्रदान करण्यात आलेले आहे सबब विलंबाने पुरवठाबद्दल पुरवठाधारकावर दंडनीय कार्यवाही करुन पुर्तता दर्शवावी.

5) पात्र लाभार्थी सख्येपेक्षा जादा साहित्य खरेदी करुन पंचायत समिती स्तरावर वितरीत करण्यात आलेले आहे. सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे (7) 197 नगाचे रुपये 6,390/- प्रमाणे रुपये 12,58,830/- ची रक्कम नाहक गुंतुन पडलेली आहे.

6) पंचायत समितीच्या साठा नोंदवहीची तपासणी केली असता आजअखेर साहित्य शिल्लक आढळून आले. तसेच इतर पंचायत समित्यांचे साठा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध नसल्याने त्याबाबतची आकडेवारी समजु शकली नाही. परंतु आजअखेर लाभार्थी निवड / साहित्य वितरण न केल्याने सरासरी 43 टक्के साहित्य लाभार्थ्यांना वाटप झाल्याचे दिसून येते व उर्वरित 57 टक्के साहित्य विना वाटप पडुन राहिलेले आहे. त्यामुळे साहित्याच्या वॉरंटी कालावधी संपत जावुन प्रत्यक्ष लाभार्थ्यांना त्याचा लाभ मिळत नाही व योजनेची फलश्रुती साध्य झालेली नाही.

7) सदरील योजनेची मास्टर नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाही.

8) खरेदी साहित्याची गुणवत्ता चाचणी अहवाल लेखापरिक्षणास प्राप्त झाला नाही.

**3.785 20 टक्के जिल्हा परिषद निधीमधून महिलांना झेरॉक्स मशिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रुपये 99,71,010/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/2006/प्र.क्र.615/यो 7, दिनांक 27/10/2006 प्रमाणे गटविकास अधिकारी यांनी लाभार्थी प्रस्ताव तपासुन लाभार्थी नांवे व चेकलिस्ट ही समाजकल्याण विभागास सादर करणे आहे व त्यातील पात्र लाभार्थी त्यांनी निवडुन आदेशान्वये गटविकास अधिकारी यांना कळविणे आहे. पंचायत समिती करवीरची लाभार्थी यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. परिशिष्ट क्रमांक 13 मध्ये नमुद केलेले लाभार्थी हे अपात्र असून प्रत्यक्षात ती नांवे गटविकास अधिकारी यांचे स्तरावरुन शिफारस केली नाहीत. ज्यांचे प्रस्ताव नाहीत असे सर्व अपात्र लाभार्थी ठरत असल्याने त्यांचेवरील खर्च लेखापरिक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

अपात्र लाभार्थी 221 चे प्रति नग रुपये 33,915/- प्रमाणे रुपये 74,95,215/- ची रक्कम वसुल करण्यात यावी.

समाजकल्याण विभागाने मंजूर केलेल्या लाभार्थी यादीमध्ये परिशिष्टात नमूद केले प्रमाणे 2 लाभार्थ्यांची दोन वेळा लाभ मंजूर केलेला असल्याने 2 नगाचे प्रती नग रुपये 33,915/- प्रमाणे रूपये 67,830/- लाभार्थीकडून रक्कम वसूल करण्यात यावी.

जिल्हास्तावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लाभार्थी संख्या निश्चित केली होती त्या मर्यादेत तेवढे पात्र लाभार्थी निश्चित करुन तेवढे साहित्य तालुकास्तरावर पाठविणे योग्य होते. तथापि त्यापेक्षा कमी / अधिक लाभार्थी निवड केली आहे. ज्या तालुक्यात कमी / अधिक साहित्य वाटप केले आहे. एकूण 25 जादा झेरॉक्स खरेदी ही जिल्हा परिषद स्तरावर केली आहे. त्याची जबाबदारी त्यांचेवर निश्चीत करुन सदर रक्कम 25 x 33,915/- = रुपये 8,47,875/- ची वसुली होणे आवश्यक आहे. व्यक्तीचे नांवे वितरीत केलेले 21 झेरॉक्स अनावश्यकरित्या वितरीत केल्याने ती त्या तालूकास्तरावर शिल्लक राहणार आहेत. तरी एकूण 84,10,920/- वसुल पात्र ठरतात.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1998/प्र.क्र.78/34, दिनांक 20/10/1999 अन्वये लाभार्थी नोंदवही ठेवण्यात आली नाही. म्हणजे एकाच कुटूंबातील व्यक्तींना योजनेचा दुबार लाभ दिला नसले खात्री करता आली नाही.

3) सदर निविदा पध्दतीवर श्री.दिपक जालिंदर धनवडे यांनी हरकती घेतल्याचे पत्र सदर नस्ती सोबत आढळून आली असून सदर ई-निविदा तिस-यांदा प्रसिध्द केल्यानंतर सदर निविदेचा कालावधी हा दिनांक 15/02/2016 ते 22/02/2016 हा कालावधी असताना शुध्दीपत्रक दिनांक 20/02/2016 रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे. प्रिबिड मिटींग दिनांक 17/02/2016 रोजी ठेवलेली असताना शुध्दीपत्रक हे लवकरात लवकर मिटींग संपल्यानंतर किंवा दिनांक 18/02/2016 पर्यत ऑन लाईन प्रसिध्द करणे आवश्यक असताना शुध्दीपत्रक हे दिनांक 20/02/2016 रोजी संध्याकाळी 6 वाजता ऑन लाईन प्रसिध्द करण्यात आले आहे. म्हणजेच निविदा कालावधी मधील 8 दिवसांपैकी 6 दिवस संपल्या नंतर शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे.

4) उपआयुक्त, समाजकल्याण, आयुक्तालय यांचेकडील पत्र क्रमांक स्था स.क.आ जिल्हा परिषद कोल्हापूर झे.म खरेदी अनियमितता का/16/2015/6 पुणे, दिनांक 15/03/2016 पत्रामध्ये नमूद केले प्रमाणे राज्यमंत्री सामाजिक न्याय विभाग यांनी खरेदीतील अनियमिततेबाबत त्वरीत चौकशी करणेचे निर्देश दिलेले आहेत. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

5) पुरवठा आदेश दिनांक 30/03/2016 अन्वये अट क्रमांक 3 नुसार Installation commissioning झाले नंतर झेरॉक्स मशीन चालविण्याचे प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहिल व लाभार्थीचे प्रमाणपत्र समाज कल्याण कार्यालयास सादर करणे आवश्यक राहिल सदरचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

6) समाजकल्याण विभागाने शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर यांना जावक क्रमांक कोजिप/सकवि/योजना/ 2016, दिनांक 25/05/2016 अन्वये खरेदी केलेल्या झेरॉक्स मशिनचे स्पेसिफिकेशन प्रमाणे तपासणी अहवाल देण्याचे मागीणी केली आहे. सदरचा अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

7) गटविकास अधिकारी यांना साहित्य प्राप्त झाल्या बाबत पोहोच पावत्या लेखापरीक्षणास प्राप्त झालेल्या नाहीत. त्याचप्रमाणे सदर योजनेचा फलश्रुती अहवाल लेखापरिक्षणास प्राप्त झाला नाही.

**3.786 वस्तीगृह अनुदान वाटपामध्ये नियमबाहयपणे वाढीव संख्येस देण्यात आलेल्या अतिप्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सोलापूर जिल्हयातील विविध मागासवर्गीय विद्यार्थी व विदयार्थीनींच्या वसतीगृहांना मान्यता देण्यात आलेली आहे. सदर वसतीगृहांना प्रति विदयार्थ्यामागे रूपये 900/- प्रति महिना वेतनोत्तर अुनदान देय आहे. त्यासाठी दरवर्षी ऑक्टोंबर अखेर परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/ माबक-4, दिनांक 16/03/1998 अन्वये वस्तीगृहांना मान्यता देणे, विद्यार्थी संख्या वाढीस मान्यता देण्याचे अधिकार हे शासनास असताना, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वाढीव संख्येस मान्यता दिलेली आहे. तरी सदरच्या

नियमबाहय वाढीव संख्येमूळे रक्कम रूपये 2,43,000/- अतिप्रदान झालेले आहे. तरी सदरची रक्कम वसूल करण्यात यावी.

**3.787 ग्रामीण भागातील मागासवर्गीय शेतकऱ्यांना चार्जिंग पंप पुरवणे योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** सन 2015-2016 मध्ये समाजकल्याण विभागामार्फत राबवण्यात आलेल्या ग्रामीण भागातील मागासवर्गीय शेतकऱ्यांना चार्जिंग पंप पुरवणे योजनेची नस्ती व लाभार्थी यादया तपासल्या असता सदरबाबत प्रमाणक क्रमांक 583, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 29,96,490/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता न घेताच योजना कोणत्या आधारे राबण्यात आली? याचा खुलासा झालेला नाही.

2) सदर पुरवठा आदेश देण्यापूर्वी लाभार्थी यादी निश्चित करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) सदर साहित्याचे तालूक्यांना पुरवठा केलेल्या साहित्याच्या सही शिक्क्यासह पोहच पावत्या लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. त्यामूळे पुरवठा आदेशाप्रमाणे सदरच्या साहित्याचे पुरवठा करण्यात आला, याची खात्री करता आलेली नाही.

4) सदर साहित्याचे टेस्ट रिपोर्ट तपासले असता ते औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर यांचे पत्र क्रमांक औप्रसंसो/भांडार-2/2016/906 नुसार दिनांक 28/03/2016 रोजी घेण्यात आलेले आहेत. परंतु, सदर साहित्याचे साहित्य वाटप केल्याच्या पावत्या या माहे डिसेंबर 2015 च्या आहेत. यावरून असे दिसून येते की, सदर साहित्य वाटप केल्यानंतर साहित्याची तपासणी करून घेण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर साहित्याच्या गुणवत्ता व दर्जाबाबत खात्री करता येत नाही.

5) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर यांचे टेस्ट रिपोर्ट मध्ये नमूद केलेनुसार बॅटरी ऑपरेटेड स्पेअर या उपकरणांची तपासणी गुणवत्ता व स्पेसिफिकेशन प्रमाणे करण्यात आलेली आहे. परंतु, सदर रिपोर्ट मध्ये कोणत्या गुणवत्ता व स्पेसिफिकेशन प्रमाणे तपासणी केली याचा उल्लेख केलेला नाही. सदरचा रिपोर्ट हा ढोबळमानाने देण्यात आलेला आहे, असे लेखापरीक्षकाचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे सदरचा रिपोर्ट लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही.

6) सदर साहित्याच्या तालुकानिहाय लाभार्थी यादया तपासल्या असता लाभार्थ्यांना दुबार लाभ दिल्याचे दिसून आले.

सदरबाबत दुबार लाभ देऊन अनियमितता झालेली आहे. तरी संबंधीतांकडून दुबार लाभाची रक्कम रूपये 19,950/- वसूल करून जिल्हा परिषद सदरी भरणा करावी.

7) तांत्रिक मान्यता आदेशातील अट क्रमांक 1 नुसार लाभार्थी हा अनुसूचित जाती किंवा जमातीचा असावा, असे असताना हिंदू मराठा जातीतील लाभार्थ्यांला लाभ देऊन अनियमितता केलेली आहे. तरी संबंधीतांकडून दुबार लाभ रक्कम रुपये 3,990/- शासन सदरी भरणा करावी.

8) लाभार्थी यादया अदयावत घेण्यात आलेल्या नाहीत. लाभार्थी यादीमध्ये बऱ्याच लाभार्थ्यांच्या नावापुढे जात नमूद केलेली नाही. त्यामुळे सदर लाभार्थी हा मागासवर्गीय असल्याबाबत खात्री करता आली नाही.

9) समाजकल्याण विभागाने सदर साहित्याची साठा नोंदवही ठेवलेली नसल्याने तालुकास्तरावर वाटप करण्यात आलेले साहित्याची खात्री करता आली नाही.

**3.788 समाजकल्याण विभागाकडून मंजूर लाभार्थी यादी मध्ये नाव नसताना सदर लाभार्थीना नियमबाहयपणे वस्तुंची वाटप केलेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 28) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती अक्कलकोट येथिल सन 2015-2016 वर्षातील समाजकल्याण विभागाकडून वाटप करण्यात आलेल्या विविध वस्तूंच्या प्रस्तावांच्या चाचणी लेखापरिक्षणामध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

लाभार्थ्यांची नांवे मंजूर लाभार्थी यादीमध्ये समाविष्ट नसताना सुध्दा त्यांना विविध योजनांतर्गत वस्तूंचे वाटप करून लाभ देण्यात आलेले आहेत. सदरबाबत गंभीर अनियमितता झालेली आहे. वसुलपात्र रक्कम रूपये 3,28,252/-.

**3.789 100 टक्के अनुदानावर 20 टक्के जिल्हा निधीमधून मागासवर्गीय महीलांना पिको फॉल शिलाई मशिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 39,79,660/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 अन्वये वैयक्तीक लाभाची योजना राबवितांना परिशिष्ठ ई अन्वये तरतुदीनुसार ही योजना राबवितांना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) विभागाने पिको फॉल शिलाई मशीन खरेदी करण्यापुर्वी संबंधीत पंचायत समीतीकडून मागणी निश्चित करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे खरेदी केलेले साहीत्य हे त्याच वित्तीय वर्षात संबंधीत लाभार्थ्यांस वाटप न झाल्याचे दिसते.

3) लेखापरिक्षण दिनांकापर्यंत 178 नग पिको फॉल शिलाई मशीनचे वाटप करण्यात आलेले नाही. यावरुन असे स्पष्ट होते की लाभार्थी निवड करतांना गरजू लाभार्थ्यांची निवड न झाल्याने योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीआर/1088/सी आर 796, दिनांक 16/06/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले, त्याच वित्तीय वर्षात वाटप करावयाचे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

तसेच लेखापरिक्षण दिनांकापर्यत एकूण 178 नगाचे वाटप बाकी असल्याने रुपये 18,35,180/- एवढी रक्कम विनाकारण गुंतून पडली आहे. तसेच पंचायत समीती चिखलदरा येथील 2014-2015 या वित्तीय वर्षामधील साहीत्याचे वाटप बाकी असतांना सुदधा पुन्हा नव्याने साहित्य पुरवठा करण्याचे प्रयोजन काय खुलासा करावा.

5) पंचायत समीती निहाय लाभार्थी अर्जाची पडताळणी केली असता अपात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आल्याचे दिसते.

6) योजनानिहाय गावनिहाय लाभार्थ्यांचे मास्टर रजिस्टर ठेवण्यात आले नाही. त्यामुळे लाभार्थ्यांस दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) सदरचे साहित्य हे कोणत्या वाहनाने पुरविण्यात आले, याबाबत सदर वाहनाचा प्रकार व क्रमांक साठा पुस्तकात नमूद नाही. त्यामुळे सदर साहीत्य कशाने पुरविण्यात आले याबाबत पडताळणी करता आली नाही.

8) सदर योजना ही नियमित योजना असून विभागाने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात सदर योजना राबविली असून सदर साहीत्याचे पुरवठादार हे श्रीकृष्ण सेल्स कार्पोरेशन अहमदनगर असून त्या वेळेसचे त्यांचे पिको फॉल मशीनचे प्रतिनगाचे दर रूपये 6,276/- एवढे असून सन 2015-2016 या वित्तीय वर्षात संबंधीताकडून रूपये 10,310/- प्रतिनग या दराने खरेदी करण्यात आली आहे. याबाबत खुलासा व्हावा.

**3.790 100 टक्के अनुदानावर 20 टक्के जिल्हा निधीमधून मागासवर्गीयांना लाऊड स्पिकर पुरविणे.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 9,97,100/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 अन्वये वैयक्तीक लाभाची योजना राबवितांना परिशिष्ठ ई अन्वये तरतुदीनुसार ही योजना राबवितांना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) विभागाने लाऊड स्पिकर खरेदी करण्यापुर्वी संबंधीत पंचायत समीतीकडून मागणी निश्चीत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे खरेदी केलेले साहीत्य हे त्याच वित्तीय वर्षात संबंधीत लाभार्थ्यांस वाटप न झाल्याचे दिसते.

3) लेखापरिक्षण दिनांकापर्यत 29 नग लाऊड स्पिकर वाटप करण्यात आलेले नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, लाभार्थी निवड करतांना गरजू लाभार्थ्यांची निवड न झाल्याचे दिसते. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल न झाल्याचे स्पष्ट होते.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीआर/1088/सी आर 796, दिनांक 16/06/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहीत्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात वाटप करावयाचे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. नियमबाहयतेबाबत खुलासा व्हावा.

लेखापरिक्षण दिनांकापर्यत एकूण 29 नगाचे वाटप बाकी असल्याने रूपये 4,90,100/- एवढी रक्कम विनाकारण गुंतून पडली आहे.

5) सदर खरेदीकरीता दिनांक 14/03/2016 रोजी पुरवठा आदेश देण्यात आला असून करारनामा हा दिनांक 18/03/2016 रोजी करण्यात आल्याचे दिसते

6) योजनानिहाय गावनिहाय लाभार्थ्यांचे मास्टर रजिस्टर ठेवण्यात आले नाही. त्यामुळे लाभार्थ्यांस दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) सदरचे साहीत्य हे कोणत्या वाहनाने पुरविण्यात आले, याबाबत सदर वाहनाचा प्रकार व क्रमांक साठा पुस्तकात नमूद नाही. त्यामुळे सदर साहीत्य कशाने पुरविण्यात आले याबाबत पडताळणी करता आली नाही.

**3.791 स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहांना परिपोषण अनुदान प्रदानातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3 व 11) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,66,05,438/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाने वित्तीय वर्ष 2015-2016 मध्ये जिल्हयातील स्वयंसेवी संस्थाना परिपोषण अनुदान मंजुर करुन प्रदान करतांना महाराष्ट्र शासन समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच 1097/प्र.क्र.107/मावक 4, दिनांक 16/03/1998 चे परिशिष्ट अ नुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचना व वेळोवेळी झालेल्या सुधारणाप्रमाणे शासन निर्देशाचे काटेकोर पालन झालेले नसल्याचे दिसुन येते.

2) विभागाने वसतिगृहास शासनाची मान्यता असल्याबाबतचा शासन आदेश / निर्णय क्रमांक दिनांक व मान्यसंख्या अनुदान मंजुरी आदेशावर व ग्रँट इन एडचे देयकावर नमुद केलेला नाही. तसेच अनुदान निर्धारण प्रस्तावासोबत शासनाचे आदेशाची प्रत सादर केलेली नाही. त्यामुळे वसतिगृहास शासनाची मान्यता असल्याबाबत व मान्य पदसंख्येबाबत खात्री करता आली नाही.

3) उपरोक्त नमुद शासन निर्णय दिनांक 16/03/1998 चे परिशिष्ट अ मधील निर्देशानुसार वसतिगृहाच्या तपासणीकरीता भेटी दिल्यानंतर तपासणी अधिकाऱ्यांनी उपस्थित मुलांची संख्या व नांवे नमुद करणे आवश्यक आहे. तथापि, प्रस्तासोबत जोडलेल्या तपासणी अधिकाऱ्यांच्या भेटीच्या अहवालात उपस्थित मुलांची एकूण संख्या नमुद आहेत. परंतु, नांवे नमुद नाहीत. तसेच वसतिगृह इमारत सर्व सोयींनी युक्त असणे, पुरेशी सौचालय व स्नानगृह असणे. वसतिगृहात किमान 1 महिना पुरेल एवढा धान्यसाठा उपलब्ध असल्याबाबत अभिलेखे अदयावत असल्याबाबत संस्थेच्या बँक खात्यात किमान रुपये 10,000/- जमा असणे, इत्यादी किमान निकषांची तपासणी करून तसा स्पष्ट अभिप्राय भेटीचे अहवालात नमुद करणे आवश्यक असतांना तपासणी अधिकाऱ्यांनी अतिशय त्रोटक शेरा भेट नोंदवहीत दिलेला आहे.

वसतिगृहास भेटी दिलेल्या निरीक्षकांच्या दौरा दैनंदिनी लेखा परिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदर भेटीबाबत आवश्यक पडताळणी करता आली नाही. समाज कल्याण आयुक्त / उपायुक्त अथवा अन्य वरिष्ठ अधिकारी यांनी आकस्मिक भेट देऊन तपासणी केल्याबाबत अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

4) वसतिगृहाचे अंतिम अनुदान निर्धारण अहवाल प्रपत्र इ व संबंधित नस्तीची पडताळणी केली असता त्यावर मुद्दा क्रमांक 6 अ नुसार वसतीगृह भेटीचे वेळी उपस्थितीबाबत प्रवर्ग निहाय अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय विशेष मागास प्रवर्ग इत्यादी प्रवर्गनिहाय उपस्थिती संख्या नोंदविलेली नसतांना व नावे देखील नमुद नसताना अंतिम अनुदान निर्धारण अहवाल प्रपत्र इ मध्ये प्रवर्गनिहाय उपस्थिती संख्या दर्शविली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) उपरोक्त नमुद शासन निर्णय दिनांक 16/03/1998 चे परिशिष्ट अ मधील निर्देशानुसार वसतिगृहास अंतिम 40 टक्के अनुदान वितरीत करण्यापुर्वी समाज कल्याण अधिकारी यांनी वसतिगृहाना भेट देऊन वसतिगृह समाधानकारक चालु असल्याबाबत व 60 टक्के अग्रीम अनुदानाचा विनियोग वसतिगृह व्यवस्थापनावरच खर्च होत असल्याबाबत खात्री करणे आवश्यक आहे. तथापि, अशा प्रकारे समाज कल्याण अधिकाऱ्यांनी भेटी देऊन खात्री केल्याबाबत अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही.

6) उपरोक्त नमुद शासन निर्णय दिनांक 16/03/1998 चे परिशिष्ट अ मधील निर्देशानुसार संस्था आर्थीकदृष्टया संपन्न असण्यासाठी संस्थेच्या बँक खात्यात किमान रुपये 10,000/- जमा असणे आवश्यक आहे. परंतु, वसतिगृहाचे अंतिम अनुदान निर्धारण प्रस्तावासोबत जोडलेल्या सनदी लेखापालाच्या अहवालावरुन सर्वच वसतिगृहाची बँकेतील सुरुवातीची व शेवटची शिल्लक रुपये 10,000/- पेक्षा कमी आहे. परंतु, या त्रुटीबाबत विभागाने दंडनिय कपात केलेली नाही.

7) वसतिगृहाचे अंतिम अनुदान निर्धारण अहवाल प्रपत्र इ व संबंधीत नस्तीची पडताळणी केली असता त्यामध्ये तपासणी अधिकाऱ्यांचे वसतिगृह भेटीचे अहवाल उपालब्ध नसणे, तपासणी अधिकाऱ्यांचे भेटीच्या अहवालातील त्रुटीकरीता दंडनिय कपात न करणे मुद्दा क्रमांक 5 मध्ये नमुद विवरणपत्रानुसर इयत्ता 10 मधील विद्यार्थ्यांकरीत एप्रिल महिन्याचे अनुदान कपात न करणे शैक्षणिक सत्रामध्ये शासनाने घोर्षित केलेल्या दिपावली सुटीकरीता कपात न करणे, शासनाने विहीत केलेल्या टक्केवारीनुसार प्रवेश दिलेले नसतांना मान्यसंख्येनुसार संपुर्ण अनुदान मंजुर करणे, निर्देश पत्रिकांवर संबंधीत मुख्याध्यापक, सरपंच यांचा सही व शिक्का नसणे, संबंधीत विद्यार्थ्यांचे मुळ गांवात शिक्षणाची सुविधा असतांनाही वसतिगृहात प्रवेश देणे, मुळ निर्देश पत्रिका नसणे, कोऱ्या अथवा झेरॉक्स निर्देश पत्रिका असणे इत्यादी त्रुटी असतांनाही विभागाने अनुदान निर्धारण करुन प्रदान केलेले आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

8) सदर संस्थांचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध नसल्याने सदर संस्थांनी वसतीगृहाचे मान्य बाबीवरच नियमानुसार अनुदानाचा खर्च करण्यात आला असल्याबाबतची पडताळणी समाज कल्याण विभागामार्फत करण्यात यावी व संबंधीत संस्थाकडुन प्रदान अनुदानाच्या विनियोगाचे उपयोगिता प्रमाणपत्रासह सप्रमाण अनुपालन दर्शवावे.

9) आयुक्त समाज कल्यान महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक 2049 दिनांक 21/09/2015 नुसार अनुदानित वसतीगृहाची मान्यता आदेश व इतर अनुषंगीक कागद पत्राची विशेष मोहीम राबहुन अभिलेख्याची तपासणी करणे बाबत समाजकल्याण अधिकारी यांना सूचित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे तपासणी करण्यात आाल्याचे आढळत नाही.

10) संचालक समाज कल्यान महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक 1 सकअ/शा.व अनु वर्ग /बायोमॅट्रिक/ प्र. क्र.125/2011/का 5 अ /457/पुणे दिनांक 60/04/2011 चे कार्यआरंभ आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे मुद्दा क्रमांक 1 ते 24 प्रमाणे बायोमॅट्रीक यंत्र नादुरुस्त झाल्यामुळे हजेरी देता आली नाही, तर ती अनुपस्थिती धरुन तो कालावधी अनुदान निर्धारीत करण्यासाठी ग्राहय धरला जाणार नाही, याची दक्षता अनुदान निश्चिती व वाटपाचे वेळी संबंधीतानी घ्यावी, असे स्पष्ट नमुद असताना एकूण 50 वसतिगृहाचे सयंत्रबंद असल्याचे प्रमाणपत्र नस्तीला असताना वसतिगृहान कोणत्या नियमाप्रमाणे / आदेशाप्रमाणे अनुदान वितरीत करण्यात आले? याचा खुलासा करण्यात यावा.

11) वस्तीगृहाचे अंतिम अनुदान निर्धारण अहवाल प्रपत्र इ व इतर नास्तीची तपासणी केली असता मुद्दा क्रमांक 5 नमूद विवरणपत्रा नुसार इ 10 मधील विद्यार्थ्यांचे माहे एप्रिल महिन्यातील अनुदानात कपात करणे आवश्यक असतांना छत्रपत्री शाहु महाराज मुलांचे वसतीगृह, अकोट येथील सन 2013-2014 मध्ये 3 विदयार्थी 10

व्या वर्गात शिकत असल्याबाबत मुख्याध्यापकाचे पत्र असतांना माहे एप्रील मध्ये 3 विदयार्थी वसतीगृहात उपस्थीत नसतांना केवळ एकाच विदयार्थ्याची 40 टक्के अंतीम देयकातुन कपात केली आहे. 2 विदर्यार्थीची रक्क्म रुपये 900 X 2 = रुपये 1,800/- कमी कपात केली आहे. ती वसुल करुन दर्शवावी. तसेच शालांत परिक्षे मध्ये शालांत शैक्षणिक सत्रा मधील दीपावली सुट्टीकरिता अनुदानात कपात न करणे शासनाने विहीत केलेल्या केलेल्या टक्केवारीनुसार प्रवेश दिलेले नसतांना मान्य संख्येनुसार संपुर्ण् अनुदान मंजुर करणे निर्देश पत्रीकावर संबंधीत मुख्याध्यापक, सरपंच याचा सही व शिक्का नसणे, संबंधीत विद्यार्थ्याच्या मुळ गांवात शिक्षणाची सुविधा असतांनाही वसतीगृहात प्रवेश देणे, मुळ निर्देश पत्रीका नसणे, को-या अथवा झेरॉक्सपत्रीका असणे इत्यादी त्रुटी असतांनाही विभागाने अनुदान निर्धारण करुन प्रदान केलेले आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

12) विजय दुतोंडे जवाहर नगर अकोला, श्रीमती देवकाबाई देशमुख जवाहन नगर अकोला, नाथ मुलींचे वसतीगृह अकोला, कपीलेश्वर वसतीगृह पिंजर, रुद्रायणी वसतीगृह, संतगाडगे बाबा कानडी, वि. रा. शिंदे बोरबांव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतीगृह तेल्हारा या वसतीगृहांना सन 2015-2016 मध्ये 40 टक्के अंतीम अनुदान प्रदान करण्यात आलेले आहे. परंतु, सदर वसतीगृहांचे नस्ती / तसेच ईतर आवश्यक अभीलेखे वारंवार मौखीक तसेच लेखी मागणीकरुन सुध्दा लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे उपरोक्त वसतीगृहाच्या अंतीम देयकातुन आवश्यक त्या कपाती न करता सदर वसतीगृहांना जादा प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.792 शिष्यवृत्ती वाटपातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदरबाबत रक्कम रूपये 71,10,635/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गट विकास अधिकारी पंचायत समिती अकोला, मुर्तीजापुर व बाशीटाकळी यांनी मागास वर्गीय विद्यार्थी बीपीएल शिष्यवृत्ती देयकाचे प्रस्ताव तपासलेबाबत नस्तीला नमुद आहे. परंतु, लेखापरिक्षणाचे वेळी प्रस्ताव उपलब्ध करण्यात आले नाहीत.

2) बीपीएल शिष्यवृत्ती वाटप केल्याबाबत शाळेच्या मुख्याध्यापकांची पोच पावती घेणे आवश्यक असतांना पंचायत समिती बार्शी टाकळी व अकोला गट शिक्षण अधिकारी यांची पोच पावती घेण्यात आली.

3) गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रस्तावाची पडताळणी मुख्याध्यापकाकडुन गटविकास अधिकारी, शिविअ पंचायत समिती यांनी तपासल्याचे नस्तीला नमुद आहे. परंतु, प्रत्यक्ष लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही.

4) प्रिमॅट्रीक शिष्यवृत्ती देयक व नस्तीची तपासणी केली असता शिष्यवृत्ती संबंधीत शाळेच्या खात्यात जमा करण्यात आली असुन प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली नाही. शाळेच्या मुख्याध्यापकाकडुन संबंधीत विद्यार्थीना रक्कम कशा प्रकारे प्रदान करण्यात आली? याबाबत उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आले नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन शिष्यवृत्ती धनादेश प्राचार्य यांचे नावे मिळाल्याबाबत नस्तीला नमुद आहे. प्रत्यक्षात विद्यावेतन प्रत्यक्ष विद्यार्थीना मिळाले पाहीजे. असे असताना त्यांना रक्कम कशा प्रकारे प्रदान करण्यात आली? खुलासा होणे आवश्यक आहे.

6) विद्यार्थाना शिष्यवृत्ती वाटप केल्याबाबत मुख्याध्यापक यांचेकडुन विनियोग दाखले / उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आले नाहीत.

7) शाळांचे प्रस्ताव लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाहीत. त्यामुळे नेमक्या विद्यार्थ्याबाबत पडताळणी करता आली नाही. प्रस्ताव व शाळांची नोंदवही उपलब्ध झाली नाही. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना वाटप झाल्याबाबत व वाटप करण्यात आलेल्या विद्यार्थीना वाटप झाल्याबाबत व वाटप करण्यात आलेल्या विद्यार्थी संख्येबाबत खात्री करता आली नाही. सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती वाटप करताना लाभार्थीना आवश्यक ते सर्व निकर्षाची पुर्तता केली किंवा कसे, याबाबत पडताळणी न करता संबंधीताना विभागामार्फत वाटप करण्यात आल्याचे आढळते. खुलासा करावा.

8) शिष्यवृत्ती धनादेश प्राप्त झाल्याबाबत किंवा बँकद्वारे प्रदान झाल्याबाबतचे अभिलेख्याची पडताळणी करता आली नाही. तरी संबंधीत शाळांना विहीत मुदतीत प्रदान करण्यात आले किंवा कसे, याबाबत खुलासा करावा.

9) अखर्चीत निधी शासनाचे योग्य लेखा शिर्षाखाली जमा करण्यात यावा.

10) शिष्यवृत्ती खर्च नियंत्रक नोंदवही व दुबार देयक प्रतिबंध प्रतिबंध नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

**3.793 आंतरजातीय विवाहीतांना प्रोत्साहनपर अनुदान वाटप योजनेतील अनियमीततबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 15,15,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडाराज्य विभाग, शासन निर्णय क्रमांक युटीए 1099/ प्र.क्र. 45/ मावक-2, दिनांक 30/01/1999 नुसार तसेच महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक आजावि-2007/प्र.क्र.191/मावक-2, दिनांक 02/01/2010 लाभ देण्यात आला आहे. परंतु, दिनांक 30/01/1999 चे शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना नुसार विभागाने कार्यवाही केली नाही.

2) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक आजावि-2007/प्र.क्र.191/मावक- 2, दिनांक 02/02/2010 नुसार आंतरजातिय विवाहितांना देण्यात येणाऱ्या अर्थ सहाय्यामध्ये वाढ केली आहे. सदरचे वाढीव अनुदान शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून अनुज्ञेय राहील. पुर्वीच्या आंतरजातिय विवाहांना अर्थसहाय्यक देण्यासाठी ग्राहय धरता येणार नाही, असे स्पष्ट आदेश असतांना विभागाने गोपाल लाहोटी रा. कुरळा तालुका मालेगाव व अनिता राठोड रा. पोहा. तालुका वाशिम यांचा विवाह दिनांक 05/12/2004 रोजीचा असून त्यांना शासन निर्णय 30/01/1999 नुसार रुपये 15,000/- अर्थसहाय्य मंजूर करणे आवश्यक असतांना रुपये 50,000/- प्रदान केले आहे. यामध्ये रुपये 35,000/- जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदान रक्कमेबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित होऊन रक्कम वसूल करुन शासन खाती योग्य लेखाशिर्षात जमा करण्यात यावी. वसूलपात्र रुपये 35,000/-

3) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक युटीए 1099/प्र.क्र.45/ मावक-2, दिनांक 30/01/1999 मार्गदर्शक सूचना क्रमांक 5 (ब) नुसार रुपये 15,000/- अर्थसहाय्य मंजूर करुन त्यापैकी रुपये 7500/- ठेवीच्या स्वरुपात पती-पत्नीच्या नावाने रुपये 7,000/- रोखीने व रुपये 400/- संसारपयोगी साहित्य व रुपये 100/ स्वागत समारंभ याप्रमाणे अर्थसहाय्य देणे आवश्यक असतांना त्यानुसार विभागाने कार्यवाही केली नाही.

4) दिनांक 30/01/1999 अन्वये परिच्छेद क्रमांक 11 नुसार परिशिष्ठ ड मध्ये विहीत नमुन्यात नोंदवही ठेवल्याचे दिसुन आले नाही.

5) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक युटीए-1099/प्र.क्र.45/मापक-2, दिनांक 30/01/1999 अन्वये या योजने अंतर्गत प्रत्येक आर्थीक वर्षात प्राप्त होणारे अर्ज त्या-त्या आर्थीक वर्षात निकाली काढणे आवश्यक आहे. या करीता समाजकल्याण अधिकारी यांनी माहे सप्टेंबर व माहे मार्च या दोन महिन्यात प्रत्येक आर्थीक वर्षाच्या सहा महिन्यात प्राप्त झालेले अर्ज निकाली काढण्याकरीता सप्टेंबर चा शेवटच्या आठवडा व मार्च महिण्यातील 8 मार्च या महिला दिनाचे औचित्य साधुन प्रकरणे निकली काढणे आवश्यक आहे. मात्र तशा प्रकारचे नियोजन करुन कार्यवाही केल्याचे आढळुन आले नाही.

6) उपरोकत शासन निर्णयाप्रमाणे धनादेश हा पती व पत्नी दोघांची स्वाक्षरी घेवुन देणे आवश्यक असतांना नियमबाहयपणे धनादेश त्रयस्थ् व्यक्तीला देण्यात आले.

7) धनादेश नोंदवही अन्वये धनादेश वितरीत केल्याबाबत लाभार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. करीता सदर धनादेश वितरीत केल्याची खात्री पटत नाही. करीता अर्धसमास पत्र क्रमांक 6 दिनांक 29/09/2016 नुसार संबंधितास वित्त विभागाकडुन खालील धनादेश रोखीकृत झाले किंवा नाही, याची माहिती मागितली असता संबंधिताने सदर

माहिती उपलब्ध् करुन दिली नाही. लेखापरिक्षा अधिनियम 1930 चे कलम 4 व 5 नुसार अभिलेखे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे.

**3.794 विदर्भ विकास मंडळ 3 टक्के अपंग विशेष निधी मधुन लोव्ह व्हीजन किट खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर बाबत रक्कम रूपये 1,50,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी यांचे पत्र क्रमांक नियोजन कक्ष-15/जिवायो/2014-15/358/जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती वाशिम, दिनांक 27/03/2015 प्रमाणे खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, काम पुर्णत्वाचे दाखले लेखापरिक्षणास सादर केले नाही.

2) जिल्हा समाज कंल्याण अधिकारी यांचे प्रशासकिय मंजुंरी आदेश क्रमांक 121 दिनांक 30/01/2016 व तांत्रीक मंजुरी आदेश क्रमांक 122 दिनांक 30/01/2016 मधील अटी नुसार अंध विदयालयाचे दस्ताऐवज व कोणत्या अंध विदयालयाची निवड करण्यात आली. याबाबत अभिलेखे लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाही.

3) मुळ प्रमाणक लेखापरिक्षणास सादर केले नाही.

4) समाजकंल्याण अधिकारी यांचे दरपत्रक मागविणे बाबतच पत्र क्रमांक 157 दिनांक 03/02/2016 तील अट क्रमांक 4, दिनांक 10/02/2016 नंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही, असे नमुद आहे. परंतु, आवक क्रमांक 653,654,655, दिनांक 11/02/2016 ला प्राप्त झाले. नियमबाहयपणे घेण्यात आले.

5) पुरवठा आदेश जा.क्र./जिपवा/सकवि/अपंग/227/2015-16/जि.प.वाशिम दिनांक 12/02/2016 नुसार दिनांक 13/02/2016 पर्यंत पुरवठा पुरविण्यात यावा, असे नमुद आहे. परंतु, लेखापरिक्षणास डिलेव्हरी चलान व साठा नोंदवहीला प्राप्त नोंदी नाहीत. तसेच कोणत्या विदयालयांना वितरीत केल्या. याबाबत नोंदी नाहीत. करीता पुरवठा केल्याबाबत खात्री पटत नाही. नियमबाहयपणे केलेला खर्च मान्य करता येत नाही.

**3.795 इयत्ता 5 वी ते 7 वी व 8 वी ते 10 वी मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदानातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,78,11,100/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतीक कार्यक्रम व क्रिडा विभाग, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक इबीसी-1094/प्र.क्र.2038/प्र.क्र.90/मावक-2, दिनांक 12/01/1996 व दिनांक 31/03/2005 नुसार दरमहा रुपये 60/- प्रमाणे दहा महिन्यांसाठी रुपये 600/- माहे जुन ते मार्च या कालावधी करिता अनुज्ञेय आहे. शासन निर्णय क्रमांक इबीसी2003/प्र.क्र.116/मावक-2, दिनांक 23/05/2003 मधील परिशिष्टं अ नियम 11ब नुसार मंजुर शिष्यवृत्ती दिनांक 26 जुलै, 22 सप्टेंबर व 3 जानेवारी रोजी सभारंभपुर्वक प्रदान करणेबाबत सुचित केलेले असतांना दिनांक 31/03/2016 रोजी एकत्रित प्रदान केलेले दिसुन येते. यावरुन योजनेचे उदिष्टं सफल झालेले दिसुन येत नाही. लाभार्थी विदयार्थांना विहीत मुदतीत लाभ दिलेला नसल्याने लाभापासुन वंचित ठेवणेत आलेले आहे.

2) उपरोक्त् शासन निर्णय दिनांक 23/05/2003 मधील नियम 8 अन्वये सदर शिष्यवृत्ती योजनेची मागणी व प्रस्ताव सादर करतांना मागील वर्षात प्रदान केलेल्या शिष्यवृत्तीचे अनुदानाचे उपयोगिता व अनुदान विनियोग दाखले समाज कल्याण विभागास सादर केलेले नाहीत. त्यामुळे अनुदानाचा विनियोग झाला किंवा कसे, याबाबत अनुपालन दर्शवावे.

3) सदर योजने अंतर्गत प्राप्त् शाळांचे प्रस्ताव गट शिक्षण अधिकारी, समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांनी विहीत टक्केवारीनुसार तपासणी करणे आवश्य्क असतांना तशी कार्यवाही विभागाने केलेली दिसुन येत नाही.

4) उपरोक्त् शासन निर्णय दिनांक 23/05/2003 नुसार मान्यताप्राप्त् शाळांमध्ये शिकणा-या मुलींसाठी लागु असुन समाजकल्याण विभागाने मान्यताप्राप्त् शाळांची अदयावत नोंदवही ठेवुन शिष्यवृत्ती प्रदान करणे आवश्यक

होते. परंतु, तशी नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे विना मान्यतसप्राप्त् शाळांना सदरचा लाभ देण्यात आला किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

5) उपरोक्त शासन निर्णय दिनांक 23/05/2003 मधील परिशिष्ट अ मधील मुददा क्रमांक 4 व 5 नुसार या शिष्यवृत्तीकरिता उत्पन्नाची व गुणांची अट ठेवणेत आलेली नाही. परंतु, शाळेतील उपस्थितीनुसार सदरची शिष्यवृत्ती प्रदान करावयाची असल्याने शाळेतील उपस्थितीनुसार शिष्यवृत्ती प्रदान करावयाची असल्याने प्रस्तावासोबत उपस्थिती पत्रक जोडलेले नाही. तसेच मागणी केलेली शिष्यवृत्ती उपस्थितीनुसार बरोबर असल्याचे प्रमाणपत्र प्रमाणकास जोडलेले दिसुन येत नाही. त्यामुळे अदा केलेली शिष्यवृत्ती उपस्थितीनुसार बरोबर असल्याची तपासणी करता आली नाही.

**3.796 20 टक्के सेसफंड योजने अंतर्गत मागासवर्गीय शेतकरी लाभार्थ्यांना ताडपत्री पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर बाबत रक्कम रूपये 14,98,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाने व्यापक प्रसिध्दी देवुन त्यानुसार लाभार्थ्यांकडुन अर्ज मागणी करुन जिल्हा परिषद अंतर्गत प्रत्येक गावातुन लाभार्थीचे अर्ज घेणे आवश्यक होते. त्यानुसार विभागाने व्यापक प्रसिध्दी केल्याचे अभिलेखे सादर केले नाहीत. तसेच 7 टक्के वनमहसुल व 20 टक्के सेस फंड मागासवर्गीय शेतक-यांना ताडपत्री पुरविणेबाबत एकत्रित योजना राबविणेत आली. त्यामुळे 7 टक्के मधील लाभार्थीचे प्रस्तावातील प्रदाने ही 20 टक्के योजनेतुन झाल्याचे दिसुन येतात. त्यामुळे योजना सफल झाल्याचे दिसुन येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास2012/प्र.क्र. 104/वित्त्-3, दिनांक 16/10/2012 मधील सुचनेनुसार लाभार्थ्यांची यादी निश्चित करुन त्यास सभेची मान्यता घेणे आवश्यक असतांना तसे न करता समाज कल्याण विषय समिती सभेत लाभार्थीची यादी नमुद न करता आकडे नमुद करुन निवड प्रस्तावीत केली. यावरुन प्रत्यक्षात लाभार्थी निवड झाली नसल्याचे दिसुन येते. याबाबत लाभार्थी यादी निश्चीत करुन त्यास सभेची मंजुरी न घेताच नियम बाहयपणे पुरवठा आदेश देवुन साहित्याची खरेदी केली आहे.

3) विभागाने लाभार्थीची गावनिहाय तालुकानिहाय मास्टंर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशा प्रकारची विभागाने कार्यवाही केली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला वारंवार किंवा दुबार लाभ दिला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत मास्टंर नोंदवही ठेवुन दुबार लाभ दिला नसल्याबाबत सत्यता पटवावी.

4) योजनेच्या लाभाकरिता किती अर्ज प्राप्त् झाले? त्यापैकी पात्र किती व अपात्र किती? याबाबतचा तपशील संबंधीत नस्तीतील टिपणीत नमुद केलेला दिसुन येत नाही. त्यामुळे एकुण प्राप्त् अर्जाची शहनिशा करता आली नाही.

5) सदर योजनेच्या अंतर्गत पंचायत समिती, मालेगाव यांचे लाभार्थ्यांचे अर्ज व सभेने मंजुर केलेली यादी अर्धसमास पत्र क्रमांक 17 दिनांक 27/10/2016 देवुनही लेखापरिक्षणात तपासणीत उपलब्ध् झाले नाही. त्यामुळे सदर योजनेत गरजु लाभार्थ्यांना लाभ दिलेबाबत खात्री करता आली नाही. याबाबत जबाबदारी निश्चित करुन सविस्तर खुलासा सादर करावा.

6) साहित्यांचा प्रत्यक्षात पुरवठा पंचायत समिती स्तरावर कधी प्राप्त् झाला? त्याबाबत डिलीव्हरी चलनवर गट विकास अधिकारी यांनी दिनांकीत प्रमाणीत केलेले नाही. पुरवठा आदेश व करारनामामधील अटी व शर्तीनुसार कोणत्याही परिस्थितीत साहित्याचा पुरवठा दिनांक 11/03/2016 पुर्वी करणे बंधनकारक असतांना पंचायत समिती, रिसोड येथे दिनांक 31/03/2016 रोजी 176 नग ताडपत्री पुरवठा झालेबाबत डिलीव्हरी चलनावर नमुद आहे. यावरुन प्रत्येक पंचायत समितीला 21 दिवसांनी उशीरा पुरवठा झाल्याचे दिसुन येते. पुरवठा आदेशातील अटी व शर्ती नुसार उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस -2014/ प्र.क्र.82/ भाग-3/ उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक आठवडयासाठी 0.5 टक्के यादराने रुपये 7492.50 x 3 आठवडे = रुपये 22,478/- दंडाची रक्कम वसुल करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. याबाबत रक्कम वसुल करुन जिल्हा परिषद उपकर खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

7) लाभार्थी निवड उपवनसंरक्षक वनक्षेत्र घोषित गावातील आदिवासी शेतकऱ्यांचे लाभार्थीचे प्राप्त अर्ज व त्यासोबत तांत्रिक मान्यतेतील निवड निकषास लागणारे कागदपत्रेनुसार समाज कल्याण समितीने पात्र लाभार्थीची निवड करुन सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच 15 प्रकरणांमध्ये एकाच घरात दोन व्यक्तींना लाभ देण्यात आलेला आहे.

तसेच बरेच करारनामावर सहया नाहीत, करारनामा साक्षीदार सहया नाहीत, अर्ज प्रस्तवावरील फोटो प्रमाणित केलेले नाहीत. 7/12 एक वर्षापुर्वीचे जोडलेले आहेत. योजनेच्या विहीत कालावधी नंतर नियमबाहयपणे प्रमाणपत्र व दाखले सादर करणेत आलेले आहेत. तसेच कोणतेच अर्ज आवक करणेत आलेले नाहीत. त्यामुळे प्राप्त् अर्ज हे लाभार्थी निवड प्रक्रिया पुर्वी प्राप्त् झालेबाबत खात्री करता आली नाही.

**3.797 20 टक्के मधुन 100 टक्के अनुदानावर मागास वर्गीय महिलांना शिलाई मशीन वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,98,125/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्रं.446/वित्तं/9, दिनांक 20/06/2008 नुसार विहित वेळापत्रकानुसार योजना राबविली नाही.

2) पहिले लाभार्थी निवड करणे व नंतर पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना नियमबाहयपणे प्रथम पुरवठा आदेश देण्यात आला व नंतर लाभार्थी निवड करण्यात आली. पुरवठा आदेश दिनांक 12/02/2016 ला देण्यात आला व लाभार्थी निवड सभा ठराव क्रमांक 3 दिनांक 28/03/2016 ला करण्यात आली. नस्ती नुसार दिनांक 10/03/2016 ला पुरवठा प्राप्त झाला. त्यानंतर लाभार्थीची निवड करण्यात आली. तसेच लाभार्थीचे अर्ज विभाग स्तरावर मागविणे आवश्यक असतांना पंचायत समिती स्तरावर मागविण्यात आले. ते आवक बारनिशीला घेण्यात आले नाही. करीता कधी प्राप्त झाले? याबाबत खात्री पटत नाही.

3) विभागाने ई- निविदा मागविल्या. परंतु, प्रतिसाद न मिळाल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांच्या शेऱ्यान्वये जिल्हा परिषदेत अन्य विभागाचे दर ज्ञात करुन कार्यवाही करणे योग्य असे नमुद केले. त्याप्रमाणे महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, वाशिम यांनी स्पॉट खरेदी धोरणावर मे. जगदिश सेल्स, अकोला यांचे कडुन प्रति नग रुपये 5,875/- दराने शिलाई मशीन खरेदी बाबत प्रक्रिया केली, असे नमुद आहे. परंतु, त्याबाबतचे कोणतेही दस्ताऐवज लेखापरिक्षणास उपलब्ध् झाले नाही. तसेच उदयोग व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाकस- 2014 प्र.क्र.82 /भाग III/ उदयोग- 4, दिनांक 30/10/2015 नुसार स्पॉट खरेदी करीता बाजारपेठेतील दर ज्ञात केल्याबाबतचे दस्ताऐवज एकत्रीत करुन जे दर कमी असतील, तेथुन खरेदी बाबत नमुद आहे. परंतु, त्या प्रकारचे कोणतेही दस्ताऐवज नस्तीस निदर्शनास आले नाहीत. दर कशावरुन कमी आहेत? याची खात्री करता आली नाही.

4) ज्या वर्षातील लाभ त्याच वर्षात देणे आवश्यक असतांना लेखापरिक्षण कालावधी पर्यंत काही लाभार्थीना लाभ दिला नाही. करीता योजनेची उददीष्टपुर्ती झाली नाही, असे निदर्शनास आले.

5) 10 लाखापर्यंत खरेदी करीता रुपये 100/- रुपयाचा करारनामा व त्यापुढील प्रत्येक लाखास रुपये 100/- याप्रमाणे रुपये 500/- रुपयाच्या बॉन्ड पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना रुपये 100/- बॉन्ड पेपरवर वर करारनामा करण्यात आला. करीता रुपये 400/- ने महसुलाचे नुकसान झाले.

6) पुरवठादारास प्रदान केलेली 2 टक्के मुल्यवर्धीत कराची कपात केली नाही किंवा मुल्यवर्धीत कर भरणा केल्याबाबतचे प्रमाणपत्र नस्तीस निदर्शनास आले नाही. मुल्यवर्धीत कराची रक्कम शासनखाती भरणा करण्यात यावी.

7) पुरवठा केलेल्या साहित्याची गुणवत्ता तपासणी साहित्य पुरविण्यापुर्वी व पुरवठा केल्यानंतर शासनमान्य संस्थेकडुन करुन घेणे आवश्यक आहे व पुरवठादाराने साहित्य पुरविण्यापुर्वीचा चाचणी अहवाल सादर केला नाही. पुरवठ्याबाबत सादर केला नाही. मानकानुसार साहित्य व योग्य गुणवत्तेचे साहित्य प्राप्त केले. याबाबत बिलावर प्रमाणीत केले नाही. महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 83 (3) नुसार विभाग

प्रमुखाने तपासणी करुन प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. परंतु, तशा प्रकारची विभागाने कार्यवाही केली नाही व ते न पाहता वित्त विभागाने देयके कशी पारीत केली? याबाबत खुलासा व्हावा

8) प्रशासकिय मान्यता व तांत्रीक मान्यता अट क्रमांक 8 नुसार 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील असावेत अपंग लाभार्थी उपलब्ध् न झाल्यास विहित कार्यपध्दीनुसार इतर लाभार्थींना लाभ देण्यात येईल. परंतु, त्याप्रमाणे मान्यता मिळविण्याबाबत कार्यवाही केली नाही.

9) मास्टर नोंदवही विभाग स्तरावर व पंचायत समिती स्तरावर ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे नोंदवही ठेवण्यात आली नाही. करीता दुबार लाभ दिल्याबाबतची पडताळणी करता आली नाही.

**3.798 13 वने अंतर्गत जंगल भागातील मागासवर्गीय शेतकऱ्यांना 70 टक्के अनुदानावर पॉवर स्प्रेपंप पुरविणे 2013-14 खर्चातील अनियममितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रूपये 22,74,090/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/प्र.क्र. 1239/34, दिनांक 01/09/1993 तसेच शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.408/34, दिनांक 20/04/2001 मधील सविस्तर निर्देशानुसार जिल्हा परिषदेने त्यांच्या स्वउत्पन्नाच्या किमान 20 टक्के रक्कमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणाकरीता योजना राबवुन त्याच वित्तीय वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. सन 2013-14 मधील मंजुर योजनेतील खर्च दोन वर्षांनंतर सन 2015-16 या वित्तीय वर्षात केलेला असुन विलंबाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 अन्वये लाभार्थ्याचा निवडीपासुन ते लाभ देणे पर्यंतचे वेळापत्रक देण्यात आलेले असतांना कालमर्यादा पाळण्यात आल्या नाहीत.

3) 70 टक्के अनुदानावर सदर योजना राबविण्यात आलेली असतांना 30 टक्के लाभार्थी हिस्साची रक्कम लाभार्थीकडुन वसुल केल्याचे व भरणा केल्याबाबत कोणतेही अभिलेखे सादर करण्यात आले नाहीत.

4) अर्धसमास पत्र क्रमांक 6, दिनांक 03/10/2016 अन्वये लाभार्थीची निवड यादी सादर करणेबाबत मागणी करुनही लेखापरीक्षण कालावधीपर्यंत निवड यादी सादर केलेले नाही. त्यामुळे 637 पॉवर स्प्रेपंप कोणत्या लाभार्थ्यांकरीता खरेदी करण्यात आलेत लाभ्यार्थ्यांची मास्टर नोंदवही सादर करण्यात आली नाही.

5) अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 26/09/2016 तसेच क्रमांक 5, दिनांक 03/10/2016 अन्वये पंचायत समितीकडील साठा पुस्तकाची मागणी केलेली असतांना पंचायत समिती यवतमाळ, आर्णी, मारेगाव, दिग्रस, उमरखेड, वणी, बाभुळगावं पुसद, झरीजामणी व महागावं या 10 पंचायत समितीकडील साठा पुस्तके लेखापरीक्षण कालावधी पावेतो तपासणीकरीता सादर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पंचायत समिती स्तरावर साहित्य प्राप्त झाले किंवा कसे किती नग वाटप झालेत व शिल्लक किती याची तपासणी करता आली नाही. संबंधीतावर जबाबदारी निश्चितीसह कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) पंचायत समिती दारव्हा येथील शिल्लक असलेले 26 नग पॉवर स्प्रेपंप हे तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक श्री नरडे यांनी विकल्यामुळे लाभार्थीना वाटप करता आले नाही, असे संबंधीतांनी निर्देशनास आणुन दिले. श्री नरडे यांनी साहित्याची परस्पर विक्री करुन अपहार केलेला आहे. प्रती नग रुपये 5,100/- दराने 26 पॉवर स्प्रेपंप ची रक्कम रुपये 1,32,600/- ची सव्याज वसुली संबंधीतांकडुन होणे आवश्यक आहे.

7) लेखापरीक्षण कालावधी पावेतो पंचायत समितीकडे साहित्य शिल्लक असल्याचे तसेच पडुन असल्याचे दिसुन येते. एकुण 140 नग पॉवर स्प्रेपंप शिल्लक असुन लाभार्थी निवडी अभावी साहित्य पडुन आहे. सन 2013-14 पासुन अर्थात 2 वर्षापुवी पासुन सदर साहित्य पडुन असल्याने साहित्य खरेदीवर प्रतीनग रुपये 5,100/- प्रमाणे झालेले खर्च एकुण रुपये 7,14,000/- निरर्थक ठरला असुन याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित होणे व रक्कम रुपये 7,14,000/- ची वसुल होणे आवश्यक आहे. तसेच लेखापरिक्षणास साठा पुस्तके सादर न केलेल्या 10 पंचायत

समितीकडील शिल्लक साठा बाबत तपासणी करुन त्यासंबंधी सुध्दा जबाबदारी निश्चितीसह रक्कमेची वसुली संबंधीतांकडुन होणे आवश्यक आहे.

8) समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी साहित्य वाटपाबाबतचा मासिक आढावा घेउुन शिल्लक साहित्याचे वाटप होण्याचे दृष्टीने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिसुन येत नाही.

9) लाभर्थ्यांचे एकुण किती अर्ज प्राप्त झालेत, त्यापैकी मंजुरी अर्ज किती नामंजुर अर्ज किती याबाबत अभिलेखे लेखापरीक्षणात सादर करण्यात आले नाहीत.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.557/34, दिनांक 05/10/1989 व दिनांक 01/09/1993 नुसार जंगलभागातील गावे व लाभार्थी यांची नावे नमुद करणे आवश्यक असतांना अशी नोंदवही तयार करण्यात आली नाही. त्यामुळे सदर योजनेअंतर्गत दुबार लाभ देण्यात आली असे शक्य आहे. तरी मास्टर नोंदवही तयार करुन दुबार लाभ दिला नसल्याबाबत सप्रमाण खुलासा करावा.

11) लाभार्थींची निवड यादी नसणे लाभार्थी निवडी अभावी पंचायत समिती स्तरावर साहित्य पडुन असणे ह्या बाबी गंभीर स्वरुपाच्या असुन याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. योजनेची फलश्रृती झालेली नसून योजनेवरील खर्च निष्फळ निरर्थक् ठरला आहे.

**3.799 20 टक्के सेस मधुन मागासवर्गीयांना 100 टक्के अनुदानावर धान्य कोठ्या पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 31,47,744/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/ प्र.क्र.41/33, दिनांक 17 /01/2001 अन्वये लाभार्थी निवडी ही सप्टेंबर पुर्वी होणे आवश्यक आहे. अर्धसमास पत्र क्रमांक 6, दिनांक 03/10/2016 अन्वये लाभार्थी निवड यादीची लेखी मागणी करुन निवड यादी लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

2) अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 26/09/2016 तसेच क्रमांक 5, दिनांक 03/10/2016 अन्वये पंचायत समितीकडील साठा पुस्तकाची मागणी केलेली असतांना पंचायत समिती यवतमाळ, आर्णी, मारेगाव, दिग्रस, उमरखेड, वणी, बाभुळगावं, पुसद, झरीजामणी व महागावं या 10 पंचायत समितीकडील साठा पुस्तके लेखापरीक्षण कालावधी पावेतो तपासणीकरीता सादर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पंचायत समिती स्तरावर साहित्य प्राप्त झाले किंवा कसे किती नग वाटप झालेत व शिल्लक किती याची तपासणी करता आली नाही. संबंधीतावर जबाबदारी निश्चितीसह कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3) लेखापरीक्षण कालावधीपावेतो पंचायत समितीकडे 852 धान्य कोठ्या शिल्लक असल्याचे तसेच पडुन असल्याचे दिसुन येते.

याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन प्रतिनग रुपये 1,747/- प्रमाणे रुपये 14,88,444/- रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1096/ प्र.क्र.178/05, दिनांक 07/10/1997 नुसार योजनेअंतर्गत साहीत्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होणे आवश्यक आहे परंतु प्रत्यक्षात तशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) लाभ्यार्थ्यांची मास्टर नोंदवही सादर करण्यात आली नाही. त्यामुळे दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही.

6) उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही. त्यामुळे योजनेची फलश्रृती झालेली नसुन योजनेवरील खर्च निरर्थक ठरला आहे.

7) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 4 नुसार धान्य कोठ्या योग्य गुणवत्ता असल्याबाबतचा गुणवत्ता तपासणी अहवाल सादर करणे बंधनकारक असतांना गुणवत्ता तपासणी अहवाल लेखापरीक्षणास सादर केला नाही. त्यामुळे साहित्य योग्य गुणवत्तेचे असल्याचे स्पष्ट होत नाही.

**3.800 20 टक्के सेस मधुन मागासवर्गीय 100 टक्के अनुदानावर व 13 वने अंतर्गत जंगल भागातील अल्प भुधारकांना 90 टक्के अनुदानावर एचडीपीई पाईप पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5 व 9) -** सदरबाबत रक्कम रूपये 69,60,888/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 अन्वये लाभार्थ्याचा निवडीपासुन ते लाभ देणे पर्यंतचे वेळापत्रक देण्यात आलेले असतांना कालमर्यादा पाळण्यात आलेल्या नाहीत.

2) समाजकल्याण विषय समिती सभा विषय क्रमांक 3, ठराव क्रमांक 3, पत्र क्रमांक 6, दिनांक 03/10/2016 अन्वये लेखी मागणी करुनही लेखापरीक्षण कालावधीत लाभार्थी निवड यादी सादर करण्यात आलेली नाही.

3) लाभार्थी निवडीबाबत अटी व शर्तीनुसार लाभार्थीची निवड ग्रामसभेतुन होणे लाभार्थीची वार्षिक उत्पन्न रुपये 40,000/- चे आत असणे किंवा लाभार्थी दारीद्रय रेषेखाली असणे, लाभार्थीकडे शेती असणे व शेतात पाणी उपलब्धीची सोय असणे, अर्जदार अनुसुचित जाती, जमाती, विजाअ भज या प्रर्वगातील असणे या निकषावर लाभार्थी निवड केल्याचे कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास 1084/सीआर/ 1633/57, दिनांक 19/01/1995 अन्वये योजना राबविण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा वसुल करणे आवश्यक आहे. 10 टक्के लाभार्थी हिस्सा कोणत्या लाभार्थीकडुन वसुल केला व रक्कम रुपये 2,74,010/- केव्हा भरणा केला याबाबत लेखापरीक्षणास कालावधीपावेतो चलान सादर केली नाही.

5) लेखापरीक्षण कालावधीपावेतो पंचायत समितीकडे 4680 नग साहित्य शिल्लक असल्याचे दिसुन येते.

याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन प्रतिनग रुपये 517/- प्रमाणे 4680 नग एचडीपीई पाईप ची रक्कम रुपये 24,19,560/- वसुल होणे आवश्यक आहे.

6) अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 26/09/2016 तसेच क्रमांक 5, दिनांक 03/10/2016 अन्वये पंचायत समितीकडील साठा पुस्तकाची मागणी केलेली असतांना पंचायत समिती यवतमाळ, आर्णी, उमरखेड, बाभुळगांव, पुसद, झरीजामणी या 6 पंचायत समितीकडील साठा पुस्तके लेखापरीक्षण कालावधीपावेतो तपासणीकरीता सादर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पंचायत समिती स्तरावर साहित्य प्राप्त झाले किंवा कसे किती नग वाटप झालेत व शिल्लक किती याची तपासणी करता आली नाही. संबंधीतावर जबाबदारी निश्चितीसह कार्यवाही होणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास 1093/ प्र.क्र.1239, दिनांक 09/09/1993 अन्वये लाभार्थीची मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामुळे दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही.

**3.801 13 वने अंतर्गत जंगल भागातील शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर सबमर्शिबल इलेक्ट्रीक मोटारपंप पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 44,98,200/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 अन्वये लाभार्थ्याचा निवडीपासुन ते लाभ देणे पर्यंतचे वेळापत्रक देण्यात आलेले असतांना कालमर्यादा पाळण्यात आलेल्या नाही.

2) एकुण 238 संबमर्शिबल इलेक्ट्रीक मोटारपंप खरेदी करण्यात आलेले असतांना 238 लाभार्थींची यादी लेखापरीक्षणास सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 6, दिनांक 03/10/2016 अन्वये लेखी मागेणी करुनही लेखापरीक्षण कालावधीत लाभार्थी निवडयादी सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे लाभार्थी निवडीबाबत लेखापरीक्षणास साशंकता असुन याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

3) लेखापरीक्षण कालावधीपावेतो पंचायत समितीकडे साहित्य शिल्लक असल्याचे तसेच पडुन असल्याचे दिसुन येते.

याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन प्रतिनग रुपये 21,000/- प्रमाणे 34 नग संबमर्शिबल इलेक्ट्रीक मोटारपंप ची रक्कम रुपये 7,14,000/- रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

4) अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 26/09/2016 तसेच क्रमांक 5, दिनांक 03/10/2016 अन्वये पंचायत समितीकडील साठा पुस्तकाची मागणी केलेली असतांना पंचायत समिती यवतमाळ, आर्णी, उमरखेड, बाभुळगांव, पुसद, झरीजामणी या 6 पंचायत समितीकडील साठा पुस्तके लेखापरीक्षण कालावधीपावेतो तपासणीकरीता सादर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पंचायत समिती स्तरावर साहित्य प्राप्त झाले किंवा कसे किती नग वाटप झालेत व शिल्लक किती याची तपासणी करता आली नाही. संबंधीतावर जबाबदारी निश्चितीसह कार्यवाही होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.557/34, दिनांक 05/10/1989 व दिनांक 01/09/1993 नुसार जंगलभागातील गावे व लाभार्थी यांची नावे नमुद करणे आवश्यक असतांना अशी नोंदवही तयार करण्यात आली नाही. त्यामुळे सदर योजनेअंतर्गत दुबार लाभ देण्यात आली असे शक्य आहे तरी मास्टर नोंदवही तयार करुन दुबार लाभ दिला नसल्याबाबत सप्रमाण खुलासा करावा.

6) उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही. त्यामुळे योजनेची फलश्रृती झालेली नसुन योजनेवरील खर्च निरर्थक ठरला आहे.

### 3.802 संत सेवालाल मागासवर्गीय मुंलाचे वस्तीगृह देऊळगांव राजा यांना सहाय्यक अनुदानाचे जादा प्रदान करणेबाबत.

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 2047, दिनांक 15/01/2016 अन्वये रक्कम रुपये 1,88,286/- खर्च करण्यात आला आहे. संत सेवालाल मागासवर्गीय मुंलाचे वस्तीगृह देऊळगांव राजा 100 टक्के अंतीम अनुदान प्रदान करण्यात आले.

एकुण 100 टक्के अनुदान रुपये 1,89,286/- वितरीत केले आहे. त्यातुन दंडाची रुपये 1,000/- कपात करण्यात आली आहे. असे एकुण रुपये 1,88,286/- अतिम प्रदान करण्यात आले आहे.

1) संत सेवालाल मागासवर्गीय मुंलाचे वस्तीगृह देऊळगांव राजा 100 टक्के अंतीम अनुदान प्रस्तावाची तपासणी करतांना महाराष्ट्र शासन समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/माबक-4, दिनांक 16/03/1998 मधील मुद्दा क्रमांक 7 मधील नुसार वस्तीगृहास मान्यता दिल्या नंतर त्याचे सहाय्यक अनुदानाचे प्रदान करतांना वेळोवेळी भेटीच्या आधारे निश्चीत केलेल्या निश्चित केलेल्या सरासरीच्या आधारेच अनुदान निर्धारण केले जाईल. त्याच आधारे वरीलप्रमाणे अनुदान निर्धारण केले परंतु दिनांक 13/08/2013 रोजीची श्री नागापुरक, समाजकल्याण अधिकारी याचे भेटीत एकुण 24 विद्यार्थीनी पैकी केवळ 14 विदयार्थीनी हजर असल्याचे शेरेबुकावरुन दिसते व त्यात 10 विद्यार्थीनी शिकवणीकरीता बाहेर गेल्याचे वस्तीगृह व्यस्थापनाकडुन सांगण्यात आले तशीच नोंद त्यानी शेरबुकमध्ये घेतली वरील शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 7 मधील बाब क्रमांक 6 नुसार प्रत्यक्ष तपासणीचे वेळी वस्तीगृह प्रवेशित विद्यार्थी शाळेत शिकवणीला, प्रात्यक्षीक, खेळ इत्यादी विश्वसनीय कारणाकरीता वस्तीगृहा बाहेर गेले असतील व तपासणी अधिका-याची तशी खात्री झाली

असेल तर तशी नोंद शेरेबुकात घेवुन हजेरी अनुज्ञेय करावी असे निर्देश असतांना तश्या प्रकारे हजेरी अनुज्ञेय केली नाही. त्यामुळे त्याच उपस्थित संख्ये अधारे अनुदान निर्धारण करुन सहाय्यक अनुदाने प्रदान करणे आवश्यक होते. परंतु विभागाने तशी कार्यावाही केली नाही.

संबधीत वस्तीगृहास रुपये 1,59,300/- प्रदान करणे आवश्यक असतांना रुपये 1,88,286/- (रुपये 1,000/- दंड कपात करुन) प्रदान केले आहे. जादा प्रदान रुपये 28,986 /- ची वसुली होणे आवश्यक आहे.

**3.803 जिल्हा परिषद सेस अंतर्गत 20 टक्के अनुदानातुन मागासवर्गीयांकरीता 100 टक्के अनुदानावर 3 एच पी सबमर्सीबल ओपनवेल विद्युत पंप खरेदी खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 954, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 47,99,025/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद सेस अंतर्गत 20 टक्के मागासवर्गीय अनुदानातुन मागासवर्गीय शेतक-यानां 3 एच पी सबमर्सीबल विद्युत पंप खरेदी करुन पुरविण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11-अे, दिनांक 23/11/2015 नुसार शासनाने महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ यांचे सोबत केलेल्या दरकरारा नुसार 5 एच पी विद्युत पंप रुपये 21,000/- प्रति नग या प्रमाणे 277 नग खरेदी केले आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 नुसार यांच पुरवठादार संस्थे सोबतचा दरकरार सुध्दा अस्थिस्तवात होता. व त्यातील अट क्रमांक 20 नुसार या दरकरारानुसार साहित्यचे दर हे तालुका स्तरापर्यंत पुरवठ्यासाठीचे असुन ते नव्याने दर निश्चित होईपर्यंत लागु राहतील. या दरकरारानुसार 3 एच पी विद्युत पंपाचा दर रुपये 16,500/- एवढा होता. परंतु विभागाने शासनाचे नविन दरकरार दिनांक 23/11/2015 अन्वये रुपये 17,325/- प्रति विद्युत पंप म्हणजे रुपये 825/- जादा दराने खरेदी केली आहे.

2) वरील योजना काळजीपुर्वक राबविली असती तर शेतक-यांना लाभ सुध्दा वेळेवर मिळाला असता व त्या कालावधीत अस्थित्वात असलेला याच पुरवठादार संस्थेसोबत असलेला दरकरार दिनांक 27/09/2013 नुसार खरेदी केली असती तर प्रति नग रुपये 825/- या प्रामणे 277 नगाचे एकुण रुपये 2,28,525/- रुपयांची जादाचा खर्च टाळता आला असता आणखी 13 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला असता योजनेमध्ये केलेल्या दिरंगाईमुळे लाभ देता आला नाही. याची जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद 1.5 नुसार, लाभार्थी निवडीची कार्यपद्धती नुसार, प्रथम योजनेची योग्य प्रकारे जाहीरात देणे आावश्यक आहे. विभागाने सरळ लाभार्थ्याकडुन अर्ज मागवुन घेवुन विषय समितीची मंजुरी घेतल्याचे दर्शविले आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1987 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वित्तीय वर्षात साहित्याचे वाटप व्हावयास पाहीजे असे निर्देशित केले आहे तथापि पंचायत समिती स्तरावरील साहित्याची पडताळणी केली असता काही पंचायंत समितीनां पुढील आर्थिक वर्षात साहित्याचे वाटप केले आहे. व काही पंचायत समितीचे लेखापरीक्षण दिनांकापर्यंत साहित्य वाटपा अभावी शिल्लक असल्याने रुपये 3,81,150 /- नाहक गुंतुन पडले आहेत.

**3.804 जिल्हा परिषद सेस अंतर्गत 20 टक्के मागासवर्गीया करीता 100 टक्के अनुदानावर एच डी ई पी पाईप खरेदी खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1020, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 35,83,844/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद सेस अंतर्गत 20 टक्के मागासवर्गीय अनुदानातुन मागासवर्गीय शेतक-यानां एच डी ई पी खरेदी करुन पुरविण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 नुसार शासनाने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचे सोबत केलेल्या दरकरारानुसार एच डी ई पी पाईप 517/- रुपये प्रति नग या प्रमाणे 6932 नग खरेदी केले आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 नुसार यांच पुरवठादार संस्थे सोबतचा दरकरार सुध्दा अस्तित्वात होता. व त्यातील अट क्र 20 नुसार या दरकरारानुसार साहित्यचे दर हे तालुका स्तरापर्यंत पुरवठ्यासाठीचे असुन ते नव्याने दर निश्चित होईपर्यत लागु राहतील. व या दरकरारानुसार एच डी ई पी पाईप चा दर रुपये 470/- एवढा होता. परंतु विभागाने शासनाचे नविन दरकरार दिनांक 23/11/2015 अन्वये रुपये 517/- प्रति एच डी ई पी पाईप म्हणजे रुपये 47/- जादा दराने खरेदी केली आहे.

2) वरील योजना काळजीपुर्वक राबविली असती तर शेतक-यांना लाभ सुध्दा वेळेवर मिळाला असता व त्या कालावधीत याच पुरवठादार संस्थेसोबत असलेला दरकरार दिनांक 27/09/2013 नुसार खरेदी केली असती तर प्रति नग रुपये 47/- या प्रमाणे 6932 नगाचे एकुण रुपये 3,25,804/- रुपयांचा जादाचा खर्च टाळता आला असता आणखी 69 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला असता. योजनेमध्ये केलेल्या दिरंगाईमुळे लाभ देता आला नाही, याची जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद 1.5 नुसार, लाभार्थी निवडीची कार्यपद्धतीनुसार, प्रथम योजनेची योग्य प्रकारे जाहिरात देणे आावश्यक आहे. विभागाने सरळ लाभार्थ्याकडुन अर्ज मागवुन घेवुन विषय समितीची मंजुरी घेतल्याचे दर्शविले आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1987 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वित्तीय वर्षात साहित्याचे वाटप व्हावयास पाहीजे असे निर्देशित केले आहे. तथापि पंचायत समिती स्तरावरील साहित्याची पडताळणी केली असता काही पंचायत समितीनां पुढील आर्थिक वर्षात साहित्याचे वाटप केले आहे. व काही पंचायत समितीचे लेखापरीक्षण दिनांक जुन 17 अखेर पर्यंत साहित्य वाटपा अभावी शिल्लक असल्याने 570 नगाचे रुपये 517/- प्रमाणे एकुण रुपये 2,94,690/- नाहक गुंतून पडले आहे. लाभार्थी निवड वेळीच केली असती तर एवढी रक्कम गुंतून पडली नसती एकंदरीत योतनेतील अनियमितता पाहता 100 टक्के अनुदानावर योजना राबविल्यानंतर सुध्दा एवढ्या मोठ्या प्रमाणावर साहित्य विनावाटप पडुन आहे. योजनेचा लाभ होत नाही. यावरुन दरवर्षी याच प्रकारच्या योजना राबविणे सयुंक्तीक वाटत नाही.

**3.805 जिल्हा परिषद सेस अंतर्गत 20 टक्के अनुदानातुन मागासवर्गीयाकरीता 100 टक्के अनुदानावर 5 एच पी सबमर्सीबल ओपनवेल विद्युत पंप खरेदी खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 953, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 47,88,000/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद सेस अंतर्गत 20 टक्के मागासवर्गीय अनुदानातुन मागासवर्गीय शेतक-यानां 5 एच पी सबमर्सीबल विद्युत पंप खरेदी करुन पुरविण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद क्रमांक 7 अन्वये योजनच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी वार्षिक आखणी केली नाही.

2) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 नुसार शासनाने महाराष्ट्र कृषी उदयोग विकास

महामंडळ यांचे सोबत केलेल्या दरकरारा नुसार 5 एच पी विद्युत पंप रुपये 21,000/- प्रति नग या प्रमाणे 228 नग खरेदी केले आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 नुसार यांच पुरवठादार संस्थे सोबतचा दरकरार सुध्दा अस्थिस्तवात होता व त्यातील अट क्रमांक 20 नुसार या दरकरारानुसार साहित्यचे दर हे तालुका स्तरापर्यंत पुरवठ्यासाठीचे असुन ते नव्याने दर निश्चित होईपर्यंत लागु राहतील. व या दरकरारानुसार 5 एच पी विद्युत पंपाचा दर रुपये 20,000/- एवढा होता. परंतु विभागाने शासनाचे नविन दरकरार दिनांक 23/11/2015 अन्वये रुपये 21,000/- प्रति विद्युत पंप म्हणजे रुपये 1,000/- जादा दराने खरेदी केली आहे.

3) वरील योजना काळजीपुर्वक राबविली असती तर शेतक-यांना लाभ सुध्दा वेळेवर मिळाला असता व या कालावधीत अस्थित्वात असलेला याच पुरवठादार संस्थेसोबत शासनाचे दरकरार दिनांक 27/09/2013 नुसार खरेदी केली असती तर प्रति नग रुपये 1,000/- या प्रमाणे 228 नगाचे एकुण रुपये 2,28,000/- रुपयांचा जादाचा खर्च टाळता आला असता आणखी 11 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला असता. योजनेमध्ये केलेल्या दिरंगाईमुळे लाभ देता आला नाही, याची जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद 1.5 नुसार, लाभार्थी निवडीची कार्यपद्धती नुसार, प्रथम योजनेची योग्य प्रकारे जाहीरात देणे आावश्यक आहे. विभागाने सरळ लाभार्थ्यांकडुन अर्ज मागवुन घेवुन विषय समितीची मंजुरी घेतल्याचे दर्शविले आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1987 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले आहे, त्याच वित्तीय वर्षात साहित्याचे वाटप व्हावयास पाहीजे असे निर्देशित केले आहे. तथापि पंचायत समिती स्तरावरील साहित्याची पडताळणी केली असता काही पंचायत समितींना पुढील आर्थिक वर्षात साहित्याचे वाटप केले आहे. व काही पंचायत समितीचे लेखापरीक्षण दिनांकापर्यंत साहित्य वाटपा अभावी शिल्लक असल्याने रुपये 3,57,000/- नाहक गुंतुन पडली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.806 शासकीय अपंग वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना नियमबाह्य प्रमाणापेक्षा जादा आहारावर केलेल्या खर्चाकरीता अनुदानाचे वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** समाजकल्याण विभाग अंतर्गत शासकीय अपंग वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना आहाराबाबत रक्कम रूपये 1,31,950/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रमांक इडीडी1085/2183/के.नं.193/सीए-2, दिनांक 17/12/1986 नुसार अपंगांच्या शासकीय संस्थातील लाभार्थ्यांच्या आहारप्रमाणात सुधारणा करण्यात आली असुन त्यानुसार मटण, मासे किंवा अंडी महिन्यातुन 4 वेळा देण्यात यावे असे असतांना सुध्दा उपरोक्त शासन निर्णयाचे उल्लंघन करुन काही महिन्यात 5 वेळा देण्यात आल्याने त्यांना वरीलप्रमाणे शासकीय अपंगाच्या संस्थांना एकुण रुपये 11,800/- अनुदानाचे जादा वाटप करण्यात आलेले असुन ते वसुल करावे.

2) वरील शासन निर्णयाप्रमाणे भोजनामध्ये महिन्यातुन मटण, मासे किंवा अंडी अशा वेगवेगळया घटक पदार्थ महिन्यातुन 4 वेळा देण्याबाबत निर्देश असतांना निव्वळ मटणाचा आहारात समावेश केल्याचे दिसुन आले, तरी सदर आहारात वेगवेगळया घटक पदार्थाचे मटणाच्या व्यतीरिक्त कधी मासे तसेच अंड्यांचा समावेश करणे आवश्यक होते, तरी याबाबत कोणताही खुलासा सादर न केल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे.

3) वरील शासन निर्णयाप्रमाणे प्रति लाभार्थी 125 ग्रॅम किंवा 2 अंडी असा आहाराचे प्रमाण ठरवुन देण्यात आलेले आहे, तरी सदर संस्थांमध्ये सन 2015-16 या वर्षात एकुण प्रवेशीत विद्यार्थी यादी तसेच दैनंदिन आहार नोंदवही उपलब्ध न झाल्याने केलेला खर्च योग्य असल्याची खात्री पटत नाही.

**3.807 गैरहजर विद्यार्थ्यांकरीता अनुदानातुन कपात करणे आवश्यक असतांना कपात न करता नियमबाह्य अनुदानाचे वाटप करणे तसेच इतर अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सन 2015-2016 चे समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद नागपूरचे लेखापरीक्षणाचे वेळी खालील वस्तीगृहांना गैरहजर विद्यार्थ्यांचे अनुदानातुन कपात न करता नियमबाह्य अनुदान रक्कम रूपये 8,92,800/- चे वाटप करण्यात आल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 चे जोडपत्रातील नियम 7(2) नुसार गैरहजर विद्यार्थ्यांकरीता अनुदान अनुज्ञेय राहणार नाही असे नमुद असतांना प्रमाणक क्रमांक 5123, 5311, 5314, 4260 व 4979, दिनांक 31/03/2016 अन्वये गैरहजर विद्यार्थीकरीता अनुदानाचे रक्कम रुपये 42,300/- जादा वाटप करण्यात आल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे. तरी जादा वाटप केलेले अनुदान संबंधीत संस्थेकडून वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

**3.808 सनदी लेखापालाचा अंकेशन अहवालाच्या आधारावर परिपोषण अनुदान मंजुर न करता नियमाबाह्यरित्या मान्य संख्यावर अनुदान मंजुर करणे व इतर अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 3439, दिनांक 14/03/2016 अन्वये रुपये 2,83,300/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 नुसार परिशिष्ट ई हे संस्थेने मागील वर्षाचा अनुदान विनीयोगाचा सनदी लेखापालाच्या अंकेशन अहवालानुसार केलेल्या विवरण जोडावयाचे आहे. व त्यानुसार चालु वर्षाचे अनुदान मंजुर करावयाचे आहे. तरी पी.जी. जोशी ॲन्ड कंपनी सनदी लेखापाल यांचा दिनांक 01/10/2012 ला प्राप्त सन 2011-12 च्या अहवालानुसार संस्थेने मान्य केलेल्या बाबीवरचा खर्च 3,14,560/- इतकाच असतांना म्हणजे संस्थेने प्रत्यक्षात तेवढाच खर्च केलेला असतांना तेवढेचे चालु वर्षाचे अनुदान मंजुर करणे आवश्यक होते. परंतु नियमाबाह्यरित्या त्यापेक्षा जादा अनुदान मंजुर केल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे.

2) वरीलप्रमाणे 54 मान्य संख्येवर अनुदान मंजुर करतांना 630 x 10 x 54 = 3,24,200/- व 270 x 6 x 54 = 87,480/- या पध्दतीने परिगणना केलेली असुन अशा प्रकारे परिगणना न करता मंजुर संख्यानुसार रुपये 900/- प्रति विद्यार्थीकरीता 10 महिन्याचे अनुदान परिगणीत करणे आवश्यक होते, तरी वरीलप्रमाणे परिगणना करण्याचे प्रयोजन काय ? याबाबत कोणतेही उत्तरे लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

3) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 चे जोडपत्रातील नियम 8(अ) नुसार मान्यता दिलेल्या वस्तीगृहांना विहीत दराने दहा महीन्याकरीता पहिला हप्ता माहे जुन मध्ये 60 टक्के इतके अग्रीम अनुदान देता येईल व दुसरा हप्ता माहे जानेवारी मध्ये 40 टक्के माहे मार्च पुर्वी वितरीत करता येईल असे नमुद असतांना शासन निर्देशाचे उल्लंघन करुन प्रथम 40 टक्के अग्रीम व नंतर अंतिम अनुदानाचे वाटप केलेले आहे.

4) प्रमाणकाला संलग्न असलेला आदेश क्रमांक जिपना/सकवि/वगृ/421/92, दिनांक 15/07/1992 नुसार वस्तीगृहाकरीता 35 + 5 = 40 इतकी मंजुर संख्येचा आदेश असुन मंजुर संख्येच्या वाढीव 20 टक्के आर्थिकदृष्ट्या विद्यार्थ्यांना प्रवेश देता येते तरी एकुण वाढीव संख्या 48 इतकी होत असतांना वरीलप्रमाणे एकुण 54 विद्यार्थ्यांकरीता अनुदान मंजुर करण्यात आल्याने 6 विद्यार्थ्यांचे संपूर्ण वर्षाचे 6 x 900 x 10 = 54,000/- जादा अनुदानाचे वाटप झालेले आहे. तरी एकुण 54 मंजुर संख्येचा सुधारीत आदेशासह अनुपालन करावे तोपर्यंत खर्च तात्पुरते अमान्य करण्यात येत आहे.

**3.809 मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर टिनपत्रे पुरविणेबाबत अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद सेस फंडाअंतर्गत मागासवर्गीय शेतकऱ्यांना टिनपत्रे पुरविणे बाबत प्रमाणक क्रमांक 1948, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 29,95,200/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांच्या स्वत:च्या उत्पन्नातून राबविण्यात येणा-या वैयक्तीक लाभांच्या योजनेतील मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक 30/11/2015 पर्यंत लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे, दिनांक 31/01/2016 पर्यंत पुरवठादाराचे देयके अदा करणे व मार्च 2016 पर्यंत विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) पुरवठा पोहोच पावती (08 पंचायत समित्या) वर साहित्य प्राप्त झाल्याचे तारीख नमूद नसल्यामुळे प्रत्यक्षात साहित्य कधी प्राप्त झाले याची शहानिशा करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/ 34, दिनांक 01/09/1993 तसेच शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील वेळापत्रकानुसार साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केली नाही. योजनेचे उद्दिष्ट मागासवर्गीयांचे घरांचे ऊन, वारा, पाऊस यापासुन संरक्षण करुन कुटुंबाचे सामाजिक उन्नतीकरिता सहाय्य करणे असे आहे, परंतु योजनेचा लाभ त्याच वित्तीय वर्षात न दिल्याने योजनेचे उद्दिष्ट साध्य झाले नाही.

4) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 1083/1074, दिनांक 09/01/1983 नुसार योजना सफल झाल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे तपासणी अहवाल नाही.

5) साठा पुस्तकाची तपासणी केली असता त्यावर वाटप दिनांक आढळले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात केव्हा साहित्य वाटप करण्यात आले याबाबत शहानिशा करता आली नाही.

**3.810 मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर सौरउर्जा कुंपन (काटेरी तार) पुरविणगबाबत अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद सेस फंडाअंतर्गत मागासवर्गीय शेतकऱ्यांना सोरउर्जा कुंपन (काटेरी तार) पुरविणे बाबत प्रमाणक क्रमांक 1947, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 34,29,600/- सौरउर्जा कुंपन (काटेरी तार) खरेदी करण्यात आले आहे. सदर साहित्य जिल्हा परिषद वर्धा अंतर्गत असलेल्या 08 पंचायत समितींना वाटप केल्याचे पोहोच पावतीवरुन निदर्शनास येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांच्या स्वत:च्या उत्पन्नातून राबविण्यात येणा-या वैयक्तीक लाभांच्या योजनेतील मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक 30/11/2015 पर्यंत लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे, दिनांक 31/01/2016 पर्यंत पुरवठादाराचे देयके अदा करणे व मार्च 2016 पर्यंत विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) पुरवठा पोहोच पावती (08 पंचायत समित्या) वर साहित्य प्राप्त झाल्याचे तारीख नमूद नसल्यामुळे प्रत्यक्षात साहित्य कधी प्राप्त झाले याची शहानिशा करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/ 34, दिनांक 01/09/1993 तसेच शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील वेळापत्रकानुसार साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 1083/1074, दिनांक 09/01/1983 नुसार योजना सफल झाल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे तपासणी अहवाल नाही.

5) सदर योजना ही जिल्हा परिषद स्तरावरुन राबविण्यात आली असल्यामुळे सर्व प्रक्रिया जिल्हा परिषद स्तरावरुन पार पाडणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

6) साठा पुस्तकाची तपासणी केली असता त्यावर वाटप दिनांक आढळले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात साहित्य वाटप केव्हा करण्यात आले याबाबत शहानिशा करता आली नाही.

**3.811 अपंग विद्यार्थीना शिष्यवृत्ती वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** प्रमाणकानुसार समाजकल्याण विभागाने अभिकरण निधीतून अपंग विद्यार्थीच्या शिष्यवृत्ती शाळेच्या मुख्याध्यापकांच्या बँक खाते 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 6,88,964/- प्रदान करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1010/प्र.क्र.68/भाग-4/कोषा प्र.5, दिनांक 24/01/2013 नुसार वर्धा जिल्हयातील सर्व प्रकारच्या शिष्यवृत्या दिनांक 01/02/2013 पासून विद्यार्थीच्या थेट बँक खात्यात जमा करणे बंधनकारक असतांना, विभागाने अपंग विद्यार्थीच्या शिष्यवृत्ती शाळेच्या मुख्याध्यापकांच्या बँक खात्यात जमा केले आहे.

2) सदर शिष्यवृत्ती रक्कम प्राप्तीबाबत संबंधीत विद्यार्थी / विद्यार्थी पालकांकडून पोच पावती घेण्यात आले नाही.

**3.812 मागासवर्गीय आयटीआय प्रशिक्षित महिलांना सिलाई मशिन पुरविण्याबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दुर्गा सुरजलाल मोहनकर व ज्योती विनोद शेंडे हयांच्या जातीचे प्रमाणपत्र व सिलाई मशिन प्रशिक्षण प्रमाणपत्रावर खाडाखोड करून लाभ दिल्याचे दिसून येते. दुर्गा सुरजलाल मोहनकर हिचे शासकीय तंत्रनिकेतन, साकोली येथील शिवणयंत्र प्रशिक्षण प्रमाणपत्र आहे. हिच्या प्रमाणपत्रावर खाडाखोड करुन तसेच जातीचे प्रमाण्पत्रावर खाडाखोड करून ज्योती विनोद शेंडे हिला लाभ देण्यात आलेला आहे. म्हणजेच वरील दोन्ही लाभार्थ्यांनी समाजकल्याण विभागाची फसवणुक करुन लाभ घेतल्याचे दिसून येते. म्हणून त्यांना दिलेला लाभ रुपये 6,774/- वसूलपात्र ठरतो.

2) तांत्रिक मंजुरी आदेशातील अटी व शर्ती नुसार अनुसुचीत जाती व जमाती, विजा.भज. तसेच नवबौध्द प्रवर्गातील लाभार्थ्यांनाच सदर योजनेचा लाभ देणे असे नमूद आहे परंतु लाभ देतांना एसबीसी प्रवर्गातील 1) शालीनी विशाल भोंडे हिला लाभ देण्यात आलेला आहे त्यामुळे रुपये 3,387/- वसुलीपात्र ठरते.

3) तांत्रिक मान्यतेतील अटी व शर्ती नूसार शिवणकला प्रशिक्षण प्रमाणपत्र हे एक वर्ष कालावधीचे असणे बंधनकारक आहे असे नमूद आहे. परंतु अटी व शर्तीनुसार 7 लाभार्थ्यांचे अर्ज प्रस्ताव तपासतांना शिवणकला प्रशिक्षण प्रमाणपत्र हे एक वर्ष कालावधीपेक्षा कमी असल्याचे दिसून आले.

4) सदर योजना जिल्हा परिषद, समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येते. त्यामुळे लाभार्थ्यांच्या अर्ज प्रस्तावाला अंतिम मान्यता देण्याचे अधिकार समाजकल्याण समितीला आहेत. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांचे अर्ज व प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडे असणे आवश्यक आहे. परंतु तसे न असता समाजकल्याण विभागाकडील सर्व अर्ज पंचायत समिती स्तरावर ठेवण्यात येतात असे सांगण्यात आले. लेखापरीक्षणाकरीता तुमसर व पवनी तालुक्यातील अर्ज उपलब्ध् करुन देण्यात आले तर भंडारा, साकोली, लाखनी, लांखादुर, मोहाडी तालुक्यातील अर्ज व प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

**3.813 वस्तीगृहांना ईमारत भाडे ची जास्त प्रदान केलेली रक्कम वसुल करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद गोंदिया सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.एच.1097/प्रक्र./107/मावक-4, दिनांक 16/03/1998 अन्वये एका विदयार्थी

मागे जास्ती जास्त 40 चौ.फुट या प्रमाणात शयन व भोजनासाठी पुरेशी जागा मान्य केलेली आहे. त्या अनुषंगाने खालील तपशीलामध्ये दर्शविण्यात आलेल्या वस्तीगृहांना अदा करण्यात आलेली भाडे रक्कम चुकीच्या पध्दतीने परीगणना केल्यामुळे जादा रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे.

1) रमाबाई मुलीचे वस्तीगृह देवरी, जिल्हा गोंदिया यांचे इमारत भाडे मंजुरी संबंधीचे आस्थापना आदेश क्रमांक जिसकअ/जिपगो/अनुवगृ/इमारत भाडे/222/16, दिनांक 31/03/2016 अन्वये 75 टक्के देय रक्कम म्हणून माहे एप्रील-2014 ते माहे फेब्रवारी 2016 पर्यंत एकूण 23 महिन्याचे भाडे रूपये 1,44,060/- अदा करण्यात आले आहे.

भाडे रक्कम रुपये 82,800/- अनुज्ञेय असतांना वरील देयकाद्वारे रुपये 61,260/- जादा प्रदान करण्यात आलेले आहे.

2) साईबाबा आदिवासी मुलांचे वस्तीगृह डोंगरगाव डेपो, तालुका सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया यांचे इमारत भाडे मंजुरी संबंधीचे आस्थापना आदेश क्रमांक जिसकअ/जिपगो/अनुवगृ/इमारत भाडे/225/16, दिनांक 31/03/2016 अन्वये 75 टक्के देय रक्कम म्हणून माहे मार्च 2010 ते माहे फेब्रवारी 2015 पर्यंत एकुण 60 महिन्याचे भाडे रूपये 60,030/- अदा करण्यात आले आहे.

भाडे रक्कम रुपये 45,405/- अनुज्ञेय असतांना 60,030/- प्रदान झाल्यामुळे रुपये 14,625/- जादा प्रदान झाले आहे.

**3.814 अनुदान निर्धारणातील रक्कम जास्त प्रदान केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 2932, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रूपये 8,79,900/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.एच. 1097/प्रक्र./107 मावक-4, दिनांक 16/03/1998 अन्वये सदर वस्तीगृहाचे सन 2014-2015 या कालावधीचे सनदी लेखापाल श्री.श्याम बी. बिन्झाडे यांचे कडून अंकेक्षण अहवाल सादर केले आहे. त्यामध्ये परिपोषण आहारा वरील प्रत्यक्ष खर्च रक्कम रुपये 7,63,394/- दर्शविण्यात आलेली आहे. ही रक्कम विचारात न घेता वरील तपशिलवार विवरणपत्रा मध्ये विद्यार्थी संख्यानुसार रूपये 9,00,000/- परीगणीत करून मान्य करण्यात आली व त्यामधून दंडाची रक्कम रुपये 3,000/- व गैरहजर विदयार्थी ची कपात रक्कम रुपये 17,100/- वजा जाता उर्वरीत रक्कम रुपये 8,79,900/- इतकी शोधन केलेली आहे. सदर प्रदान रक्कमे मधून सनदी लेखापाल यांनी दर्शविलेला प्रत्यक्ष खर्च रुपये 7,63,394/- वजा जाता रुपये 1,16,506/- एवढी जादा प्रदान झालेली आहे. तेव्हा जादा प्रदानाची वसूली करून शासन शिर्षामध्ये जमा करून जमेच्या चालानासह अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

**3.815 अंतिम अनुदान निर्धारणातून देणगीची रक्कम कपात न केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर रक्कम रूपये 5,10,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

देय अनुदानातुन अग्रिम व कपाती वजा करता संबंधीत संस्थेला रुपये 5,10,000/- प्रदान करण्यात आलेले आहे. सनदी लेखापरीक्षण श्री.आर.टी.मदान यांच्या लेखापरीक्षण अहवालात संस्थेला अनुक्रमे 1, प्रमाणक क्रमांक 2738, सिताई कन्यावस्तीगृह अर्जुनी मोर यांना रुपये 12,000/-, प्रमाणक क्रमांक 2648, सावित्रीबाई फुले कन्या वस्तीगृह तिरोडा रुपये 5,000/-, प्रमाणक क्रमांक 2744, जयसेवा आदीवासी मुलांचे वस्तीगृह तिरोडा रुपये 65,000/- देणगी प्राप्त झाल्याचे आढळुन आले. महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक बी.सी.एच.1097/प्रक्र./107/मावक-4, दिनांक 16/03/1998 अन्वये वस्तीगृहाला देणगी घेता येत नाही. सदर संस्थेच्या लेखापरीक्षण अहवालात एकुण रुपये 82,000/- देणगी घेतल्याचे आढळुन आले देणगी रक्कम विभागाने अंतिम अनुदान निर्धारणातून वजा करणे आवश्यक आहे. परंतु संस्थेच्या अंतिम अनुदानातून वजा केलेली

नाही. त्यामुळे संबंधीत संस्थेला रुपये 82,000/- जादाचे प्रदान झालेले आहे. तरी संबंधीत संस्थेकडून रक्कम रुपये 82,000/- वसुल होणे आवश्यक आहे.

**3.816 90 टक्के अनुदानावर पिको फॉल मशिन खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 588, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 14,95,835/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2006/प्र.क्र.366/वित्त-9, दिनांक 31/12/2009 नुसार सदर कामाची ई-निविदा प्रकाशित झाल्याबाबत जाहिरात रोस्टर प्रमाणे विभाग स्तरीय ब वर्ग दैनिक, विभाग स्तरीय ब वर्ग मराठी साप्ताहिक, जिल्हा स्तरीय ब वर्ग दैनिक, जिल्हा स्तरीय ब वर्ग साप्ताहिक अशा एकूण 4 ठिकाणी जाहिरात दिल्याचे वृत्तपत्र कात्रण व प्रमाणित रोस्टर नोंदवही उपलब्ध केली नाही. त्यामुळे अशा प्रकारे कार्यवाही न केल्यामूळे जिल्हा परिषदेला स्पर्धात्मक दराचा फायदा मिळाला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/2010/275/प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 09/10/2011 मधील कलम 10 नुसार पुरवठादाराकडून पतदारी प्रमाणपत्र घेतलेले नाही.

3) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 च्या शेडयुल सी नुसार शिलाई मशिन पिको फॉल या साहित्यावर मुल्यवर्धीत कर साहित्य किंमतीच्या 5 टक्के प्रमाणे रुपये 83,102/- वसुल करुन लेखाशिर्षात जमा करावे. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार प्रदान रक्कमेच्या 2 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 32,241/- वसुल करण्यात यावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/1084/सीआर, दिनांक 19/01/2015 नुसार साहित्य खरेदीपुर्वी 10 टक्के लाभार्थी हिस्सा प्राप्त केलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/109/1239, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) पुरवठा आदेश अट क्रमांक 6 नुसार पुरवठादाराकडून सुरक्षा अनामत 3 टक्के रक्कम रुपये 49,861/- वसुल करण्यात आली नाही. अट क्र.9 नुसार बिलावर साहित्याची मुळ किंमत व विक्रीकर दर्शविणे आवश्यक असतांना मेसर्स वर्धमान मार्केटींग,चंद्रपूर यांनी दिलेले बिल त्याप्रमाणे नसतांना मंजूर केलेले आहे.

7) ई-टेंडर भरल्याच्या व मंजूर केल्याबाबत कोणतेही अभिलेख व दस्तऐवजांच्या सत्यप्रती लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाही.

8) पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या मंजूरीचे प्रस्ताव लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. त्यामुळे मंजूर असलेल्या लाभार्थीलाच लाभ दिल्याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. लाभार्थ्यांना साहित्य सुस्थितीत मिळाल्याबाबत लाभार्थ्यांकडून दिनांकित पोचपावत्या घेतल्या नाही.

9) विहित कालावधीत प्रत्येक पंचायत समितीनिहाय साहित्य प्राप्त झाल्याबाबत एकूण 15 पंचायत समितीचे साठा पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिले नाही.

**3.817 अनुदानित वस्तीगृहांना परिपोषण अनुदान वाटपातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूरचे सन 2015-16 चे लेखापरिक्षणात अनुदानित वस्तीगृहांना परिपोषण अनुदान वाटपाचे नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रृटी आढळून आल्यात. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 1110, दिनांक 31/03/2016 रुपये 88,800/- सावित्रीबाई फुले मुलींचे वस्तीगृह धाबा. यांचे सन 2014-15 मुल्यंनिर्धारणाकरीता सनदी लेखापालाचे सन 2012-13 चे अंकेक्षण अहवाल प्रस्तावासोबत जोडण्यात आलेले आहे. संस्थेने मागील वर्षाचा अनुदान विनीयोगाबाबत सनदी लेखापालाच्या अंकेशन अहवालाचे विवरण जोडलेले नाही.

2) प्रमाणक क्रमांक 1001, दिनांक 31/03/2016 रुपये 1,91,560/- मायादेवी कन्या वस्तीगृह ब्रम्हपूरी यांचे प्रस्तावानुसार 3 विदयार्थी वस्तीगृह सोडून गेल्याचे दर्शविलेले असतांना सोडून गेलेल्या विदयार्थ्यांची संख्या 2 दर्शविलेली आहे. त्यामुळे 1 विदयार्थ्याचे परिपोषण अनुदान 900 x 10= रुपये 9,000/- वसूलीपात्र ठरते.

3) प्रमाणक क्रमांक 1076, दिनांक 31/03/2016 रुपये 1,67,300/- विदयार्थी वस्तीगृह गडचांदूर मान्यं विदयार्थी संख्या 36 पैकी श्री.रंजीत धर्मेद्रं गायकवाड हा सतत गैरहजर असतांना 36 विदयार्थ्याचे परिपोषण अनुदान आहरीत करण्यता आल्यामुळे 1 विदयार्थ्याचे परिपोषण अनुदान 900x10= रुपये 9,000/- वसूलीपात्र ठरते. प्रस्तावातील प्रपत्र-ब मधील रकाना क्रं.9 ते 13 मध्ये वर्ष नमुद करण्यात आलेले नाही.

4) प्रमाणक क्रमांक 1004, दिनांक 31/03/2016 रुपये 1,75,320/- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह गोंडपिंपरी यांना सन 2011-12 चे अंतीम अनुदान प्रदान करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन, समाजकल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएस-1097/प्रं.क्रं.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 मधील मुद्दा क्रमांक 8 अ मध्ये नमुद केल्यानुसार करारनामा घेणे आवश्यक असतांना सदरील करारनामा प्रस्तावासोबत जोडण्यात आलेला नसल्यामुळे उपरोक्त शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे.

5) प्रमाणक क्रमांक 1173, दिनांक 31/03/2016 रुपये 87,320/- लैजाबाई गेडाम कन्या नस्तीगृह बाळापूर यांचे प्रस्तावातील प्रपत्र ब नुसार कु. श्वेता अशोक सुर्यवंशी माहे जानेवारी व फेबुवारी मध्ये अनुपस्थित असतांना परिपोषण अनुदानाचे आहरण केल्यामुळे रुपये 900 x 2 = रुपये 1,800/- वसूलीपात्र ठरते.

## 3.818 जिल्हा परिषदसेस फंडाअंतर्गत मागासवर्गीय महिलाना 90 टक्के अनुदानावर सिंगल फेज आटा चक्की पुरविण्यातील अनियमितता.

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 959, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 9,80,100/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेपीए/2012/प्र.क्रं.680/वित्त्-9, दिनांक 31/03/2013 अन्वये 10 लाख रक्कमेवरील प्रशासकिय मंजूरीचे अधिकार मुख्यं कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्यं कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिष्द यांना आहेत. तथापि वरील प्रकरणी राबविण्यात आलेल्या योजनेचे एकूण मुल्यं रुपये 10,89,000/- असल्यामुळे सदर योजनेची मंजूरी सक्षम प्राधिकारी यांचेकडून न घेता विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी मंजूरी दिल्याचे दिसून येते. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे.

2) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक Ref No./swd/yojana/752/2016, दिनांक 11/03/2016 मधील मुद्दा क्रमांक 3 नुसार कमीत कमी 1 वर्षाची बँक गॅरंटी पूरवठाधारकाकडून मागविण्यात आलेली होती. तथापि नस्तीचे अवलोकन केले असता नस्तीमध्ये जोडण्यात आलेल्या बँक गॅरंटीचा कालावधी दिनांक 16/03/2016 पर्यंतच असल्यामुळे सदरील कालावधी पुरवठा आदेश देण्यापूर्वीच संपूष्टात आल्याचे दिसून येते.

3) करारनाम्यावर करारनामा करुन घेण्या-या सश्रम प्राधिकारी यांची स्वाक्षरी व दिनांक नमुद नाही.

4) करारनाम्यातील अट क्रमांक 9 नुसार पुरवठा पश्चात बॅचनिहाय नमुने काढून शासकिय अभियांत्रिकी महाविदयालय यांचेकडून गुणवत्ता चाचणी करणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. सदर संस्थेकडून प्राप्त प्रमाणपत्राची तपासणी केली असता त्यांचे प्रमाणपत्र क्रमांक GCOEC/MECH/Testing/2016/1299, दिनांक 31/03/2016 मध्ये तपासणी केलेल्या मशीनचा बॅच क्रमांक किंवा मशीन क्रमांक नमुद नसल्यामुळे तसेच पुरवठा केलेल्या मशीनचा क्रमांकाची तसेच बॅच नंबरची यादी नस्तीमध्ये उपलब्ध नसल्यामुळे गुणवत्ता चाचणी अहवाल पुरवठा करण्यात आलेल्या मशीनचाच असल्याबाबत खात्री होत नाही.

5) पंचायत समिती राजूरा व चिमूर यांना पुरवठा करण्यात आलेल्या मशीनचे पुरवठा विवरणावर पुरवठाधारक यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

6) सिंगल फेज आटा चक्कीकरीता पात्र लाभार्थ्यांच्या यादीचे अवलोकन केले असता सदर यादीमध्ये एकूण 39 पात्र लाभार्थ्यांची नांवे असून पुरवठा आदेशानुसार एकूण 45 आटा चक्कीची खरेदी करण्यात आल्याचे दिसून येते. तसेच पंचायत समिती चिमूर येथील फक्त एकच लाभार्थ्यी पात्र असतांना त्यांना 7 आटा चक्कीचा पुरवठा करण्यात आलेला आहे. त्यामुळे खरेदी करण्यात आलेल्या जास्तीच्या 06 आटाचक्कीची जिल्हा परिषद हिस्याची रक्कम रुपये 21,780 X 6 = रुपये 1,30,680/- वसूलीपात्र ठरते.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक पंरास/1082, दिनांक 29/06/1989 अन्वये राबविलेल्या योजनेचे मुल्यमापन तीन स्तरावर करणेबाबत निर्देश असतांना योजनेचे मुल्यमापन व फलश्रृती अहवाल नस्तीला आढळून आला नाही.

### 3.819 मागासवर्गीय अल्पभुधारक शेतक-यांना 90 टक्के अनुदानावर सबमर्सिबल पंप पुरवठा करण्यातील अनियमितता

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 561, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 9,91,116/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेपीए/2012/प्र.क्रं.680/वित्त्-9, दिनांक 31/03/2013 अन्वये 10 लाख रक्कमेवरील प्रशासकिय मंजूरीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी/अतिरिक्त मुख्यं कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना आहेत. तथापि वरील प्रकरणी राबविण्यात आलेल्या योजनेचे एकूण मुल्यं 11,01,240/- असल्यामुळे सदर योजनेची मंजूरी सक्षम प्राधिकारी यांचेकडून न घेता विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी मंजूरी दिल्याचे दिसून येते. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे.

2) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक Ref No./swd/yojana/751/2016, दिनांक 11/03/2016 मधील मुद्दा क्रमांक 3 नुसार कमीत कमी 1 वर्षाची बँक गॅरंटी पूरवठाधारकाकडून मागविण्यात आलेली होती. तथापि नस्तीचे अवलोकन केले असता नस्तीमध्ये जोडण्यात आलेल्या बँक गॅरंटीचा कालावधी दिनांक 21/09/2016 पर्यंतच असल्यामुळे एक वर्षाऐवजी फक्तं 6 महिन्यांची गॅरंटी देण्यात आल्यामुळे पुरवठा आदेशातील शर्ती व अटींचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

3) करारनाम्यावर करारनामा करुन घेण्या-या सश्रम प्राधिकारी यांची स्वाक्षरी व दिनांक नमुद नाही.

4) करारनाम्यातील अट क्रमांक 9 नुसार पुरवठा पश्चात बॅचनिहाय नमुने काढून शासकिय अभियांत्रिकी महाविदयालय यांचेकडून गुणवत्ता चाचणी करणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. सदर संस्थेकडून प्राप्त प्रमाणपत्राची तपासणी केली असता त्यांचे प्रमाणपत्र क्रमांक GCOEC/MECH/Testing/2016/1299, दिनांक 31/03/2016 मध्ये तपासणी केलेल्या पंपाचा बॅच क्रमांक किंवा मशीन क्रमांक नमुद नसल्यामुळे तसेच पुरवठा केलेल्या मशीनचा क्रमांकाची तसेच बॅच नंबरची यादी नस्तीमध्ये उपलब्ध नसल्यामुळे गुणवत्ता चाचणी अहवाल पुरवठा करण्यात आलेल्या मशीनचाच असल्याबाबत खात्री होत नाही. तसेच शासकिय अभियांत्रिकी महाविदयालय यांना तपासणीसाठी नमुना सादर केल्याबाबतचे पत्र क्रमांक 991/2016 दिनांक 30/03/2016 नस्तीला आढळून आले नाही.

5) पंचायत समिती राजूरा व बल्लारपूर यांना पुरवठा करण्यात आलेल्या पंप पुरवठा विवरणावर पुरवठाधारक यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

6) सबमर्सिबल पंपाकरीता पात्र लाभार्थ्यांची यादी नस्तीला आढळून न आल्याने लाभार्थी संख्येबाबत खात्री करता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक पंरास/1082, दिनांक 29/06/1989 अन्वये राबविलेल्या योजनेचे मुल्यमापन तीन स्तरावर करणेबाबत निर्देश असतांना योजनेचे मुल्यमापन व फलक्षृती अहवाल नस्तीला आढळून आला नाही.

8) पंचायत समिती भद्रावती अंतर्गत लाभार्थी पुष्पा चरणदास धुर्वे यांनी केलेल्या तक्रारीनुसार त्यांना माहे जुलै 2017 मध्ये प्राप्तं झालेल्या मशीनसोबत सुरक्षा पेटी व स्टार्टर नसल्यामुळे शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी

सदरील पंपाचा वापर करता आला नसल्याची तक्रार दिनांक 24/06/2016 रोजी केलेली आहे. तथापि सदरील साहित्यं लेखापरिक्षण कालावधीपर्यंत लाभार्थ्यांना उपलब्ध करुन उपलब्ध करुन देण्यात न आल्याचे नस्तीवरुन दिसून येते.

9) निविदेतील शर्ती व अटी मधील अट क्रं.24 नुसार पुरवठादार उत्पादक कंपनीचा अधिकृत विक्रेता असल्याबाबतचे प्रमाणपत्र असणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. तथापि अश्या आशयाचे प्रमाणपत्र नस्तीला उपलब्ध नसल्याने याबाबत खात्री करता आली नाही.

### 3.820 अपंगाना विशेष स्कुटर पुरविणे योजनेतील अनियमितता.

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,57,830/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी यांचे अनुदान वितरण आदेशात नमुद अटीनुसार सदर कामावरील निधी दिनांक 31/03/2015 खर्च करणे बंधनकारक असतांना विहीत कालावधीत खर्च करण्यात आलेला नाही.

2) दरपत्रक स्विकृती आदेश क्रमांक सकवि/अपंग-2/स्कुटर/1077/15-16, दिनांक 31/03/2016 मधील अट क्रमांक 7 नुसार दर स्विकृत झाल्यानंतर प्रथम संबधितास नियमानुसार रुपये 100/- चे कोर्ट फी स्टॅपवर नियम व अटीसह करारनामा करावा लागेल असे नमुद आहे. तथापि अश्या प्रकारचा करारनामा न केल्यामुळे अटींचे उल्लंघन झालेले आहे. पुरवठा आदेशातील टिप क्रमांक 1 नुसार पुरवठादारास 3 टक्के सुरक्षा ठेव जमा करण्याबाबत बंधनकारक आहे. तथापि सदरबाबत अभिलेले नस्तीला आढळून आले नाहीत.

3) योजनेचे नियम व अटीनुसार लाभार्थ्याचे वय 18 ते 50 असणे आवश्यक आहे. परंतू लाभार्थी सत्यवान वारलूजी कोकडे यांचे वय 50 वर्षापेक्षा जास्तं असल्याचे दिसून येते.

4) अर्जासोबत जोडावयाचे प्रमाणपत्रासोबत दुचाकी वाहन चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक आहे. परंतू 4 लाभार्थ्यांनी जोडलेले शिकावू परवाने अर्ज सादर केल्यानंतरच्या कालावधीचे आहे.

5) लाभार्थ्यांनी दिलेल्या पोचपावतीवर साहित्य प्राप्तीचा दिनांक नमुद नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक पंरास/1082, दिनांक 29/06/1989 अन्वये राबविलेल्या योजनेचे मुल्यमापन तीन स्तरावर करणेबाबत निर्देश असतांना योजनेचे मुल्यमापन व फलश्रुती अहवाल उपलब्ध झाला नाही.

7) जिल्हाधिकारी यांचेकडून सदर योजनेकरीता प्राप्त अनुदान रुपये 3,81,818/- खर्च रुपये 3,57,830/- व शिल्लक अनुदान रुपये 23,988/- अदयापही जिल्हा परिषदेकडे जमा असून अदयापही संबधितास परत करण्यात आलेले नाही.

### 3.821 मागासवर्गीय वस्तीगृहांना साहित्य नियमबाहयरित्या खरेदी करून पुरवठा करणेबाबत.

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1347, दिनांक 31/03/2016, अन्वये रक्कम रुपये 15,48,960/- आदिवासी मुलांचे 6 वस्तीगृहांना साहित्य वाटप करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई किंवा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून मागासवर्गीय वसतीगृहांना पुरवठा करावयाचे साहित्यांचे शासन दर करार नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त न करताच स्थानिक पुरवठाधारकाकडून दरपत्रक मागवुन साहित्य खरेदी करण्यांत आलेले आहेत.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्रं.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील सुचना क्रमांक-10 चे परि.क्र.4.1मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार रक्कम रुपये 3 लक्षापेक्षा जास्त किंमत असलेल्या साहित्याची खरेदीस ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक असतांना त्या प्रमाणे कार्यवाही न करता स्थानिक पुरवठाधारकाकडून दरपत्रक मागवुन साहित्य नियमबाहयरित्या खरेदी केलेआहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्र.कं-514/वित्त्त-9, दिनांक 20/11/2009 मधील तरतुदीनुसार पुरवठा आदेश देण्यापुर्वी पुरवठाधारकाकडून किंवा अधिकृत विक्रेत्याकडून रुपये 100/- चे स्टँम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना करारनामा केल्याचे आढळले नाही. त्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झाले आहे.

4) पुरवठा आदेशातील अटी नुसार साहित्याचा पुरवठा 7 दिवसांचे आंत न केल्यास आदेश रद्द करून क्रमांक नंबर 2 चे पुरवठाधारकांना संधी देण्यांत येईल असे नमुद असतांना सदर साहित्य दिनांक 27/03/2016 ला प्राप्त झाल्याची नोंद साठा-पंजीचे पान क्रमांक-15 ते 21 वर घेण्यांत आलेली आहे. म्हणजेच सदर साहित्य 3 दिवस उशिराने प्राप्त होऊनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यांत आलेली नाही. विभागाने जर पुरवठा आदेशांत दंडाच्या रक्कमेचीतरतुद करुन उशिराने साहित्य प्राप्त झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्याची अट घातली असती तर संबंधीताकडून दंडाची रक्कम वसुल करता आली असती.

**5)** आदिवासी मुलांचे 6 वस्तीगृहांना (धानोरा,मोहाली,बेळगांव,कुरखेडा,रामगड व एटापल्ली) यांना साहित्यांचा पुरवठा केलेला आहे. परंतु एटापल्ली वसतीगृहांचे अधिक्षक यांचे स्वाक्षरीसह पोहच पावती व उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यांत आलेले नाही.

**3.822 अपंग व्यक्त्तिंना तीन चाकी सायकल खरेदी करून पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1346, दिनांक 31/03/2016, अन्वये रक्कम रुपये 94,800/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई किंवा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून तीनचाकी सायकलबाबत शासन दर करार नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त न करताच स्थानिक पुरवठाधारकाकडून दरपत्रक मागवुन सदर साहित्य खरेदी करण्यांत आले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्र.कं-514/वित्त्त-9, दिनांक 20/11/2009 मधील तरतुदीनुसार पुरवठा आदेश देण्यापुर्वी पुरवठाधारकाकडून किंवा अधिकृत विक्रेत्याकडून रुपये 100/- चे स्टँम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना करारनामा केल्याचे आढळले नाही. त्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झाले आहे.

3) पुरवठा आदेशातील अटी / शर्ती नुसार साहित्याचा पुरवठा 7 दिवसांचे आंत न केल्यास आपला आदेश रद्द करून क्रमांक नंबर 2 चे पुरवठाधारकांना संधी देण्यांत येईल असे नमुद असतांना सदर साहित्य दिनांक 27/03/2016 ला प्राप्त झाल्याची नोंद साठा-पंजी माल पुस्तकाचे पान क्रमांक-22 वर घेण्यांत आलेली आहे म्हणजेच सदर साहित्य 17 दिवस उशिराने प्राप्त होऊनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तसेच विभागाने पुरवठा आदेशांत दंडाच्या रक्कमेची तरतुद करुन उशिराने साहित्य प्राप्त झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल अशी अट न घातल्यामुळे दंडाची कार्यवाही करता आले नाही. परंतु शासन मान्य दरकरारात नमुद अटी/शर्ती प्रमाणे किंवा “मॅन्युअल ऑफ ऑफीस प्रोसीजर फॉर परचेस आँफ स्टोअर्स बाय दि गव्हर्नमेंट डिपार्टमेंटस” या खरेदी नियम पुस्तिकेतील तरतुदीप्रमाणे प्रती आठवडा 0.5 टक्के प्रमाणे उशिरा प्राप्त 12 नगाची रक्कम रुपये 1,422/- संबंधीताकडून दंडाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

4) पुरवठा आदेशाप्रमाणे खरेदी केलेल्या साहित्यांचा तपासणी अहवाल शासन मान्य संस्थेकडून प्राप्त केल्याचे अभिलेख्यांत आढळले नाही. त्यामुळे पुरवठा केलेले 12 नग तीन चाकी सायकल योग्य दर्जाची असल्याबाबतची खात्री होत नाही.

5) निवड यादित नाव नमुद असलेल्या मंजुर लाभार्थ्यांनाच तीन चाकी सायकलचे वितरण करण्यांत आलेले आहे परंतु त्यांचेकडून स्वाक्षरीसह उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करण्यांत आलेले नाही.

6) सुधारित अंतीम तरतुद मंजुर असतांना ती पुर्णपणे खर्च न करता रक्कम रुपये 55,200/- शिल्लक ठेवण्यांत आलेली आहे, त्यामुळे जास्तीत जास्त गरीब/गरजु अपंग व्यक्तिंना योजनेचा लाभ वित्त्तीय वर्षात घेता आला नाही.

**3.823 शासन महसुलाची हानी झाल्याबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत 6 प्रमाणकान्वये लेखाशिर्षनिहाय अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या 845 मुलांना रक्कम रुपये 15,63,250/- शिष्यवृत्ती वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रंमांक ईबीसी 2008/प्र.क्रं. 62/मापक-2, दिनांक 17/03/2009 मधील परी.क्र.3 नुसार सदर विद्यार्थ्यांच्या पालकांकडून रुपये 20/- च्या स्टॅम्प् पेपरवर परिशिष्ट अ मध्ये हमीपत्र घेण्यात यावे असे निर्देश असतांना ऊपरोक्त् प्रमाणकातील विद्यार्थ्यांचे प्रस्ताव तपासले असता जवळपास 90 टक्के प्रस्तावात सदर विद्यार्थ्यांचे पालकांचे हमीपत्र रुपये 5/- च्या शासन कोर्ट फी लावून असल्याचे व ते तसेच स्विकारल्याचे दिसून आले.

2) प्रमाणक क्रमांक 3090, दिनांक 31/03/2016 चे एकूण 47 शाळांचे प्रस्तावातील 272 विद्यार्थ्यांचे रुपये 5/- चे कोर्ट फी स्टॅम्प् लावून हमीपत्र स्विकारण्यात आले आहे. त्यामुळे 272 X 15 = रुपये 4,050/- तफावतीची रक्कम असून ती शासन महसुलाची हानी आहे.

उपरोक्त सर्व प्रमाणकातील प्रस्तावांची तपासणी करून तफावतीची रक्कम शोधून शासन महसुलाची रक्कम शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

**3.824 स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या वसतिगृहास परिपोषण अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7 व 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 97,09,264/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 मधील परिच्छेद क्रमांक 7 (पाच) नुसार स्थानिक विद्यार्थ्यांना कोणतेही अनुदान देण्यात येणार नाही. मात्र, मांग, भंगी, कातकरी व गोंड या जमातीच्या स्थानिक विद्यार्थ्यांना आणि अनाथ, अपंग व निराश्रित छात्रांना अग्रक्रमाने विहीत टक्केवारीचे अधीन राहून प्रवेश देता येईल व त्यावर विद्यार्थी अनुदान देय राहील, असे नमुद आहे. 13 संस्थांनी उपरोक्त जाती / जमातीचे नसलेले स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यापोटी परिपोषण अनुदान प्राप्त करुन घेतलेले आहे. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदींचा भंग झाल्याचे दिसून येते. म्हणून या स्थानिक विद्यार्थ्यांच्या परिपोषण अनुदानापोटी प्रदान झालेली एकूण रक्कम (प्रति विदयार्थी रूपये 9,000/- प्रति वर्ष याप्रमाणे) रूपये 6,03,000/- संबंधीत संस्था / वसतिगृहाकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करुन अुनपालन सादर करावे. त्याचप्रमाणे सन 2015-2016 मधील इतर महिन्यात केलेल्या प्रदानाबाबतही विभागाने पडताळणी करून अतिप्रदानाची रक्कम वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करुन अनुपालन सादर करावे.

2) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 मधील परिच्छेद क्रमांक 9 नुसार प्रवेशाची कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. परंतु, संबंधीत संस्था/ वसतिगृह यांनी वसतिगृह प्रवेशासाठी विस्तृत प्रसिध्दी केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जिल्हयातील गरजू विदयार्थ्यांना वसतिगृहाचा लाभ मिळाल्याची खात्री होत नाही. तसेच प्रवेशासाठी प्राप्त सर्व अर्जांची नोंदवहीमध्ये नोंद घेणे आवश्यक असताना अशी नोंदवही वसतिगृहांनी ठेवलेली नाही. तसेच बहुजनहिताय विदयार्थी वसतिगृह, औरंगाबाद यांना सन 2014-2015 चे परिपोषण अनुदानाची रक्कम सन 2015-2016 मध्ये प्रदान करण्यात आलेली आहे. संबंधीत संचिकेची पडताळणी केली असता प्रवर्गनिहाय कमी /जास्त विदयार्थी संख्येस सक्षम प्राधिका-यांची मंजुरी घेतलेली नसल्याचे दिसून येते. तरी याबाबत अनुपालन सादर करावे.

3) उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 7 (आठ) (फ) नुसार वसतिगृहात आढळून आलेल्या उणिवांबददल प्रत्येक वेळी प्रत्येक प्रकरणात रुपये 1,000/- पर्यंत दंड आकारणे आवश्यक असताना अशा प्रकारे दंड आकारलेला नाही. तरी आता संबंधीत वसतीगृहांकडून प्रत्येकी रुपये 1,000/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 4,000/- वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करुन अनुपालन सादर करावे.

4) सन 2015-2016 या वर्षापूर्वीच्या जुन्या मागण्यांचेही प्रदान सन 2015-2016 मध्ये केलेले आहे. परंतु, सदर देयकांवर संबंधीत रकमेचे याआधी प्रदान केलेले नसल्याचे प्रमाणपत्र नमुद केलेले नाही. तसेच वसतीगृहनिहाय वर्षनिहाय केलेल्या प्रदानाच्या नोंदी नोंदवहीत घेतलेल्या नाहीत. त्यामुळे एकाच कालावधीचे देयकाचे दुबार प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.825 जिल्हा परिषद उपकरातून 100 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील मागासवर्गीयांना शेतक-यांना विद्युत पंप (इलेक्ट्रिक मोटार) 5HP पुरवठा करणेमधील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदर बाबत रक्कम रुपये 2,981,970/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/प्रक्रं104/ वित्त-3, दिनांक 16/10/2012 नुसार जिल्हा परिषदेने योजना राबविताना विषय समितीच्या सभेमध्ये लाभार्थींची यादी निश्चित करावी व त्यास मान्यता घ्यावी. तथापि, मंजूर लाभार्थींची यादी अर्धसमास पत्र क्रमांक 02, दिनांक 06/10/2016 नुसार मागणी करुनही दर्शविण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक 1089/प्रक्रं55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये लाभार्थीची मास्टर नोंदवही ठेवून त्यात नोंदी घ्यावयास पाहिजे. परंतू, विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 30/12/2015 मधील ठराव क्रंमाक 60 नुसार मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर रुपये 30,00,000/- तरतूद ठेवून त्यानुसार पुढील कार्यवाही विभागाने करावी, असे ठरले त्यानुसार विभागाने लाभार्थी निवड करुन व विद्युत मोटारीची खरेदी करुन लाभार्थ्यांना वाटप करण्यासाठी कार्यवाही करणेसाठी शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रंमाक झेडपीई-2008 / प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार लाभार्थी निवड माहे-जून मध्ये करुन माहे-डिसेंबर पर्यंत लाभ देणे आवश्यक आहे. उक्त शासन निर्णयानुसार व वरील प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेतील अटी व शर्ती नुसार कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) प्रमाणे विभाग प्रमुखांनी साहित्यांची पडताळणी करून साहित्यांची गुणवत्ता व दर्जा योग्य असल्याबाबत प्रमाणित करुन देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/ प्र.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 नुसार जिल्हा परिषदेने योजना राबविताना जी यंत्रसामग्री खरेदी करावयाची आहे. त्याच्या गुणवत्तेबाबत व यंत्रसामुग्री सुस्थितीत व मापदंडाप्रमाणे असल्याची खात्री करावी व प्राप्त वस्तूची संबंधीत कार्यालयाकडून तांत्रिक तपासणी करुन घ्यावी. परंतू, अशी कार्यवाही केली नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1094/सीआर-2239/34/67, दिनांक 01/09/1993 अन्वये योजनेअंतर्गत पुरविलेल्या साहित्याचा विनियोग व लाभार्थी आर्थिक स्थिती सुधारणा अहवाल दिला नाही. पूर्तता दर्शवावी.

6) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे पुरवठा आदेश जा.क्रं.2015-16/682, दिनांक 15/03/2016 मधील अट क्रमांक 2 नुसार विद्युत मोटार पुरवठा 30 दिवसात करणे बंधनकारक राहिल. विहीत कालावधीत विद्युत मोटार पुरवठा न केल्यास विद्युत मोटार किंमतीच्या 0.5 टक्के इतकी रक्कम दर सात दिवसासाठी दंड म्हणून आकारण्यात येईल. उक्त पुरवठा आदेशानुसार विद्युत मोटारीचा पुरवठा पोच पावती / डिलेव्हरी चलान नुसार झालेला आहे. साहित्य प्राप्त झालेबाबत डिलेव्हरी चलनवर संबधीत पंचायत समितीने

साहित्य प्राप्त झाल्याबाबतची दिनांकीत पोच दिलेली नाही. त्यामुळे साहित्य विहीत मुदतीत प्राप्त् झालेबाबत खात्री होत नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय मागास 1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 09/09/93 अन्वये ज्या वर्षात साहित्य खरेदी केले आहेत, त्याचे वर्षात वाटप करणे आवश्यक आहेत. परंतु, नियमाप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही.

8) वरीलप्रमाणे पंचायत समित्यांना पुरवठा करण्यात आलेल्या विद्युत मोटारीचे वाटप पंचायत समिती स्तरावर मंजूर लाभार्थ्यांना वाटप केल्याबाबतची अभिलेखे प्रस्ताव, नस्ती, मास्टर नोंदवही व साठा नोंदवही पंचायत समिती, औबाद, फुलंब्री, सिल्लोड, कन्नड व खुलताबाद वगळता उर्वरित पंचायत समितीने अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक 06/10/2016 नुसार मागणी करुनही दर्शविण्यात आले नाहीत. त्यामुळे संबधित पंचायत समितीचे शिल्लक साठयाबाबत अभिप्राय देता आला नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेपीए 2005/ प्र.क्र.366/वित्त-9, दिनांक 05/02/2008 अन्वये 5 लाखावरील जाहिरात वितरणांचे अधिकार विभागीय माहिती उपसंचालक यांना आहेत. परंतु, संदर्भिय खरेदी पुरवठाबाबत जाहिरात विभागाने वर्तमानपत्रात दिलेली नाही.

10) समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद विभागाने तालुका फुलंब्रीस वाटप केलेल्या विदयुतपंप साहित्य वाटप नोंदवहीची तपासणी केली असता श्रीमती गुणाबाई बारकु ढेडवाल, रा. पिंपरी यांना सदर योजनेतुन विदयुत पंप देण्यात आले आहे. तसेच याच लाभार्थीस याच योजनेतुन मिरची कांडप देण्यात आलेले आहे. एकाच लाभार्थीस जिल्हा परिषद उपकरातुन दुबार लाभ देण्यात आलेला आहे. तरी एका योजनेतील दिलेल्या लाभाची रक्कम रुपये 19,490/- संबंधीत लाभार्थीकडुन वसुल करावी.

### 3.826 जिल्हा परिषद उपकरातून 100 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील मागासवर्गीयांना पल्वलायझर मशिन पुरवठा करणेमधील अनियमितताबाबत.

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रुपये 29,99,808/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक 1089/प्र.क्र.55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये लाभार्थीची मास्टर नोंदवही ठेवून त्यात नोंदी घ्यावयास पाहिजे. परंतू, विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/ प्र.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 नुसार जिल्हा परिषदेने योजना राबविताना विषय समितीच्या सभेमध्ये लाभार्थीची यादी निश्चीत करावी व त्यास मान्यता घ्यावी. तथापि, मंजूर लाभार्थीची यादी अर्धसमास पत्र क्रमांक 02, दिनांक 06/10/2016 नुसार मागणी करुनही दर्शविण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) प्रमाणे विभाग प्रमुखांनी साहित्यांची पडताळणी करून साहित्यांची गुणवत्ता व दर्जा योग्य असल्याबाबत प्रमाणित करुन देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/ प्र.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 नुसार जिल्हा परिषदेने योजना राबविताना जी यंत्रसामग्री खरेदी करावयाची आहे. त्याच्या गुणवत्तेबाबत व यंत्रसामुग्री सुस्थितीत व मापदंडाप्रमाणे असल्याची खात्री करावी व प्राप्त वस्तूची संबंधीत कार्यालयाकडून तांत्रिक तपासणी करुन घ्यावी. परंतू, अशी कार्यवाही केली नाही.

4) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे पुरवठा आदेश जा.क्रं.2015-16/682, दिनांक 15/03/2016 मधील अट क्रमांक 2 नुसार पल्वलायझर मशिन 30 दिवसात करणे बंधनकारक राहिल. विहीत कालावधीत पल्वलायझर मशिन पुरवठा न केल्यास पल्वलायझर मशिन किंमतीच्या 0.5 टक्के इतकी रक्कम दर सात दिवसासाठी दंड म्हणून आकारण्यात येईल. उक्त पुरवठा आदेशानुसार विद्युत मोटारीचा पुरवठा पोच पावती / डिलेव्हरी चलाननुसार झालेला आहे.

वरील प्रमाणे साहित्य प्राप्त झालेबाबत डिलेव्हरी चलनवर संबधीत पंचायत समितीने साहित्य प्राप्त झाल्याबाबतची दिनांकीत पोच दिलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/ प्र.क्र.1239/34, दिनांक 09/09/1993 अन्वये ज्या वर्षात साहित्य खरेदी केले आहेत, त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. परंतु, नियमाप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1094/सीआर-2239/34/67, दिनांक 01/09/1993 अन्वये योजनेअंतर्गत पुरविलेल्या साहित्याचा विनियोग व लाभार्थी आर्थिक स्थिती सुधारणा अहवाल दिला नाही. पूर्तता दर्शवावी.

7) वरीलप्रमाणे पंचायत समित्यांना पुरवठा करण्यात आलेल्या पल्वलायझर मशिन वाटप पंचायत समिती स्तरावर मंजूर लाभार्थ्यांना वाटप केल्याबाबतची अभिलेखे प्रस्ताव, मास्टर नोंदवही, नस्ती व साठा नोंदवही पंचायत समिती औरंगाबाद, फुलंब्री व खुलताबाद वगळता उर्वरित पंचायत समितीने अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक06/10/2016 नुसार मागणी करुनही दर्शविण्यात आले नाहीत. त्यामुळे संबधित पंचायत समितीचे शिल्लक साठयाबाबत अभिप्राय देता आला नाही.

8) तालुकास्तरावर औरंगाबाद, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद सोडुन इतर तालुक्यातील वाटप करण्यात आलेले साहित्यांच्या साठा नोंदवहया अर्धसमासपत्र क्रमांक 02, दिनांक 06/10/2016 अन्वये मागणी करुनही दर्शविण्यात न आल्याने पंचायत समिती स्तरावरील शिल्लक साठयाबाबत अभिप्राय देता आला नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेपीए 2005 / प्र.क्र.366/ वित्त-9, दिनांक 05/02/2008 अन्वये 5 लाखावरील जाहिरात वितरणांचे अधिकार विभागीय माहिती उपसंचालक यांना आहेत. परंतु, संदर्भिय खरेदी पुरवठाबाबत जाहिरात विभागाने वर्तमानपत्रात दिलेली नाही.

**3.827 मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100% अनुदानावर डिझेल इंजिन पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 49,92,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पं.रा.स/1093/प्र.क्र.78/05, दिनांक 09/10/1987 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, साहित्य खरेदी व वस्तूचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करावयाचे असतांना पुढील वर्षात केले आहे.

2) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे पत्र क्रमांक सीपीएम/पीएसओ/6जि.117/गुनि/5, दिनांक 23/08/2004 मधील परिच्छेद 6 नुसार जिल्हा परिषदेने महाराष्ट्र राज्य लघू उद्योग महामंडळ यांचे सुचीवर आणि खुल्या बाजारातील दर यांची तुलना करणे आवश्यक असल्याचे कळवूनही विभागाने लघुउद्योग महामंडळाची दरसुची शासन दरकरार समजून खरेदी केली आहे. उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक 3 भाखस 1088/25/2 उद्योग-6, दिनांक 02/01/1992 चे परिच्छेद 8.3 नुसार खरेदीची कार्यवाही निविदा मागवून केली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 मधील परि.क्रमांक प्रमाणे सर्व मागास वर्गीयांची जातनिहाय व गावनिहाय नोंदवही तयार करून लाभार्थींना लाभ देणे आवश्यक असतांना असे लेखे (Record) ठेवले नसल्यामूळे वारंवार एकाच प्रवर्गास किंवा एकाच गावातील मागासवर्गीय लाभार्थ्यांस वारंवार लाभ दिला जाऊन दुबार लाभ दिला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 1993 नुसार सक्षम अधिकारी यांनी आर्थिक परिस्थितीबाबत लाभार्थ्यांची प्रत्यक्ष पाहणी करुन योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

**3.828 जिल्हा परिषद उपकरातून 100% अनुदानावर मागासवर्गीय शेतकऱ्यांना विदयुत पंप (पाण्यातील) संच पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 45,91,125/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेत वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक होते.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पं.रा.स/1093/प्र.क्र.78/05, दिनांक 09/10/1987 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, साहित्य खरेदी व वस्तूचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक होते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/सीआर1265/34, दिनांक 09/12/2003 नुसार लाभार्थ्यांमध्ये 30 टक्के महिलांचा समावेश असणे आवश्यक होते.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थी यादी गावनिहाय नोंदी दुबार लाभ दिले न गेल्याची नोंद घेणे आवश्यक होते.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये 31 जानेवारी पर्यंत साहित्याचा पुरवठा करुन देयके अदा करुन 31 मार्च पर्यंत विनियोगाचे दाखले प्राप्त करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 व मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 मधील तरतूदीनुसार मुद्रांकीत पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना विहीत रक्कमेचा करारनामा मुद्रांक पेपरवर केले किंवा कसे? याबाबत अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

7) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सीपीएम/पीएसओ/6जि.117/गुनि/5, दिनांक 23/08/2004 मधील परिच्छेद 6 नुसार जिल्हा परिषदेने महाराष्ट्र राज्य लघू उद्योग महामंडळ यांचे सुचीवर आणि खुल्या बाजारातील दर यांची तुलना करणे आवश्यक असल्याचे कळवूनही विभागाने लघुउद्योग महामंडळाची दरसुची शासन दरकरार समजून खरेदी केली आहे. उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक 3 भाखस 1088/25/23उद्योग-6, दिनांक 02/01/1992 चे परिच्छेद 8.3 नुसार खरेदीची कार्यवाही निविदा मागवून केली नाही.

8) साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे वित्तीय वर्षात वाटप साहित्य शिल्लक साहित्य व मंजूर लाभार्थ्यांलाच साहित्य वाटप केले. याबाबत पडताळणी करता आली नाही.

**3.829 मागासवर्गीय शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचन अभियानांतर्गत 50% मर्यादेत पूरक अनूदान मंजूरबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर बाबत रक्कम रूपये 7,69,200/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ज्या मागासवर्गीय शेतकऱ्यांनी राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान अंतर्गत ठिंबक सिंचन संच 50 टक्के सबसिडी सन 2014-2015 या वित्तीय वर्षात जिल्हा अधिक्षक, कृषी कार्यालय, जालना, महाराष्ट्र शासन यांचेकडील प्राप्त केली, त्याच शेतकऱ्यांना प्रमाणक क्रमांक 56, दिनांक 19/03/2016 रूपये 4,71,381/- व 295, दिनांक 31/03/2016 रूपये 2,97,819/- एवढी रक्कम मंजूर केली. ज्या लाभार्थ्यांनी शासकीय योजनेतून लाभ घेतला व 50 टक्के सबसिडी प्राप्त केली, त्याच लाभार्थ्यांना पुन्हा 50 टक्के रक्कमेचे केवळ वितरण करणे म्हणजे देय नसतांना त्यांना दुबार लाभ दिल्यासारखे आहे.

**3.830 जिल्हा परिषद सेसमधून शेळ्या वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 114, दिनांक 31/03/2016 रक्कम रूपये 1,16,89,704/- खर्च करण्यात आला आहे.

प्रति लाभार्थी रूपये 49,956/- प्रमाणे 234 लाभार्थ्यांना लाभ द्यावयाचे ठरवून त्याप्रमाणे लाभ देण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/55/34, दिनांक 05/10/1989 प्रमाणे मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे मंजूर यादीतील लाभार्थ्याला किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला दुबार लाभ झाला नसल्याची खात्री करता आली नाही.

2) लाभार्थी निवडीसाठी ग्रामसभेतून शिफारस होणे आवश्यक असताना कागदपत्राअभावी खात्री करता आली नाही.

3) सदरील योजना दारिद्र्य रेषेखालील (अल्प उत्पन्न) लाभार्थ्यांसाठी असताना मंजूर निवड यादीतील तक्त्याप्रमाणे 163 लाभार्थ्यांना निवड होईपर्यंत दारिद्र्य रेषेखाली असल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध केलेले नव्हते.

4) योजना ठाणे बंद पध्दतीने शेळी पालन असताना लाभार्थ्याकडे स्वतःची पुरेशी जागा असल्याबाबतची पुरावे घेतलेले नाहीत.

5) सदरील योजनेसाठी लाभार्थी पात्र होण्यासाठी लाभार्थ्यास दोन पेक्षा जास्त अपत्य असू नये. असे असताना मंजूर निवड यादीतील तक्यानुसार अनुक्रमांक 3, 5, 9, 14, 31, 44, 46, 47, 54, 64, 75, 84, 89, 93, 96, 98, 125, 142, 160, 164, 167, 175, 128 च्या लाभार्थ्यांना दोन पेक्षा जादा अपत्य असल्याबाबत नोंदविलेले दिसून येते. तसेच अनुक्रमांक 17, 40, 81, 85, 86, 87, 88, 95, 100, 108, 113, 145, 166, 214, 221, 233 च्या लाभार्थ्यासमोर नोंद घेण्यात आलेली नाही.

6) गट वाटपानंतर दर तीन महिन्यांनी शेळयांची पडताळणी केलेली नाही. आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच गटापासून मिळणा-या उत्पन्नाची माहिती ठेवण्यात आलेली नाही. तसेच क्षेत्रिय अधिकाऱ्याकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात आलेले नाही. त्यामुळे गट वाटपामुळे लाभार्थाच्या आर्थिक बदल झाला किंवा कसे, याची खात्री करता आली नाही.

7) पुरवठा आदेश नगाप्रमाणे दिलेला असताना पुरवठा मात्र वजनाप्रमाणे करण्यात आलेला आहे. त्यामुळे एका गटात 10 शेळ्या व 1 बोकड असल्याबाबत खात्री करता आली नाही.

8) निवड यादीतील अनुक्रमांक 106 सावंत कुले आशोक भिमा पारगाव जो. ता. आष्टी तसेच अनुक्रमांक 173 रामचंद्र सुरेश माने बनसारोळा तालुका केज यांनी अद्यापपर्यंत गट (शेळया) घेतलेल्या नाही. त्यामुळे रक्कम रूपये 90,000/- पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र अंबाजोगाई व विमा व अनुषंगिक खर्च रूपये 9,912/- असे एकूण रूपये 99,912/- गुंतून पडलेले आहे. सदरील रक्कम वसूल करुन निधीमध्ये भरणा करण्यात यावी.

### 3.831 वस्तीगृहांना नियमबाह्य इमारत भाडे प्रदान करणेबाबत.

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बी सी पी एच 1097/प्र.क्र.107/मावक 4, दिनांक 16/03/1998 चे जोडपत्र अ परिच्छेद 4(अ), ब (2) अन्वये प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी कमाल 40 फुट जागा अनुज्ञेय असताना क्षेत्रफ़ळापेक्षा जादा दिलेल्या भाड्याचे शासनाचे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ज्ञानोबा गणपतराव मुंडे मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह देवगाव सन 2014-2015 मध्ये 48 विद्यार्थ्यांसाठी 1920 चौ फुट जागा अनुज्ञेय असताना 2745 चौरस फुटास दरमहा रूपये 15,640/- भाडे दर्शविले आहे. म्हणजेच 825 चौ फुट जादा दर्शविली आहे. म्हणजे 4694.25*12= 56,331/- चे 75 टक्के रूपये42,248/- जादा अदाई झाली आहे. ती वसुलपात्र ठरते.

2) रेणुका माता कृषी विकास प्रतिष्ठाण मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह सिंधी सन 2014-2015 मध्ये 44 विद्यार्थ्याची मान्यता असताना तसेच उक्त शासन निर्णयान्वये 55 विद्यार्थ्यांसाठी 1760 चौ फुट जागा गरजेची असताना 1778 चौ फुट दर्शविली व त्यास प्रतिमाह रक्कम रूपये 15055/- दर्शविली आहे. म्हणजेच 18 चौ फुट जादा जागा दर्शविली आहे म्हणजेच वर्षभरात रूपये 1827.36/- जादा अदाई झाली आहे. ती वसुलपात्र ठरते.

3) मिलींद विद्यार्थी वसतिगृह परळी वै सन सन 2014-2015 मध्ये 50 विद्यार्थ्यांची मान्यता आहे. तसेच उक्त शासन निर्णयान्वये 50 विद्यार्थ्यांसाठी 2000 चौ फुट जागा गरजेची असताना 2798 चौ फुट दर्शविली व त्यास प्रतिमाह 9350 भाडे दर्शविले आहे. म्हणजेच 798 चौ फुट जागा जादा दर्शविला आहे. म्हणजेच रूपये 23,988/- जादा अदाई झाली आहे. ती वसुल पात्र ठरते.

4) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील बीड विभागांतर्गत असलेल्या प्रमाणपत्र इमारतीचे क्षेत्रफ़ळ नमुद केलेले नाही. त्यामुळे अशाच प्रकारची अनियमितता इतर वसतिगृहामध्ये झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उक्त शासन निर्णयान्वये प्रत्येक विद्यार्थ्यांना अनुज्ञेय क्षेत्रफ़ळापेक्षा जादा क्षेत्रफ़ळाची रक्कम वसुलपात्र ठरते.

**3.832 सभापती, समाजकल्याण अधिकारी यांनी विविध अपंग, मतिमंद, अस्थिव्यंग शाळांना दिलेल्या भेटीबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. समाजकल्याण सभापती, समाजकल्याण अधिकारी यांनी विविध शाळांना दिलेल्या भेटी संदर्भातील भेट रजिस्टर तपासले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अपंग शाळा संहिता 1997 मधील परिशिष्ट अ अन्वये मुद्दा क्रमांक 36 मधील अ क्र 1 ते 11 अन्वये अस्थिव्यंग, मतिमंद विद्यार्थ्यांसाठी विविध सोयीसुविधा साधन सामुग्री पुरविणे आवश्यक असताना प्रत्यक्षात सोयीसुविधा दिलेल्या नसल्याबाबत कारणे दाखवा नोटीसमध्ये व मुख्याध्यापकाच्या खुलाशावरुन दिसून येते. उदा वैयक्तिक स्वच्छता, धान्यसाठा, क्रीडांगण, पुनर्सवसनाबाबत प्रयत्न इत्यादी. असे असतानाही समाजकल्याण विभागाने संबंधित शाळेवर कुठलीही कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

2) ब-याच शाळेमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती 50 टक्के पेक्षा कमी असतानाही व खुलाशामध्ये मुख्याध्यापक यांनी सदर विद्यार्थी ऊसतोडणी मजुराचे असल्यामुळे त्यांच्याबरोबर गेले असल्याचे नमुद करुनही समाजकल्याण विभागाने सदर शाळेचे परिपोषण अनुदान वितरीत करताना त्या विद्यार्थ्यांचे अनुदानाची रक्कम कमी करणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) विद्यार्थ्यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्रे ऑनलाईन करणे तसेच ज्या शाळेंना बायोमॅट्रिक मशीन पुरविल्या आहेत अशा शाळा ते वापरत असल्याबाबतचे अहवाल नसतानाही त्यांच्यावर कुठलीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

वरील 1 ते 3 बाबींवरुन असे दिसून येते की अपंग, मतिमंद इत्यादी शाळांमध्ये भौतिक सुखसुविधा योग्य प्रकारे पुरविल्या जात नसतानाही समाजकल्याण विभागाकडून कुठलीही कार्यवाही केली जात नसल्याचे आढळते. मागील कालावधीत तसेच या आर्थिक वर्षात इतर शाळांबाबतही अशा प्रकारची अनियमितता झाली असल्यास त्याचा आढावा घेऊन नियमानुसार सुयोग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.833 जिल्हा परिषद उपकराच्या 20 टक्के राखीव निधीतून न्हावी व्यवसाय कारागिरांना खुर्ची (साहित्य) पुरवठा करणेसाठी राबविलेल्या योजनेतील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 10,00,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टीप 1 प्रमाणे विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्विकारलेची माहिती पुढील स्थाई समिती व विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु, अशी कार्यवाही झालेचे दिसुन आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर योजना राबविण्यासाठी विहित

वेळापत्रकानुसार अंबलबजावणी विहित केलेली आहे. परंतु, विभागाने सन 2014-2015 या वर्षाची योजना सन 2015-2016 मध्ये राबविलेली आहे. तेव्हा उक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) सदर योजनेस उपरोक्त शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत पातळीवरून प्रसिद्धी देऊन इच्छुक लाभधारकाकडून अर्ज मागवून प्राप्त अर्जातून अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या लाभार्थींची निवड करून त्यास समितीची मान्यता घेऊन लाभ देणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यपद्धती अवलंबीलेचे दिसून आले नाही. त्यामुळे अवलंबिलेली प्रक्रिया वित्तीय औचित्यास अनुसरून नाही.

4) विभागाने मे.आयकॉन इंडस्ट्रीज, औरंगाबाद यांची प्रति नग रुपये 6,755/- ची सर्वात कमी दाराची निविदा मंजूर केलेली होती. वाटाघाटीअंती प्रति नग रुपये 6,550/- दर मंजूर केला. केंद्रीय दक्षता आयोगाच्या निर्देशांनुसार न्यूनतम दरधारक (एल-1) सोबतसुद्धा शक्यतोवर वाटाघाटी करू नयेत, असे निर्देश आहेत. तथापि, त्याचे पालन झालेचे दिसून आले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2012/ प्र.क्र.104/ वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये जिल्हा परिषदांनी साहित्याची खरेदी करताना खरेदी प्रक्रिया ही पारदर्शी पद्धतीने होण्यासंदर्भात खालील मुद्यांवर काटेकोरपणे कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत:-

(i) जे साहित्य खरेदी करावयाचे आहे, त्याच्या गुणवत्तेबाबत खात्री करावी;

(ii) सदर साहित्याची बाजारभावापेक्षा जास्त दर नसल्याची खात्री करावी;

(iii) साहित्य हे सुस्थितीत व मापदंडाप्रमाणे असल्याची खात्री करून त्याची संबंधित कार्यालयाकडून तांत्रिक तपासणी करून घ्यावी; परंतु, अशी उचित कार्यवाही केलेचे अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

6) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांची गटविकास अधिकारी यांच्या शिफारशीसह विहित नमुन्यातील प्राप्त झालेल्या अर्जांची तपासणी केली असता रुपये 100/- बॉडवर साहित्य विक्री हस्तांतरण न करण्याचे हमीपत्र अर्जासोबत दिसून आले नाही.

7) मे.आयकॉन इंडस्ट्रीज, औरंगाबाद यांनी पंचायत समिती जिंतूर, मानवत व पालम यांना अनुक्रमे 36, 13 व 17 खुर्च्यांचा पुरवठा केलेला आहे. परंतु, सदर खुर्च्या ह्या लाभार्थ्यांना वाटप केलेबाबतच्या पोंच पावत्या व साठा नोंदवहीची छायांकित प्रत इयत्ता अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात लाभार्थ्यांना खुर्च्या प्राप्त झालेची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

8) महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 प्रमाणे कार्यकराराकरिता रुपये 10 लाखांपर्यंतच्या कामाकरिता रुपये 100/- व त्यापुढील प्रत्येक लाखाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता रुपये 100/- राहील, असे असताना सदरील खुर्च्या पुरवठा करणेचा कार्यकरार रुपये 12,44,500/- चा आहे. तेंव्हा रुपये 400/- मुल्यांच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु, विभागाने रुपये 100/- मूल्यांच्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. तरी रक्कम रुपये 300/- मे.आयकॉन इंडस्ट्रीज, औरंगाबाद यांचेकडून वसूल होणे आवश्यक आहे. तसेच करारनामा तपासला असता त्यावर साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या दिसून आल्या नाहीत.

9) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आयकर-1007/प्र.क्रं.139/कोषा-प्र-5, दिनांक 04/01/2008 अन्वये सदर देयकातून (12,44,500/-) 2.24 टक्के आयकराची रक्कम रुपये 27,877/- कपात केलेली नाही. तरी संबंधिताकडून रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

10) योजना अंमलबजावणीनंतर लाभार्थ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच सक्षम प्राधिकारी यांचा योजनेबाबतचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास पहावयास मिळाला नाही.

### 3.834 दलित वस्ती सुधार योजनांतर्गत प्राप्त अनुदान व खर्चातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 12,05,65,850/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) समाजकल्याण विभागाने दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत केलेल्या कामांची बृहत (मास्टर) नोंदवही वर्षनिहाय ठेवलेली नाही. त्यामुळे किती कामे पूर्ण झाली व किती कामे अपूर्ण आहेत? याची पडताळणी करता आली नाही.

2) विभागाच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचा जमा-खर्चाचा आढावा घेतला असता सन 2014-2015 वर्षाकरिताची तरतूद सदर वर्षात पूर्णपणे खर्च न करता पुढील वर्षी सन 2015-2016 मध्ये वापरली जाते. तसेच सन 2015-2016 या वर्षाची तरतूद सदर वर्षात पूर्णपणे खर्च न करता शिल्लक ठेवून पुढील वर्षी सन 2016-2017 मध्ये जर वापरत असतील, तर ही बाब आक्षेपाहार्य आहे. त्यामुळे विकास योजनांची प्रगती राखली जात नाही, असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

3) संचिका तपासली असता समाजकल्याण विभागाने सन 2012-2013 व 2013-2014 या आर्थिक वर्षाचे कामनिहाय अनुदान पंचायत समितीना 90 टक्के वाटप केलेले आहे. उर्वरित 10 टक्के रक्कम विभागाकडे शिल्लक आहे. परंतु, 9 कामे रद्द झालेली / सुरु न झालेली आहेत. तेंव्हा सदरील कामांसाठी मंजूर करण्यात आलेली रक्कम अद्यापपर्यंत अखर्चित असून ती शासन खाती भरणा केलेली नाही. त्यामुळे शासनाचे नुकसान झालेले असून शासनाच्या योजनांचा जनतेस फायदा होवू शकला नाही.

तरी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अआर-2013/ प्र.क्र.3/वित्त-2, दिनांक 04/02/2014 अन्वये अखर्चित रक्कमा व्याजासह शासनाच्या सुचनाप्रमाणे तात्काळ शासन खाती भरणा कराव्यात. तथापि, अशी कार्यवाही झालेली नाही. तेंव्हा रक्कम रुपये 12,50,000/- तसेच यावरील मिळालेल्या व्याजाच्या रक्कमेसह तात्काळ रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसू-2011/ प्र.क्र.442/अजाक, दिनांक 05/12/2011 च्या परिशिष्ट अ मधील सूचना क्रमांक 9 अन्वये ग्रामपंचायतीने सदर योजनेची कामे कोणत्याही परिस्थितीत काम मंजूर केल्यापासून एक वर्षाच्या आत पूर्ण करणे बंधनकारक आहे. जर काम अपूर्ण राहिल्यास त्या ग्रामपंचायतीला पुढील दोन वर्षाकरिता निधी देण्यात येऊ नये. तथापि, संचिका तपासल्या असता खालील तपशिलातील कामे अद्यापपर्यंत अपूर्ण असल्याचे निदर्शनास येते. परिणामी, कामे अपूर्ण असल्याने शासनाचा निधी निरर्थक गुंतून पडला आहे. त्यामुळे शासनाचे नुकसान झालेले असून शासनाच्या योजनांचा जनतेस फायदा होऊ शकलेला नाही.

सन 2010-2011=01 काम, सन 2012-2013=05 कामे व सन 2013-2014=13 कामे अद्यापपर्यंत अपूर्ण स्थितीत आहेत. सदरील कामे पूर्ण करून घेणेसाठी उक्त शासन निर्णयानुसार विभागाने उचित कार्यवाही केलेबाबतची अभिलेखे अर्धसमास पत्र क्रमांक 09 दिनांक 06/06/2017 अन्वये लेखी मागणी करुनही लेखापरीक्षणात सादर केलेली नाहीत. कामे अपूर्ण असल्याने शासनाच्या अशा महत्वाकांक्षी योजनेला खीळ बसलेली आहे. परिणामी, शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तेंव्हा सदरील प्रकरणी संबंधितावर योग्य ती कार्यवाही करून रक्कम रुपये 25,50,000/- तात्काळ शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसू-2013/प्र.क्र.85/अजाक-1 दिनांक 01/08/2013 मधील सूचना क्रमांक 2 अन्वये - (i) दलित वस्तीची विकास कामे घेण्यापूर्वी त्या वस्तीचा विकास कामनिहाय बृहत आराखडा (Master Plan) तयार करून सदर संकलित बृहत आराखड्यास (Master Plan) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांची मान्यता घेऊन तो समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद यांना माहितीसाठी सादर करावा असे स्पष्ट निर्देश असताना याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

6) उक्त शासन निर्णयातील सूचना क्रमांक 3 अन्वये समाजकल्याण अधिकारी यांनी ग्रामपंचायतीस भेटी देऊन या योजनेंतर्गत विकास कामांची अंतर्गत तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांनी दुसऱ्या जिल्ह्यातील जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेसमवेत या योजनेंतर्गत केलेल्या

कामांची 100 टक्के तपासणी करून 5 टक्के कामांची तपासणी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेमार्फत करण्यात यावी, असे निर्देश असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसू-2011/ प्र.क्र.442/अजाक, दिनांक 05/12/2011 च्या परिशिष्ट अ मधील सूचना क्रमांक 10 अन्वये या योजनेंतर्गत कामे घेताना गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील सर्व गावांची प्राधान्य क्रमाने यादी तयार करून ती जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर करावी व समाजकल्याण विभागाने या प्राधान्य क्रमानेच कामे मंजूर करून कामे करून घ्यावीत, असे निर्देश असताना विभागाने अशी कार्यवाही केलेबाबत दिसून आले नाही.

8) दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत घेण्यात आलेली कामे याचा उपयोग सदरच्या गावातील दलितानांच झालेबाबातचे व त्याचा लाभ दलित जनता घेत असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित गटविकास अधिकारी यांनी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर केलेले नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार विभागाने दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या बांधकामांची नोंद नमुना नंबर 69 मधील बांधकाम नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

**3.835 मागासवर्गीयासांठी 20 टक्के राखीव असलेला निधी खर्च न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत रक्कम रूपये 3,57,36,111/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/ प्र.क्र1239/34, दिनांक 01/09/1993, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/सीआर 1205/34 दिनांक, 09/12/1993 तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील सूचना अन्वये जिल्हा परिषदेनी त्यांच्या उत्पनाच्या 20 टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता योजना राबवून त्यावर त्याच वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. परंतु, जिल्हा परिषदेने अंदाजपत्रकात तरतूद करून व अनुदान उपलब्ध असून देखील मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता परिपूर्ण योजना राबविलेच्या दिसून येत नाहीत. परिणामी, सन 2012-2013 पासून ते 2015-2016 पर्यंत रुपये 3,57,36,111/- एवढा अनुशेष शिल्लक असल्याचे दिसून आले. यावरून असे दिसून येते की, शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद प्रशासनाने लोकाभिमुखता व संवेदनशीलता राखण्याबाबत प्रयत्न केलेचे दिसून येत नाहीत. तसेच दरवर्षी मागासवर्गीयांसाठीची 20 टक्के रक्कम पूर्णपणे खर्च न केल्याने या योजनेचा जनतेस फायदा होऊ शकला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/ प्र.क्र.73/34 दिनांक 20/10/1999 मधील सूचना क्रमांक 4 अन्वये जिल्हा परिषदांनी मागासवर्गीयांची एकत्रित अशी लाभार्थींची बृहत (मास्टर) नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

3) उक्त शासन निर्णयातील सूचना क्रमांक 5 अन्वये मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राखून ठेवलेली 20 टक्के रक्कम ही त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना आखून त्याची परिणामकारक अंमलबजावणी करून त्याच वित्तीय वर्षात खर्च होतो की नाही, हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व समाजकल्याण अधिकारी यांची आहे. परंतु, याप्रकरणी अशी उचित कार्यवाही झालेचे दिसून आले नाही.

**3.836 अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरिता 3 टक्के रक्कमेपेक्षा कमी खर्च केलेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 39,64,623/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 261(1) तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/प्र.क्र.4871/वित्त-3, दिनांक 05/10/2012

नुसार जिल्हा परिषदांनी त्यांच्या एकूण स्व:उत्पन्नामधील 3 टक्के निधी हा दरवर्षी अपंगांच्या कल्याण व पुनर्वसना करिता खर्च करणे बंधनकारक असून प्रत्येक वित्तीय वर्षाकरिता 3 टक्के निधीची तरतूद अर्थसंकल्पात नियमितपणे करावी, असे स्पष्ट आदेशीत असताना जिल्हा परिषदेने मात्र 3 टक्के पेक्षा कमी खर्च केल्याचे दिसून आले. परिणामी, सन 2012-2013 पासून ते सन 2015-2016 पर्यंत रुपये 39,64,623/- एवढा अनुशेष शिल्लक असल्याचे दिसून आले. तेंव्हा सदर बाब ही उक्त शासन निर्णयाचे उल्लंघन करणारी आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/प्र.क्र.4871/वित्त-3, दिनांक 25/06/2014 अन्वये जिल्हा परिषदेने प्रत्येक वर्षी 3 टक्के निधी अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरिता राखून ठेवून तो निधी तात्काळ समाजकल्याण विभागाकडे सुपूर्द करावा, अशा स्पष्ट सूचना असताना जिल्हा परिषदेने दरवर्षी 3 टक्के राखीव निधी समाजकल्याण विभागाकडे सुपूर्द केलेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95(2)(ड) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही झालेचे दिसून आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2012/ प्र.क्र.722/वित्त-9, दिनांक 19/07/2012 अन्वये जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम व लेखा संहिता तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करून त्यात कोणत्याही प्रकारची अनियमितता राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशा स्पष्ट सूचना असताना जिल्हा परिषदेने याप्रकरणी अशी खबरदारी घेतल्याचे दिसून आले नाही. तरी ही बाब सदर शासन परिपत्रकाची उल्लंघन करणारी आहे.

**3.837 अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल अदाई योजनेतील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रूपये 22,17,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अपंग-2008/ प्र.क्र.212/सुधार-3, दिनांक 02/07/2010 नुसार अपंग व्यक्तीना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल उपलब्ध करून देणेसाठी लाभार्थींना रुपये 1,50,000/- च्या मर्यादेत बीज भांडवल देय असून त्याचे 20 टक्के अनुदान व उर्वरित 80 टक्के रक्कम बँक कर्ज स्वरूपात उपलब्ध होणार आहे. याकरिता समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद परभणीने उपरोक्त प्रमाणकाद्वारे 122 अपंग लाभार्थ्यांना 20 टक्के बीज भांडवलाची रक्कम रुपये 22,17,000/- प्रदान केलेली आहे. परंतु, महाराष्ट्र शासन, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रमांक इडीडी-1087/28863/158/सुधार-2, दिनांक 19/01/1989 मधील परिच्छेद 6 नुसार अपंगांच्या मंजूर प्रकल्पाच्या एकूण खर्चापैकी 20 टक्के बीज भांडवलाची रक्कम संबंधित बँकांना मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार बँकेकडे जमा करण्यात यावी. त्यानंतर बीज भांडवल व बँक कर्जाची एकत्रित रक्कम बँकेमार्फत संबंधित लाभार्थीस प्रदान करण्यात यावी. तथापि, विभागाने 122 लाभार्थ्यांची 20 टक्के बीज भांडवलाची रक्कम रुपये 22,17,000/- प्रस्ताव मंजूर केलेल्या त्या त्या बँकाकडे जमा न करता बीज भांडवल रक्कमेचा एकत्रित धनादेश व्यवस्थापक, परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नावे देण्यात आला. त्यामुळे केलेली कृती नियमबाह्य आहे.

2) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रमांक इडीडी-1090/8197/के.न.154/सुधार-2, दिनांक 25/02/1991 नुसार या योजनेखाली ज्या अपंगाना सहाय्य केले जाईल, ते अपंग लाभार्थी हे 18 ते 50 याच वयोगटातील असावेत, असे स्पष्ट निर्देशित आहे. परंतु, विभागाने 50 वर्ष वयोगटापेक्षा जादा वयोगटातील अपंग लाभार्थींचे प्रस्ताव मंजूर करून त्यांना नियमबाहयपणे 20 टक्के बीज भांडवलाची रक्कम प्रदान केलेली आहे. त्यामुळे रक्कम रूपये 92,000/- जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम रुपये 92,000/- संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रमांक इडीडी-1087/28863/158/सुधार-2, दिनांक 05/01/1989 मधील परिच्छेद 4 नुसार या योजनेखाली ज्या अपंगाना सहाय्य केले जाईल, ते कोठेही नौकरीस नसावेत, असे स्पष्ट निर्देशित असताना लाभार्थी हे कोठेही नोकरीस नसल्याबाबतचे हमीपत्र लाभार्थीकडून घेणे आवश्यक होते. तथापि, अर्जासोबत असे हमीपत्र घेतलेले नाही.

4) काही प्रमाणकातील 122 पैकी 98 अपंग लाभार्थ्यांनी व्यवसायासाठी अनुदानाचा वापर केलेला आहे.

परंतु, व्यवसाय सुरु करणेपुर्वी मुंबई दुकाने व संस्था अधिनियम-1948 व महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम-1961 च्या कलम 6 अन्वये व्यवसाय नोंदणीचा परवाना घेणे आवश्यक आहे. तथापि, लाभार्थीच्या विहित नमुन्यातील अर्जासोबत सदर व्यवसाय नोंदणीचा परवाना घेणेत आलेला नाही. त्यामुळे केलेली कृती नियमबाह्य आहे.

5) प्रमाणकातील 122 पैकी 09 लाभार्थ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज लेखापरीक्षणात अर्धसमास पत्र क्रमांक 03, दिनांक 26/05/2017 व अर्धसमास पत्र क्रमांक 11, दिनांक 13/06/2017 अन्वये लेखी मागणी करुनही सादर केलेली नाहीत.

6) श्रीमती मुक्ताबाई मुंजाभाऊ लिपणे यांना किराणा दुकानासाठी रुपये 30,000/- बीज भांडवल मंजूर केलेले आहे. परंतु, त्यांच्या विहित नमुन्यातील अर्जासोबत आवश्यक असणारी एकही कागदपत्रे जोडलेली दिसून आली नाहीत. तेंव्हा विभागाने कोणत्या प्राधिकारान्वये अनुदान मंजूर केले? याचा उलगडा लेखापरीक्षणात कळू शकला नाही.

7) उपरोक्त प्रमाणकातील 122 लाभार्थी अर्जदारांचे बँकेने कर्ज मंजूर केलेबाबतची पत्रे तसेच सदर योजनेस समाजकल्याण समितीची शिफारस असलेबाबतची कागदपत्रे अर्जासोबत व संचिकेत दिसून आली नाहीत.

8) एकाच लाभार्थ्यास शासन व जिल्हा परिषद स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसलेबाबतची पडताळणी करण्यासाठी विभागाने लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

9) योजना अंमलबजावणी नंतर लाभार्थ्याकडून उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच सक्षम प्राधिकारी यांचा योजनेबाबतचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास पहावयास मिळाला नाही.

**3.838 अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी झेरॉक्स मशिन पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 29,99,472/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/95 दिनांक 09/10/1997 मधील परिच्छेद क्रमांक 3 प्रमाणे वस्तुची / साहित्याची खरेदीपुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया निकषानुसार परिपूर्ण होईल, याची खबरदारी घेण्यात यावी. तसेच परिच्छेद क्रमांक 5 मध्ये नमूद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करावे. येथे साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात झालेले नसल्याने वित्तीय अनियमितता झालेली असून वित्तीय वर्ष अखेरीस साहित्य प्राप्त झाल्याने साहित्य विनावाटप पडून असल्याने जिल्हा परिषदेची रक्कम विनाकारण गुंतुन पडलेली आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446 वित्त-9, दिनांक 27/06/2006 अन्वये योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी वेळापत्रकानुसार झालेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक पंरास-1076/ प्र.क्र.872/ जल-2ब, दिनांक 10/10/1996 अन्वये किती साहित्याची आवश्यकता आहे? याची एकत्रित मागणीचा आढावा घेवून खरेदी करणे आवश्यक होते. परंतू, याप्रमाणे कार्यवाही न केल्याने वर्षाअखेर मोठया प्रमाणात साहित्य विनावाटप पडून आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील कलम 83(3) आणि शासन निर्णय 1992 नुसार प्राप्त साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत नमूद केलेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशश/प्र.क्र.114/38, दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी. यासाठी साहित्याची खरेदी करण्यापुर्वी

सर्वसाधारण सभेत लाभार्थ्यांची निवड न करता पंचायत समितीनिहाय साहित्य संख्यात्मक पुरवठा कशाचे आधारे केला? याचा बोध होत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मागास/1094/ सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार योजनेच्या लाभामुळे लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या सुधारणाबाबतचा अहवाल प्राप्त करून घेतला नाही.

7) ज्या लाभार्थ्यांना झेरॉक्स मशिन वाटप केले, त्यांना झेरॉक्स मशिन हाताळणेबाबतचे प्रशिक्षण दिले असल्याचे संचिकेतून दिसून आले नाही.

8) लाभार्थ्यांचे मुळ सर्व प्रस्ताव संचिकेतून पहावयास मिळाले नाही.

**3.839 ग्रामिण भागातील लाभार्थ्यांना टिन पत्रे वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 19,98,197/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1076/ प्र.क्र. 872/जल 2ब, दिनांक 10/10/1996 अन्वये किती वस्तुंची / साहित्याची आवश्यकता आहे? याच्या एकत्रित मागणीचा आढावा घेऊन खरेदी करणे आवश्यक होते. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशश 1020/ प्र.क्र. 114/ 38, दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी, यासाठी साहित्याची खरेदी करण्यापूर्वी सर्वसाधारण सभेत लाभार्थ्यांची निवड करावयास हवी. परंतु, अशाप्रकारची लाभार्थ्यांची निवड न करता पंचायत समितीनिहाय साहित्याचा संख्यात्मक पुरवठा आदेश कशाच्या आधारे दिला? याचा बोध होत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34/ दिनांक 01/09/1993 आणि शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद क्रमांक 4 प्रमाणे विवरणपत्र 'अ' मध्ये मागासवर्गीय जाती व गावनिहाय यादया तयार केल्या पाहिजे व लाभार्थ्यांस वैयक्तीक लाभ /साहित्य दिल्यानंतर त्याची नोंद त्या नोंदवहीत केली पाहिजे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे एकच लाभार्थ्यास दोनदा फायदा झाला नसल्याची पुर्ण खात्री लेखापरिक्षणात करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरसी-1093/ सीआर/1074/57 दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा हेतू सफल होत आहे किंवा नाही? याबाबत योग्यतेचा सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत दिसून आलेला नाही. त्यामुळे उद्देश्य सफल झाल्याचे पडताळणी करता आलेली नाही.

5) लाभार्थ्यांच्या यादीची तपासणी केली असता 4 लाभार्थी एकाच कुटुंबातील असल्याचे दिसून येते.

6) संबंधित पंचायत समितीचे स्टॉक बुक अदयावत नव्हते. वसमत येथे 68 लाभार्थींना प्रत्येकी 6 टिन पत्रे वाटप केले. 12 पत्रे शिल्लक आहेत. मात्र याची नोंद साठा नोंदवहीवर नाही. वाटप करणा-या अधिका-याची स्वाक्षरी नाही. हिंगोली व सेनगाव यांनी वाटपाचे वेगळे रजिस्टर ठेवले आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/सीआर-1265/34 दिनांक 09/12/2003 नुसार 30 टक्के महिला लाभार्थींना लाभ दिला गेला नाही.

7) प्राप्त टिन पत्र्यांची सर्व पंचायत समिती स्तरावर तपासणी होणे आवश्यक होते. मात्र हिंगोली वगळता इतर पंचायत समित्यांनी तपासणी अहवाल दिलेला नाही.

8) पंचायत समिती, हिंगोली येथील उपअभियंता (बांधकाम) यांनी जावक क्रमांक 458, दिनांक 17/06/2016 चे अहवालात पत्र्याची लांबी, वजन, आयएसआय मार्क नसणे, नस्त्यांची संख्या नमूद नसणे, अशा त्रुटी नमूद केल्या आहेत.

**3.840 स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीयांच्या वस्तीगृहाला नियमबाहय परिपोषण प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 29,00,000/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-41, दिनांक 16/03/1998 मधील नियम 7(8अ) अन्वये 60 टक्के अग्रिम अनुदानाची रक्कम ही जून महिन्यात देण्यात यावी असे निर्देशित असताना विभागाने माहे मार्च मध्ये अदा केलेली आहे.

2) एकूण 29 वस्तीगृहांच्या संचिकेची तपासणी केली असता काही नस्तीमध्ये उपयोगिता प्रमाणपत्र, करारनामा अपूर्ण असताना त्यांना नियमबाहय अग्रिम अनुदान अदा केले आहे.

3) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन क्रमांक बीसीएच-1097/ प्र.क्र.107/मावक-41, दिनांक 16/03/1998 मधील नियम 7(8अ) अन्वये 60 टक्के अग्रिम अनुदानाची रक्कम ही जून महिन्यात देण्यात यावी. मान्य असलेल्या विद्यार्थी संख्येनुसारच अनुदान वाटप करणे आवश्यक आहे. परंतु, वस्तीगृहांची विद्यार्थी संख्या सारखी नसतानाही रूपये 1,00,000/- प्रति वस्तीगृह याप्रमाणे सर्वांना सारखी रक्कम कोणते निकष लावून वाटप करण्यात आले?

5) एकूण 29 वस्तीगृह तपासणीतील वस्तीगृहाचे अभिलेखे लेखापरीक्षणात दर्शविले नाहीत. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अधिनियम 2011 चे कलम 06 अन्वये अर्धसमास पत्र क्रमांक 07, दिनांक 07/11/2014 व 17, दिनांक 15/11/2014 नुसार वारंवार लेखी मागणी करूनही सदर अभिलेखे दर्शविलेले नाहीत. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक लेखाप-2013/(7) (13)/वित्त-8, दिनांक 12/02/2013 अन्वये लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध न करणे, आवश्यक अभिलेखे न दाखविणे ही बाब गंभीर स्वरुपाची असल्याने याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम (सुधारित) 2011 चे कलम 7 अन्वये संबंधीता विरुध्द कार्यवाही करावी.

**3.841 मागासवर्गीयासांठी 20 टक्के राखीव असलेला निधी खर्च न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-16 (परिच्छेद क्रमांक 14) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद नांदेडच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात समाजकल्याण विभागाकडील उपलब्ध माहितीवरून विभागाने दरवर्षी जिल्हा परिषदेच्या स्व:उत्पनाच्या 20 टक्के रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता खर्च केल्याचे दिसून आले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1096/ प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/सीआर 1205/34, दिनांक 09/12/1993 तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील सूचना अन्वये जिल्हा परिषदेनी त्यांच्या उत्पनाच्या 20 टक्के रक्कमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता योजना राबवून त्यावर त्याच वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. परंतु, जिल्हा परिषदेने अंदाजपत्रकात तरतूद करून व अनुदान उपलब्ध असून देखील मागासवर्गीयांच्या कल्याणा करिता परिपूर्ण योजना राबविलेच्या दिसून येत नाहीत. परिणामी रुपये 2,60,59,238/- एवढा अनुशेष शिल्लक असल्याचे दिसून आले. यावरून असे दिसून येते की, शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद प्रशासनाने लोकाभिमुखता व संवेदनशिलता राखण्याबाबत प्रयत्न केलेचे दिसून येत नाही. तसेच दरवर्षी मागासवर्गीयांसाठीची 20 टक्के रक्कम पूर्णपणे खर्च न केल्याने या योजनेचा जनतेस फायदा होवू शकला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/ प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील सूचना क्र.5 अन्वये मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राखून ठेवलेली 20 टक्के रक्कम ही त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना आखून त्याची परिणामकारक अंमलबजावणी करून त्याच वित्तीय वर्षात खर्च होतो की नाही हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व समाजकल्याण अधिकारी यांची आहे. परंतु या प्रकरणी अशी उचित कार्यवाही झालेचे दिसून आले नाही.

3) उक्त शासन निर्णयातील सूचना क्र.10 अन्वये 20 टक्के निधीतून मागासवर्गीयांच्या विकास योजनेवर करावयाचा खर्च हा अनुसूचित जाती, नवबौद्ध, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या जिल्ह्यातील लोकसंखेच्या प्रमाणाच्या आधारावर करण्यात यावा अशा स्पष्ट सूचना आहेत. परंतु, जिल्हा परिषदेने लोकसंखेच्या प्रमाणात असा खर्च केलेबाबतची अभिलेखे, नोंदवहया लेखापरीक्षणात सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे लोकसंखेच्या प्रमाणात खर्च केलेबाबतची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

4) उक्त शासन निर्णयातील सूचना क्र.11 अन्वये मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी तयार केलेल्या योजनांसाठी लाभार्थी उपलब्ध होत नसल्यास जिल्हा परिषदेनी जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व संबंधीत प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांच्या कार्यालयाशी सपर्क साधून लाभार्थी उपलब्ध करून घ्यावेत अशा स्पष्ठ सूचना असताना जिल्हा परिषदेने अशी उचित कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

**3.842 शिक्षण फी, परिक्षा फी प्रदानातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,86,500/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 104 मध्ये राजा भगीरथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हिमायतनगर जिल्हा नांदेड या शाळेची विद्यार्थी संख्या 24 असताना नियमबाह्य 43 विद्यार्थ्यांना प्रती रूपये 300/- प्रमाणे रूपये 12,900/- रक्कम अदा केली. रक्कम रूपये 5,700/- चे जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

त्याचप्रमाणे राजाबाई हायस्कूल पार्डी (सेनी), तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड या शाळेची विद्यार्थी संख्या 40 असताना नियमबाह्य 41 विद्यार्थ्यांना प्रती रूपये 300/- प्रमाणे रूपये 12,300/- रक्कम अदा केली. रक्कम रूपये 300/- चे जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

एकूण जादा प्रदानीत रक्कम रूपये 6,000/- संबंधीत शाळेकडून वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

**3.843 अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिष्यवृती प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 28) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,66,000/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भारत सरकार, कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्रमांक स.क./11014/3/15/शि.कक्ष दिनांक 20/07/1995 अन्वये नगरपालिका अथवा ग्रामीण भागातील मुलांचे आई-वडील अस्वच्छ व्यवसायाचे काम करीत असल्याचे प्रमाणपत्र दरवर्षी घेणे आवश्यक आहे. सबब प्रमाणपत्राअभावी प्रदान शिष्यवृती योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

2) समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक भासशी-2/अव्यशी/क्रमांक 4, दिनांक 27/06/2000 नुसार सदर योजना प्रभावीपणे राबविणे व पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ नियमानुसार होण्यासाठी योजनेला आवश्यक ती प्रसिद्धी देण्यात यावी. सदर योजनेसाठी नवीन वर्ष्याची तरतूद प्राप्त होण्याअगोदर गत वर्षी झालेल्या खर्चाच्या पोंच पावत्या संबंधीत शाळेकडून प्राप्त करून घेतल्याबाबत खात्री करून घ्यावी व झालेल्या खर्चाचा त्याच्याशी ताळमेळ बसतो किंवा नाही, हे पाहून अखर्चित रक्कम शासन खाती भरणा करावी, असे स्पष्ट निर्देश असताना समाजकल्याण अधिकारी यांनी अशी उचित कार्यवाही केलेबाबतचे दिसून आले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक असक-2012/प्र.क्र.16/ जल-11, दिनांक 19/05/2012 मधील सूचना क्रमांक 12 अन्वये शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती, व वैयक्तिक लाभार्थी यांची प्रदाने इलेक्ट्रॉनिक क्लीअरन्स सिस्टीम (ECS) नेच अदा करावीत अशा स्पष्ट सूचना असताना विभागाने विद्यार्थ्यांच्या खाते रक्कम जमा करणे ऐवजी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांच्या नावे धनाकर्षाने रक्कमा प्रदान केलेल्या आहेत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 77(2) अन्वये प्रदान केलेल्या प्रत्येक बाबीची पोंच पावती घेणे आवशक आहे. तथापि, उपरोक्त प्रमाणकान्वये प्रदान शिष्यवृत्तीची रक्कम संबंधीत विद्यार्थ्यांना वाटप केलेबाबतची पोंच पावती लेखापरीक्षणात दर्शविली नाही.

**3.844 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय युवक / युवतींना झेरॉक्स मशीन पुरवठा करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद चे सन 2015-2016 चे लेखापरिक्षणाकरीता अभिलेखे तपासणी केली असता मागासवर्गीय युवक / युवतींना झेरॉक्स मशीन पुरवठा करणेसाठी प्रमाणक क्रमांक 326, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 14,80,752/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविलेली नाही.

2) ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक मागास/1089/प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989 नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु, अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडुन राबविण्यात आलेल्या याच योजनेतुन यापुर्वी व यावर्षीही लाभ दिला गेला नाही, हे तपासता आले नाही.

3) मंजूर व मान्य लाभार्थ्यांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या श्री. मनोज पांडुरंग आयवळे, कदमवाडी, जात-होलार यांना झेरॉक्स मशीनचा पुरवठा न करता मंजूर व मान्य लाभार्थ्यांच्या यादीमध्ये समाविष्ट नसलेल्या तसेच अपुर्ण कागदपत्रे जोडणेत आलेला प्रस्ताव असलेल्या श्रीमती अनुराधा उर्फ अनिता मारुती हब्बु यांना झेरॉक्स मशीनचा पुरवठा कसा काय केला? लाभार्थी अर्जाची छाननी योग्य यंत्रणेमार्फत करणेत आलेली दिसून येत नाही. योग्य खुलासा देऊन अनुपालन सादर करावे. तसेच अर्ज अपुर्ण असल्यामुळे लाभार्थी प्रस्ताव नामंजूर करुन रक्कम रुपये 37,968/- संबंधितांकडुन वसुल करुन शासन खाती जमा करावे.

4) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 मधील परिच्छेद क्रमांक 1 कलम 63 नुसार ठेकेदाराबरोबर / सेवा पुरवठादाराबरोबर करारनामा करताना रूपये 10 लक्ष पर्यंत कामासाठी रूपये100/- च्या स्टँपपेपर व त्यावरील प्रत्येक एक लाखासाठी रूपये 100/- अशा प्रकारे एकुण रक्कम रुपये 600/- किंमतीच्या स्टँपपेपरवर करारनामा करणे आवश्यक होते. तथापि, याप्रमाणे कार्यवाही न करता रक्कम रुपये 100/- च्या स्टँम्प पेपरवर करारनामा करणेत आलेला आहे. त्यामुळे रक्कम रूपये 500/- सबंधीताकडून वसूल करून मुद्रांकशुल्क खाती भरणा करावी.

**3.845 मागासवर्गीय विदयार्थी वसतिगृहांना अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद चे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणाकरीता खालील देयकांची पडताळणी केली असता 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,45,800/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकुण परावर्तीत केल्याप्रमाणे 02 विदयार्थी अनुसुचित जमाती मध्ये वाढ धरुन एकुण विदयार्थी 20 होत आहेत. तथापि, प्रति विदयार्थी रक्कम रुपये 9,000/- प्रमाणे 24 विदयार्थ्यांकरीता एकुण रक्कम रुपये 2,16,000/- चे प्रदान करणेत आलेले आहे. त्यामुळे 02 विदयार्थ्यांची रक्कम रुपये 18,000/- वसुल करुन शासन जमा करावी.

2) वसतिगृहाने परावर्तनाचा प्रस्ताव केलेला नाही. त्यामुळे प्रत्यक्ष प्रवेशासाठी 20 विदयार्थीच ग्राहय धरणे आवश्यक असतांना 21 विदयार्थ्यांचे प्रतिविदयार्थी रक्कम रुपये 9,000/- प्रमाणे एकुण रक्कम रुपये 1,89,000/- चे प्रदान करणेत आलेले आहे. त्यामुळे 01 विदयार्थ्यांची रक्कम रुपये 9,000/- वसुल करुन शासन जमा करावी.

**3.846 100 टक्के अनुदानावर लोखंडी स्टॉल वाटप करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** ई-निवीदाद्वारे कमी किमतीची निविदा साईनाथ सेल्स ॲण्ड सप्लायर्स यांची मंजूर करून प्रमाणक क्रमांक 345, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 10,50,000/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविलेली नाही.

2) ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक मागास/1089/प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989 नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु, अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडुन राबविण्यात आलेल्या याच योजनेतुन यापुर्वी व यावर्षीही लाभ दिला गेला नाही, हे तपासता आले नाही.

3) ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तुंची खरेदी करण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया सर्वार्थाने पुर्ण करुन वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल, अशा प्रकारे योजना राबवायची आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

लाभार्थ्यांची निवड अगोदर केली असती तर उपरोक्तप्रमाणे वाटप आर्थिक वर्षात झाले असते. याचाच अर्थ कागदोपत्री लाभार्थींची निवड प्रत्यक्ष वस्तु प्राप्त केल्यानंतर केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे लाभार्थीची निवड करुन तालुका स्तरावर पुरवठा करण्याचे आदेश असतांना त्या तालुक्यावरून उपरोक्त दर्शविलेल्या विवरणपत्राप्रमाणे एका तालुक्यातुन दुसऱ्या तालुक्यात वस्तु हस्तांतरण केलेले आहे ज्या तालुक्यातून वस्तु हस्तांतरण केले त्या तालुक्याचे लाभार्थी यादी तयार नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे तालुका स्तरावर पुरवठा आदेश अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे असतांना तालुकास्तरातुन वस्तुचे हस्तांतरण करतांना अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेतली नसल्याचे दिसुन येते. याबाबत योग्य ती पूर्तता दर्शवावी.

4) पंचायत समिती भूम, वाशी, परंडा यांनी वाटप रजिस्टरला दिनांक नमुद केलेला नाही. त्यामुळे सदरील साहीत्य कैंव्हा वाटप करण्यात आले? याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास.1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मुल्यमापन तीन स्तरावर करणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.847 ग्रामीण भागांतील मागासवर्गीय महिलांना व पुरुषांना व अपंगांना मिरची कांडप यंत्र पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4 व 5) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 107, दिनांक 30/03/2016 व प्रमाणक क्रमांक 215, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 50,89,800/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद सेस योजनेतून ग्रामीण भागांतील मागासवर्गीय महिला व पुरुषांना व अपंगाना मिरची कांडप यंत्र पुरविणे जिल्हांतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गिय कल्याणर्थ सन 2014-15 मध्ये तालुकानिहाय लाभार्थ्यांच्या अंदाजित निवड लाथार्थि संख्येस मंजूरी दिलेली आहे. यावरुन, लाभार्थिंची मागणी, गरज किंवा आवश्यकता लक्षात न घेता केवळ अर्थिक तरतूद आहे. म्हणून खर्च करावयाचा असल्याचे सदर बाबीवरुन दिसून येते. यामूळे योजनेचा उद्देश सफल होत नाही. अंदाजित लाभार्थि ठरवून साहित्याची खरेदी केल्यामूळे गरजवंत लाभार्थ्यास या योजनेचा लाभ झाल्याचा लेख्यां आधारे खातरजमा होत नाही. तरी आवश्यक त्या लेख्यांसह अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 व 125 नुसार कोणत्यांही खर्चास प्रथम प्रशासकिय मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानंतर तांत्रिक मंजूरी घेऊन कामांवर खर्च करावयाचा आहे. परंतु सदर प्रकरणी प्रशासकिय मंजूरी घेतल्याची दिनांक प्रशासकिय मान्यतेवर नमूद नाही दिनांक 01/10/2015 रोजी तांत्रिक मंजूरी घेतल्याचे दिसून येते. तसेच अपंगाचे योजनेकरीता यावरुन रितसर प्रशासकिय मंजूरी अगोदर न घेता तांत्रिक मंजूरी घेतल्याच्या शंकेस वाव आहे. त्यामुळे केलेला खर्च नियमबाह्य ठरतो. तरी खुलासा होणे आवश्यक आहे.

3) विक्रिकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची अधिसूचना दिनांक 04/05/2012 नुसार, नोंदणीकृत कंत्राटदाराकडून विक्री किंमतीच्या 2 टक्के मुल्यवर्धित कर कपात करणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणी 2 टक्के

प्रमाणे रुपये 1,01,796/- एवढी रक्कम वसूल केलेली नाही. तरी उक्त अधिसूचनेनुसार संबंधीत ठेकेदाराकडून रक्कम रुपये 1,01,796/- वसूल करुन शासन खाती भरणा करावी व पूर्तता दर्शवावी.

4) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 34 व महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक 2009/2107/प्र.क्र.326/म-1, दिनांक 09/10/2009 नुसार पुरवठा दारासोबत रुपये 3,300/- च्या Bond पेपर वर अटी व शर्ती सहित करारनामा करून घेणे बंधन कारक असताना असे न करता पुरवठा आदेश कसा देण्यात आला याबाबत खुलासा करावा. व मुद्रांक शुल्काची रक्कम रूपये 3,300/- वसूल करण्यात यावी.

5) पुरवठादाराने रक्कम प्राप्त झाल्यास रक्कम प्राप्त झाल्याची पोचपावती देणे आवशयक असताना अशी पावती संचिकेत दिसून आली नाही.

6) मिरची कांडप यंत्राचे वाटप हे पंचायत समिती स्तरांवरुन असलेने, तसेच लाभार्थि निवड ही गठित समितीने करावयाचे असलेने एकाच वेळी सदर निवड न करता वेळोवेळी व आवश्यकते नुसार लाभार्थि यादीस जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी मंजूरी देऊन त्यांनुसार पंचायत समिती स्तरांवर साहित्याचे वाटप केलेचे दिसून येते. तथापि, अशा यादीस समितीने मंजूरी दिल्याचे दिसून येत नाही. त्यांमूळे मंजूर लाभार्थि हे सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र असलेचे लेख्याअभावि खात्री करता आली नाही.

7) जिल्हा परिषद साहित्य खरेदी हि अंदाजित लाभार्थी विचारात घेऊन खरेदीस मंजूरी दिलेचे दिसते. असे असलेने जिल्हांतर्गत एकूण 10 पंचायत समितीस मिरची कांडप यंत्र पुरवठा कोणत्या निकषांवर करण्यात आला याचा बोध होत नाही.

8) पंचायत समिती लातूर, औसा, चाकूर यांनी साहित्य वाटपाचे कुठलेही अभिलेखे दर्शविले नाहीत. याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा सुधारणा अधिनियम 2011 चे कलम 6 नुसार सदर लेख्याची मागणी करण्यात आले होते. तरी याबाबत अभिलेखे उपलब्ध न करून दिल्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा सुधारणा अधिनियम 2011 चे कलम 7 नुसार पुढील दंडात्मक कार्यवाही करून पूर्तता दर्शवावे.

9) पुरवठा नगांचा लेखापरीक्षण कालावधीपर्यंत लाभार्थी यांना साहित्याचा पुरवठा झालेला नाही.

10) सदरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 8 व 9, दिनांक 20/05/2017 अन्वये विचारणा केली असता सदरील अर्धसमास पत्राचे उत्तर दिलेले नाही.

### 3.848 स्वयंसेवी संस्थांतर्गत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृहास नियमबाह्य इमारत भाडे अदाईत जादा प्रदानाबाबत.

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात स्वंयसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृहासाठी खाजगी व्यक्तीकडून घेण्यात आलेल्या भाडे तत्वावरील इमारतभाडे अदाईचा खर्च रक्कम रूपये 4,77,57,501/- चे लेखे तपासले असता नियमबाह्य जादा प्रदान केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व सांस्क्रतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 जोडपत्र अ (अ 16) (क) नुसार वस्तीगृहाच्या ईमारत भाडे अदाईबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार संस्थेने दिलेले भाडे वाजवी असलेबाबतचे बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रमाणित केले पाहिजे. सदर दिलेल्या भाड्याच्या 75 टक्के भाडे इतके सहायक अनुदान म्हणून शासन अनुदान मिळते. तसेच जोडपत्र अ मधील क्र.3 (ब) (2) नुसार प्रत्येक निवासी छात्रास किमान 24 चौ.फुट ते कमाल 40 चौ फूट च्या प्रमाणात शयन व भोजनासाठी पुरेशी जागा असणे आवश्यक असतांना वस्तीगृहास मंजूर प्रवेश छात्रासाठी कमाल चौरस फुटा पेक्षा जादा चटई क्षेत्र दर्शवून त्यांना रक्कम रुपये 1,38,948/- जादाचे प्रदान केलेले आहे. जे संबधीत संस्थेकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) सदर शासन निर्णयातील जोडपत्र अ (आठ) (ड) नुसार ज्या संस्थेचे वस्तीगृह संस्थेच्या स्वत:च्या इमारतीत चालू आहे, अशा संस्थेना इमारतीचे भांडवली मूल्याच्या 7.5 टक्के इतकी रक्कम निर्धारित करुन येणाऱ्या रक्कमेच्या 50 टक्के रक्कम परीरक्षण अनुदान म्हणून देण्यात येईल असे नमूद असतांना किती संस्थेने स्वत:च्या इमारतीत अशी वस्तीगृहे चालू ठेवले आहेत याची लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत. तसेच अशा तऱ्हेचे परीरक्षण अनुदान दिल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले नाही. 4 संस्थाचे सरसकट योग्य भाड्याचे प्रमाणपत्र घेऊन त्याच्या 75 टक्के भाडे अदा केले आहे. या अनुषंगाने सदरचा लाभ घेणाऱ्या इतर संस्था यांना मागील बऱ्याच वर्षापासून असे ज्यादाचे इमारत भाडे प्रदान केले जात नसलेबाबत कागदोपत्री खात्री करावी. व याबाबत खुलासा करुन अशाप्रकारचे संस्थेकडे स्वत:च्या इमारतीत वस्तीगृह चालू नसल्याची खात्री पटवावी.

3) उपरोक्तप्रमाणे दर्शविलेल्या बाबी ह्या निवड महिन्यापुरते व लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केलेल्या लेख्यानुसार दर्शविण्यात आले आहे. याशिवाय इतरही संस्थेस अशाप्रकारचे जादा प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्याचे शोधन करुन अशाप्रकारे झालेले जादा प्रदान संबधीताकडून वसूल करुन शासन खाती भरणा करावे व अनुपालन लेखापरीक्षणात दर्शवावे.

4) सदरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 21, दिनांक 20/05/2017 अन्वये विचारणा केली असता सदरील अर्धसमास पत्राचे उत्तर दिलेले नाही.

**3.849 अनुदानित वस्तीगृहाना परिरक्षण अनुदान वाटपातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात स्वंयसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृहासाठी परिरक्षण अनुदान पोटी रक्कम रुपये 69,66,351/- चा खर्च केला आहे. त्या अनुषंगाने लेखे तपासले असता नियमबाह्य जादा प्रदान केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व सांस्क्रतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.1097/प्र.क्र.10/मावक-4, दिनांक 16/03/1998 जोडपत्र अ (8(7)मधील आठ)) नुसार सहायक अनुदान मिळणाऱ्या वसतिगृहाच्या व्यवस्थापनाने एखाद्या नोंदणीकृत सनदी लेखापालाकडून लेख्याची लेखापरीक्षा करून घेवून असा लेखापरीक्षण अहवाल (मागील वर्षाचा अनुदान विनियोग अहवाल) प्रत्येक वर्षी ऑक्टोबर अखेर पर्यंत सबंधीत समाजकल्याण कार्यालयात सादर न केल्यास अनुदानाच्या 5 टक्के पर्यंतचा दंडात्मक कार्यवाहीस सदर संस्था पात्र राहील असे असताना 2 संस्थांनी विलंबाने असा अहवाल सादर केला असताना लेखा विभागाने दंडाची रक्कम वसूल न करता पुढील अनुदान प्रदान केले आहे.

2) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व सांस्क्रतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.1097/प्र.क्र.10/मावक-4, दिनांक 16/03/1998 जोडपत्र अ (8(7)मधील आठ)) नुसार सहायक अनुदान मिळणाऱ्या वस्तीगृहाच्या व्यवस्थापनाने एखाद्या नोंदणीकृत सनदी लेखापालाकडून लेख्याची लेखापरीक्षा करून घेवून असा लेखापरीक्षण अहवाल (मागील वर्षाचा अनुदान विनियोग अहवाल) प्रत्येक वर्षी ऑक्टोबर अखेर पर्यंत सबंधीत समाजकल्याण कार्यालयात सादर न केल्यास अनुदानाच्या 5 टक्के पर्यंतचा दंडात्मक कार्यवाहीस सदर संस्था पात्र राहील असे स्पष्ट आहे. या अनुषंगाने इतर वस्तीगृहांचे अहवाल वेळेत प्राप्त झाले बाबत कागदोपत्री खात्री पटवावी.

3) सदरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 22, दिनांक 20/05/2017 अन्वये विचारणा केली असता सदरील अर्धसमास पत्राचे उत्तर दिलेले नाही.

**3.850 मागासवर्गीय लाभार्थ्यांना लोखंडी पत्रे पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद लातूर अंतर्गत समाजकल्याण विभागाने सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात प्रमाणक क्रमांक 262, दिनांक 31/03/2016 अन्वये मागासवर्गीय लाभार्थ्यांना लोखंडी पत्रे पुरवठा करणेकरीता रुपये 1,31,95,134/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खरेदी प्रक्रियेकरीता ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आला त्यानुसार दिनांक 14/12/2015 ते 29/12/2015 या कालावधीमध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकुण चार निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा दिनांक 30/12/2015 रोजी उघडल्यानंतर दोन पुरवठादार अपात्र ठरल्याने सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली.

2) यानंतर दिनांक 23/02/2016 ते 08/03/2016 या कालावधी दरम्यान फेर निविदा मागविण्यात आल्या. न्युनतम दर असणाऱ्या शाम कृषी केंद्र, आखाडा बाळापूर यांचेकडून Sample घेऊन ते पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर यांचेकडे पाठवल्यानंतर पत्राचे वजन कमी भरल्याने (15.5kg) भरल्याने त्यांना पुरवठा आदेश न देणेबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांनी आदेशित केले व L2 असणाऱ्या महाराष्ट्र मेटल इंडस्ट्रीज, औरंगाबाद यांना वाटाघाटीअंती रक्कम रुपये 53,748/- या दराने पुरवठा आदेश देण्यात आले.

3) उपरोक्त फेर ई-निविदा मागविलेबाबत वर्तमानपत्राची जाहिरात संचिकेत लेखापरीक्षणा दरम्यान दिसून आली नसल्यामुळे फेर ई-निविदा मागविलेबाबत खात्री करता आली नाही, पूर्तता दर्शवावी.

4) प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता रुपये 1,22,00,000/- ची असताना खर्च रुपये 1,31,95,134/- केलेला आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेऊन अनुपालन दर्शवावे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून राबविण्यात येणाऱ्या योजना (वैयक्तिक लाभ) परिशिष्ट इ नुसार योजनांची वेळापत्रकाप्रमाणे राबविण्याची कार्यवाही झालेली नाही, अनुपालन दर्शवावे.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार योजनेच्या लाभासाठी लाभार्थी बृहत नोंदवही गावनिहाय ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही ठेवल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्यांस दुबार लाभ मिळाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक पंरास/1083/सीआर197/64, दिनांक 02/07/1993 नुसार विनियोग प्रमाणपत्र घेतलेले नाहीत ते दर्शवून पूर्तता करावी.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, झेडपीए 2006/प्र.क्र.346/वित्त-9, दिनांक 15/07/2006 अन्वये 2 टक्के मुल्यवर्धित कर वसूल करणे आवश्यक आहे. सबब रक्कम रुपये 2,63,903/- वसूल करुन शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे.

9) पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर यांचे पत्र क्रमांक 1545, दिनांक 04/05/2016 व 1559, दिनांक 06/05/2016 च्या चाचणी अहवालानुसार पत्र्यांचा तपशील व प्रत्यक्ष पुरवठादाराकडून पंचायत समितीस पुरवठा झालेल्या प्राप्त पत्र्यांचा तपशील आहे. एकुण तीन तालुक्यामध्ये 10.184 टन इतक्या कमी वजनांचा पत्रा प्राप्त झाल्याचा दिसून येतो. त्यामुळे जादा अदा रक्कम (10.184 x 53,748) रुपये 5,47,369/- इतकी रक्कम वसूल करण्यात यावी. त्याचप्रमाणे इतर तालुक्याच्या बाबतीत अशा प्रकारची अनियमितता न झाल्याची खात्री पटवावी.

10) पंचायत समिती स्तरावर साठा नोंदवहीमध्ये सदर पत्र्यांची नोंद एकुण वजनामध्ये घेण्यात आलेली आहे. सबब संबंधीत पंचायत समितींना एकुण किती पत्रे प्राप्त झाले याचा बोध होत नाही. त्यामुळे साठा नोंदवहीमध्ये अद्यावत नोंदी घेऊन अनुपालन दर्शवावे व सर्व लाभार्थ्यांना पत्रे वाटप केलेबाबत खात्री पटवावी.

11) सन 2014-2015 मध्ये पंचायत समिती चाकूरमध्ये झालेल्या लोखंडी पत्रे खरेदीतील अनियमिततेमधील दोषी पुरवठादार यांना काळया यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामुळे तोच पुरवठादार या खरेदी प्रक्रियेमध्ये L1 झालेला आहे. त्यामुळे निकोप स्पर्धा न झाल्याचे दिसून येते.

12) पंचायत समिती जळकोट येथे पुरवठादाराचे डिलेव्हरी चालाननुसार 12.890 मेट्रिक टन इतक्या वजनाचा पत्रा पुरवठा केल्याचे दिसून येते. तथापि पंचायत समिती साठा नोंदवही मध्ये प्रत्यक्षात 12.750 मेट्रिक टन इतक्या वजनाचा पत्रा जमा झाल्याची नोंद आहे. तफावतीबाबत खुलासा व्हावा.